म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0013190

# जयां अंगीं मोठेपण

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३१९०
वा. क्र.

लेखक
श्री. का. काळे

REFBK-0013190

व्हीनस प्रकाशन : पुणें

पहिली आवृत्ति : मार्च १९६३

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

चित्रकार : अनंत सालकर

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
' त प श्च र्या '
३८१ क शनिवार पेठ : पुणें २

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
" शिव-पार्वती " टिळक पथ
४६१/४ सदाशिव : पुणें २

# दोन शब्द

मोठेपणाची व्याख्या करणें कठीण आहे. तुलनेमुळें मोठेपणा वाढून दिसतो किंवा कमी भासतो. प्रकाशांत आलेल्या सर्वच व्यक्ती मोठ्या असत नाहींत आणि अंधारांतील सर्वच व्यक्ती लहानहि असत नाहीत. समाजांतील प्रत्येक व्यक्ति आपापल्या कुवतीप्रमाणें निरनिराळ्या मार्गांनीं व निरनिराळ्या क्षेत्रांत मोठे होण्याचा प्रयत्न करीत असते; पण सर्वांनाच यश येतें असें नाहीं. आपले मनोरथ भंग पावल्यावरहि पुनः उभारीनें कार्याला लागणें, नवीं ध्येयें पुढें ठेवणें, आंतून दुःखानें होरपळलें असतांहि हंसतमुखानें वावरणें, आयुष्यांत आलेली संधि न गमावणें, हीं मोठेपणाचीं कांहीं लक्षणें मानलीं गेलीं आहेत. मनुष्याच्या हातून चुका होणें अगदीं साहजिक आहे; पण चुका समजणें, त्या सुधारतां येणें, त्या पुनः होऊं न देणें, हें ज्यांना शक्य होतें, ते समाजांत एकदम उठून दिसतात. तसेंच, आपल्यांतील उणीवांना प्रभावी गुणांच्या जोरावर निष्प्रभ करून टाकणारे एक प्रकारें मोठेच होत. मात्र त्यासाठीं सतत जागरूकतेनें त्यांना प्रयत्न करावा लागतो.

केवळ आपल्यापुरतें मिळवून आणि खर्चून जीवनाचें सार्थक होऊं शकत नाहीं. "माझ्या कुटुंबाला पुरेसें मी कमावतों, माझें काम मी नीट करतों,

मुलाबाळांकडे लक्ष पुरवतों, समाजद्रोह किंवा देशद्रोह मी करीत नाहीं " एवढें म्हणतां आलें तरी मोठेपणा मिळत नाहीं; कारण तेवढ्यानेंच आपलें कर्तव्य पूर्ण होत नाहीं. हें सगळें तर हवेंच; पण त्याहिपेक्षां आणखी कांहीं जास्तीची आवश्यकता असते. समाजाचें, पूर्वीच्या पिढ्यांचें, आपण कांहीं देणें लागतों. त्यासाठीं थोडें-फार करतां आलें तर पाहिजेच असतें. आपण आपल्यापुरत्या वेगळ्या जगांत राहात नसून आपले बांधवहि इथें आहेत, हें विसरून चालत नाहीं. सामाजिक आणि कौटुंबिक जीवनांत फलदायी सहकाराची आवश्यकता असते व एकमेकाला आधार देऊनच आपला व एकंदर समाजाचा विकास घडवून आणावयाचा असतो.

दैनंदिन अडचणींतून मार्ग काढून, स्वतःच्या जीवनाला वळण लावून, समाजालाहि आदर्शभूत होणाऱ्या व्यक्ती आपल्या कल्पनेपेक्षां समाजांत खूपच अधिक असतात; नव्हें अगदीं आपल्या आवतीं-भोंवतीं असतात; पण ते " मोठेपणाचे पदवीधर " नसल्यामुळें आपण त्यांच्याकडे पहातहि नाहीं. दूरच्या, आंवाक्याबाहेरच्या मोठ्या माणसांची, त्यांच्या प्रसिद्धीमुळें आपल्याला जेवढी माहिती होते, तेवढी या जवळपासच्या माणसांची होत नाहीं. फार मोठ्या माणसांचीं चरित्रें वाचून आपण कित्येकदां किंकर्तव्यमूढच बनतो, कारण, त्यामुळें आपलें लघुत्व मात्र अधिकच उठून दिसतें; असा अनेकांचा अनुभव असेल. पौराणिक, ऐतिहासिक किंवा दुसऱ्या खंडांतील वा राज्यांतील विभूतींचीं उदाहरणें मानसिक पार्श्वभूमि तयार करतील; पण जिवंत, चालती-बोलतीं उदाहरणें प्रत्यक्ष संपर्कामुळें अधिक पटतील आणि केवळ उद्दिष्टांचेंच नव्हें तर साधनांचेंहि मार्गदर्शन अधिक परिणामकारक करूं शकतील. अर्थातच, ह्या उदाहरणांची तुलना थोर विभूतींच्या चरित्रांशीं मुळींच अभिप्रेत नाहीं.

हातीं घेतलेल्या कार्यावर आपलें लक्ष पूर्णपणें केंद्रित करतां येणें हा मोठे होण्याचा एक मार्ग होय. अशा एकाग्रतेसाठीं अर्जुनाची गोष्ट नेहमीं सांगितली जाते. त्याची शरसंधानांतील एकाग्रता चित्तवेधक तर खरीच, पण आजच्या काळांतील क्रिकेटचें उदाहरण घेऊन त्यांत विजय मर्चंटनीं एकाग्रतेची साधना करून यश कसें मिळविलें, हें अवलोकन केलें तर तें अधिक परिणामकारक होणार नाहीं काय? कौटुंबिक कर्तव्यें कसोशीनें पार पाडूनहि, सामान्य परि-स्थितीमधील एकादी स्त्री केवळ दीर्घ प्रयत्नांच्या जोरावर किती विविध

समाजकार्य करूं शकते, हें सौ. इंदिराबाई देवधरांचें उदाहरण दिल्यास पटणार नाहीं काय ?

प्रस्तुत पुस्तकांत अशीं कांहीं जिवंत उदाहरणें वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाच्या प्रत्यक्ष दीर्घ परिचयांतील व्यक्तींचेंच वर्णन यांत केलेलें आहे. त्या सर्वांनीं अभावितपणें लेखकाला अत्यंत उपकृत केलेलें आहे व त्यांतून ह्या संग्रहाची निष्पत्ति झाली आहे. त्यांच्या मोठेपणाचे कित्येक पैलू लेखकाला कळूं शकले नसण्याचीहि शक्यता आहे. सुदैवानें आज यांतील सगळ्या व्यक्तीं हयात आहेत. आजपर्यंतच्याच त्यांच्या कार्याचा यांत उल्लेख आहे. त्यापुढील त्यांच्या आयुष्यांत मिळणाऱ्या संधींचा फायदा घेऊन ते याहून अधिक उच्च ध्येयें गांठतीलहि. तथापि, या घटकेला त्यांनीं स्वतःच्या उत्कट गुणांनीं समाजाला कसें भूषविलें आहे, हें दाखविण्याचा येथें मुख्य हेतु आहे.

त्याचप्रमाणें, कोणत्याहि प्रांतांतील किंवा देशांतील समाजाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास या संग्रहांत वर्णन केलेल्या व्यक्तींप्रमाणेंच तेथेंहि दिसून येतील; कांहींत जास्त तर कांहींत कमी असतील. साहजिकच ज्या समाजांत अशा व्यक्ती अधिक, तो प्रगतिपथावर आघाडीला असणार हें उघडच होय.

एकंदरीत जीवनाच्या असंख्य अंगांपैकीं कांहीं थोडींच अंगें या संग्रहांत आढळून येतील; तथापि, नमुन्यादाखल संकलित केलेल्या या छोट्या छोट्या व्यक्तिचित्रांवरून आपल्या सभोंवतालच्या ‘ लहानांतल्या मोठ्यां ’कडे पाहण्याचा एक नवीनच दृष्टिकोन अनुभवास येईल व आपलेंहि जीवित अधिक यशस्वी करण्यास या डोळसपणाची मदत होईल अशी लेखकाला आशा वाटते. निदान लेखकानें तरी तसा प्रयत्न केला आहे आणि त्याला त्याचा फायदाहि झाला आहे.

ह्या संग्रहांतील परिचय-लेख प्रथम किर्लोस्कर, स्त्री, केसरी, सह्याद्रि, उद्यम, दीपलक्ष्मी आणि भगिनी ह्यांतून प्रसिद्ध झाले होते. आतां त्यांची पुनः उजळणी करून ते “ जयां अंगीं मोठेपण ”मध्यें ग्रंथित केलेले आहेत. लेखनविषय झालेल्या सर्व व्यक्तींचें त्यांच्या अमोल सहकार्याबद्दल मी पुनः आभार मानतों.

**श्री. वा. काळे**

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | विजय मर्चंट | १ |
| २. | तारा देवधर | १२ |
| ३. | ध. रा. गाडगीळ | २१ |
| ४. | ज्योत्स्ना भोळे | ३० |
| ५. | मो. वा. चिपळूणकर | ३८ |
| ६. | मधुमालती गुणे | ४९ |
| ७. | केशवराव भोळे | ५६ |
| ८. | इंदिराबाई देवधर | ६२ |
| ९. | मालवा केळकर | ६९ |
| १०. | रोहिणी भाटे | ७७ |
| ११. | 'शॅडोलेस' जोशी | ८४ |
| १२. | शिवा दामले | ९२ |
| १३. | विमल सोहोनी | १०१ |
| १४. | माधवराव वाकडे | १०८ |



विजय मर्चेंट

[library stamp] ग्रंथ ... ठा. ...
अनुक्रम 38638 वि: चरित्र
... 9224 ... नों दि ... २५/६/६५
१

# विजय मर्चंट

कलावंतांना रंगभूमीवर किंवा पडद्यावरच पाहावें; त्यांच्या खासगी जीवनाची चौकशी न केलेलीच बरी, असें म्हणतात. तीच गोष्ट खेळाडूंची !

त्यांचा खेळ लांबूनच पाहावा; त्यांच्या फार जवळ जाऊं नये. ' दुरून डोंगर साजरे ' ह्या म्हणीप्रमाणें ' दुरून खेळाडू कलावंत साजरे ' म्हणा ना ! पण नियमाला अपवाद असतातच.

श्री. विजय मर्चंट हे जागतिक कीर्तीचे क्रिकेटपटु म्हणून सर्वांना माहीत आहेत. परंतु ' व्यक्ति ' म्हणून त्यांचा परिचय फारच थोड्यांना असेल. त्यांचा स्नेहलाभ होणें फार भाग्याची गोष्ट आहे. क्रिकेटच्या मैदानाबाहेरच्या विजय मर्चंटचें व्यक्तिदर्शन त्यांच्याविषयींचा आदर वाढवील. क्रिकेटच्या तत्त्वज्ञानाची व्याप्ति आणि त्या तत्त्वज्ञानाचें प्रत्यक्ष आचरण, ह्यांची ही हकीकत क्रिकेटच्या क्रीडांगणाच्या विशालतेची कल्पना आणून देईल. हिंदी क्रिकेटपटूंना स्वास्थ्य लाभावें, त्यांचे न्याय्य हक्क हिरावून घेतले जाऊं नयेत, त्यांच्या स्वाभिमानाला ताण पडूं नये, नियंत्रक-मंडळांच्या हस्तक्षेपाची झळ त्यांना लागूं नये ह्यासाठीं विजय मर्चंट ह्यांनीं सतत प्रयत्न केले. प्रत्यक्ष क्रीडांगणावर त्यांनीं केलेल्या नेत्रदीपक कामगिरीप्रमाणेंच ही दृष्टीआडची कामगिरीहि मोलाची आहे.

त्यांची ही कामगिरी जशी अज्ञात, तशी त्यासाठीं त्यांना द्यावी लागलेली जबर किंमतहि अज्ञात आहे. विजय मर्चंट ह्यांना ह्या बाबतींत एकाकी लढा द्यावा लागत असे, आणि त्याचा परिणाम म्हणजे एकाहि अधिकृत टेस्ट सामन्याचें नेतृत्व त्यांच्या वांट्याला येऊं शकलें नाहीं. इतके चांगले क्रिकेटचे गुण असूनहि आपण टेस्ट कॅप्टन कधीं झालों नाहीं, ह्याची त्यांना खंत वाटत नाहीं. कारण त्या मानापेक्षां आपल्या हातून घडलेल्या क्रिकेटच्या आणि क्रिकेट-खेळाडूंच्या सेवेचें समाधान त्यांना अधिक महत्त्वाचें वाटतें. "पुन्हां तारुण्य प्राप्त होऊन क्रिकेट खेळण्याची संधि मिळाली, तर मी पुन्हां अशाच नेकीने वागीन, त्याचे होतील ते परिणाम आनंदानें भोगीन" असें ते अभिमानानें म्हणूं शकतात. 'विजय मर्चंट' हें नांव टेस्ट-कॅप्टनांच्या मालिकेंत नाहीं हें त्या मालिकेला दूषण होईल; पण विजय मर्चंटच्या लौकिकास त्यानें कांहीं बाध येत नाहीं.

विजय मर्चंटच्या जीवनावर दोन गोष्टींचा विशेष परिणाम झालेला आहे : त्यांची आई आणि क्रिकेट. त्यांच्या मातोश्री मोतीबाई आतां ७२ वर्षांच्या असून आपण वाढविलेल्या रोपट्याचा समृद्ध बहर संतोषानें व कौतुकानें पाहात आहेत. शिस्त, शरीरसंपत्ति, वक्तशीरपणा आणि योग्य वर्तन ह्यांविषयीं त्यांचा विशेष कटाक्ष असे. विजयनीं त्यांचे धडे लहानपणीं जे आत्मसात केले, ते त्यांच्या अंगीं कायमचे बाणले. मातोश्रींना कोणतेंहि व्यसन, अगदीं किरकोळ वाईट खोडसुद्धां, खपत नसे. त्यामुळें, धूम्रपान आणि मद्यपान ह्यांपासून विजय मर्चंट अलिप्त राहूं शकले. ठाकरसी घराण्यांत ह्यापूर्वी कुणी क्रिकेट खेळत नसे, तरी मातोश्रींनीं विजयला क्रिकेटच्या बाबतींत प्रोत्साहन दिलें. स्वतःच्या धैर्याच्या वागणुकीनें विजयलाहि धैर्यशील बनविलें. १९३३ सालीं निकोल्स ह्या गोलंदाजाच्या एका जोरदार चेंडूचा विजयच्या हनुवटीला चांगलाच मार बसला. "विजयनें खेळ थांबवून बाहेर यावें; नाहींतर पुढच्या आणखी एखाद्या चेंडूनें त्याचे दांतच पडायचे," असा त्यांच्या फॅमिली डॉक्टरनें सल्ला दिला. पण तो मातोश्रींना पसंत पडला नाहीं. "क्रिकेट खेळायला उतरल्यावर असें अधूनमधून लागणारच; दुखापत होणारच. असा मार खाऊन खाऊनच होऊं दे त्याला चांगला टणक. तो बायल्या झालेला नाहीं मला खपायचा" असे त्यांनी उद्गार काढले. आपल्या आईची तेजस्वी शिकवण विजयनीं आपल्या

क्रिकेटमध्येंच नव्हे, तर जीवनांतहि प्रत्यक्षांत उतरविली आहे. " माझ्यामध्यें जें काय चांगलें आहे, त्याचें सर्व श्रेय माझ्या आईलाच आहे " असें ते कृतज्ञतेनें सांगतात. " माझ्यांत जें वाईट असेल, तें मात्र माझ्या करामतीचें आहे, " असेंहि ते म्हणतात.

आई-वडील आपल्या मुलांना जीवनमूल्यांचें जसें शिक्षण देऊं शकतील, तसें कोणत्याहि शाळा-कॉलेजांत मिळणार नाहीं, अशी विजय मर्चंटची अनुभव-सिद्ध श्रद्धा आहे. म्हणून, आपल्या मुलांच्या सर्वांगीण शिक्षणाकडे प्रथम-पासूनच जातीनें लक्ष देण्याचा त्यांनीं संकल्प केला आहे; आणि केलेला संकल्प कसोशीनें तडीस नेण्याबद्दल त्यांची ख्याति आहे.

आईच्यानंतर क्रिकेट हा विजयचा दुसरा गुरु. त्यांचें जीवनच क्रिकेटमय झालेलें आहे. जीवनाची रीत म्हणजे क्रिकेटचा चालता-बोलता प्रत्यक्ष अव-तारच होय. खिलाडू वृत्ति, शरीरसंपत्ति, शिस्त, संघ-भावना, ह्याखेरीज सामने जिंकतां येणारच नाहींत. आज्ञापालन, निश्चयानें पण दुसऱ्याच्या भावना न दुखवितां नेतृत्व करणें, स्वतःच्यापेक्षां संघाच्या हितास प्राधान्य देणें आणि संघाच्या यशापेक्षांहि क्रिकेटच्या थोर परंपरेला जागणें, इतरांचा दृष्टिकोन समजून घेणें, ज्याची गरज अधिक असेल त्याला मदत करणें, आपल्यापेक्षां वयानें मोठे असतील त्यांचें चुकलें तरी त्यांचा मान राखणें, सर्वांचें ऐकून घेऊन त्याच्या मंथनांतून चांगलें तें घेणें, साधेपणानें आणि सचोटीनें नेहमीं वागणें, पूर्वग्रहदूषित न होतां प्रत्येक प्रश्नाचा विचार करणें, प्रश्नाची दुसरी बाजू न ऐकतांच आपलें मत बनवून न टाकणें, स्वतःला स्वतःच शिस्त लावून घेणें—ह्या आणि इतर शेंकडों गोष्टी ते क्रिकेटपासून शिकले. अर्थात् त्यांपैकीं कितीतरी गोष्टींचें बाळकडू त्यांना लहानपणींच आईकडून मिळालेलें होतें. अशी कर्तबगार आई त्यांना लाभली आणि तिलाहि तिच्यावर तोड करणारा पुत्र लाभला, हा कपिलाषष्ठीचाच योग म्हटला पाहिजे. या संयोगामुळें केवढें तरी सामाजिक हित झालें आहे, होत आहे.

विजय मर्चंट हे १९५२ सालीं, वयाच्या ४० व्या वर्षींच टेस्ट आणि फर्स्ट क्लास क्रिकेटमधून आपण होऊन निवृत्त झाले. वास्तविक आणखी कितीतरी वर्षें ते टेस्ट सामन्यांतून पूर्ववत् चमकूं शकले असते. त्यांची तडफ आणि खेळ ह्यांत कांहींहि कमी झालेलें नव्हतें. " पण, असें निवृत्त झाल्याखेरीज

नव्या खेळाडूंना वाव कसा मिळणार? म्हणून लोक विचारतात तोंवरच निवृत्त होण्यांत गोडी आहे. 'अजूनहि कां नाहीं?' असें त्यांनीं विचारण्याची पाळी येईपर्यंत खेळत राहण्यांत अर्थ नाहीं. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत ही पद्धत अवलंबिणें इष्ट. पण, योग्य वेळींच निवृत्त होऊन चांगुलपणा राखण्याचें आपल्या भारतांत लोकांना माहीतच नाहीं, त्यांना हात धरूनच बाहेर काढावें लागतें" असें त्यांचें म्हणणें आहे.

विजय मर्चंटच्या पहिल्या अपत्याचा, म्हणजे अदितीचा जन्म ज्या दिवशीं झाला, त्याच दिवशीं त्यांनीं क्रिकेटच्या साध्या खेळांतूनहि निवृत्त होण्याचा निश्चय केला. आतां फुरसदीचा आपला सर्व वेळ कुटुंबियांच्यासाठींच राखला पाहिजे असें त्यांनीं ठरविलें, आणि त्या दिवसापासून क्रिकेट सोडलें तें कायमचेंच! "माझा विवाह बराच उशिरा झालेला आहे. माझीं मुलें माझ्या वयाच्या मानानें फारच लहान आहेत. त्यांच्या विकासाच्या काळांत मी क्रिकेट खेळत बसून कसें चालेल? त्यांच्याविषयींचीं कर्तव्यें प्रामाणिकपणें पार पाडावयाचीं, तर क्रिकेट सोडायलाच पाहिजे. माझ्या मुलांच्या शिक्षणालाच आतां माझ्या आयुष्यांत प्राधान्य आहे. माझ्या आईनें मला जे संस्कार दिले ते माझ्या मुलांतहि मला रुजवले पाहिजेत" अशी त्यांची विचारसरणी आहे.

आज, वयाच्या ५१ व्या वर्षीहि विजय मर्चंट ह्यांची प्रकृति तरुणाला लाजवील इतकी कणखर आहे. त्यांच्या हालचालींत चैतन्य आहे. वागण्यांत, बोलण्यांत, चालण्यांत उत्साह आणि तरतरी आहे. 'शरीरमाद्यं खलु धर्म-साधनम्' हें त्यांचें जणुं ब्रीदवाक्य आहे. तरुणपणीं त्यांनीं क्रिकेटप्रीत्यर्थ संयम राखला, विवाह केला नाहीं, मांसाहार त्यांनीं कधींहि घेतला नाहीं, साधें अंडेंसुद्धां त्यांना चालत नव्हतें, धूम्रपानहि त्यांना माहीत नव्हतें, जागरणें केलीं नाहींत, नृत्यसमारंभ तर दूरच राहोत! क्रिकेटपुढें त्यांना सर्व कांहीं व्यर्थ होतें. मुंबई शहरांतील कोट्याधीशाच्या घराण्यांतला हा तरुण श्रीमंतीच्या उपभोगाला अपात्र ठरला! साध्या सिनेमाचीच गोष्ट घ्या. सिनेमा पाहतांना डोळ्यांना ताण पडतो आणि खेळाला तो अपायकारक होतो, ह्या जाणिवेनें त्यांनीं सिनेमाची आवड मुद्दामच लावून घेतली नाही. विवाहानंतर मात्र पत्नीचा सहचर म्हणून ते सिनेमाला जाऊं लागले. त्यांनीं उन्हाचा चष्मा कधींच वापरला नाहीं. त्या चष्म्यामुळे उजेड आणि ऊन सहन करण्याची डोळ्यांची शक्ति कमी होते असें

त्यांचें तरुण खेळाडूंना नेहमीं सांगणें असतें. त्यांची स्वतःची दृष्टि अजूनहि तीक्ष्ण आहे; त्यांनीं आतां पुन्हां क्रिकेट खेळायचें ठरविलें तरी त्यांना पूर्वीसारखी टोलेबाजी करतां येईल.

विजय मर्चंट आतां क्रिकेट खेळत नसले तरी त्यांनीं व्यायाम सोडलेला नाहीं; ते दररोज सकाळीं एक मैलभर पळून येतात. त्याहीपेक्षां आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपलें वजन वाढूं नये, प्रकृति उत्तम राहावी, जोम टिकावा, आपली पत्नी व मुलें ह्यांच्याबाबत कर्तव्यें पार पाडण्यास आपण दीर्घ काल समर्थ राहावें, ह्यासाठीं ह्या लक्ष्मीपुत्रानें मीठ आणि साखर सोडली आहे! इतरहि खाण्यांत पथ्य पाळून त्यांनीं आपली प्रकृति गेल्या दहा वर्षांपूर्वीच्या मानानें सुधारली आहे.

विजय मर्चंट ह्यांना कोणताहि बैठा खेळ आवडत नाहीं. पत्नीनें म्हटलेंच, तर ते कधीं कधीं तिच्याबरोबर रमी खेळतात, पण त्यांतहि ते चुका करतात. मग पत्त्यांचे इतर खेळ त्यांना कुठून येणार? त्यांचें ह्या खेळाकडे विशेष लक्ष नसतें, एवढाच त्याचा अर्थ आहे. सकाळीं ८–३० ते दुपारीं १२–३० आपल्या मिलमध्ये ते जातात आणि घरीं येऊन लंच घेतल्यावर फोर्टमधील आपल्या कंपन्यांच्या मुख्य कचेरींत ते कामास जातात. त्यानंतर व्यावसायिक व सामाजिक गांठी-भेटी, जेवणें, वगैरे. ह्या दिनचर्येंत वैयक्तिक आवडीनिवडीला, लहरीला वाव नाहीं.

दिवसाचा प्रत्येक क्षण विजय मर्चंट हे पूर्वनियोजित, ठराविक पद्धतीनेंच घालवितील. गैरसोय आणि कष्ट सोसूनहि ते सर्व कांही गोष्टी कटाक्षानें वेळेवर करतील. कांहीं कारणामुळें उशीर होण्याचीं चिन्हें दिसतांच तसें तातडीनें कळवितील. ते पिकनिकला जरी गेले तरी त्याचा कार्यक्रम आधीं आंखतील आणि आगगाडी सुटायच्या आधीं पांच मिनिटें जशी घंटा देतात तशी घड्याळाकडे लक्ष ठेवून परतण्याची पूर्वसूचना देतील. आणखी थांबायचें सर्वांनीं मिळून ठरविलें तर तो नवा निर्णय झाला! साहजिकच त्यांच्याशीं वक्तशीर वागणारीं माणसें त्यांना आवडतात.

त्यांनीं ज्याला आपलें म्हटलें, त्याच्यासाठी ते वाटेल तें करतील; पैसा किंवा श्रम ह्यांबाबतींत मागें-पुढें करणार नाहींत. केवळ पैसे देऊन टाकून ते कृतार्थ समजत नाहींत; त्याचा विनियोग योजनेप्रमाणें व्हावा ह्याकडेहि ते लक्ष

देतील. त्यांच्या सहृदयतेला पद्धतशीरपणाची जोड आहे. कित्येक क्रिकेटपटूंच्या कुटुंबियांना त्यांनीं अशा रीतीनें पुन्हां चांगले दिवस प्राप्त करून दिले आहेत. पुण्यावरील महापुराच्या आपत्तींत सांपडलेल्या खेळाडूंची विचारपूस करून त्यांनीं केलेली मदत, ही ताज्या आठवणींतील आहे. श्री. हिंदळेकर आणि श्री. सदुभाऊ शिंदे ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांनीं स्वतः जातीनें त्यांच्या अंत्यविधीची व्यवस्था केली; श्री. मकरंद भावे ह्यांचें शव स्वतःच्या मोटारींतून त्यांनी मुंबईहून पुण्याला आणलें, इत्यादि गोष्टींच्या मागें केवढी तरी माणुसकी आणि तत्परता होती.

दुसऱ्याच्या मदतीला धांवून जाणें, हा विजय मर्चंटचा स्वभावधर्मच आहे. आपल्या परिचितांसाठीं आपण काय करूं शकूं, हें ते नेहमीं शोधून काढीत असतात; कुणी त्यांना सांगावें लागत नाहीं. त्यांनीं एखादी गोष्ट विशेष त्रास घेऊन केली, तरी ते तसें दिसूंहि देणार नाहींत. त्यांच्या मित्रानें त्यांना आपली एखादी अडचण कळूं देण्याची सोयच नाहीं; कारण ते तिचें निवारण केल्याखेरीज राहणार नाहींत. मित्राकडे गेल्यावर त्याचें एखादें पत्र पोस्टांत टाकावयाचें राहिलें असेल, तरी तें टाकायला घेतील !

विजय मर्चंटच्या कार्यतत्परतेचें मुख्य साधन म्हणजे त्यांची प्रचंड 'एंगेजमेंट डायरी.' तिच्या आधारें ते आगामी कित्येक दिवसांची आंखणी करून कार्यक्रमांची नोंद करतात आणि त्याप्रमाणें ते पार पडतात. दिवसाच्या प्रत्येक मिनिटाची योजना त्यांनीं आपल्या डायरींत करून ठेवलेली असते. पद्धतशीरपणाची ईर्ष्या, त्यासाठीं काटेकोर आंखणी आणि निरलस अंमलबजावणी, असा हा त्रिवेणी संगम आहे. ठराविक तारखांना, ठराविक लोकांना, ठराविक पत्रें व तारा ते पाठवितात; कारण इतरांच्या सुखदुःखाचे दिवस त्यांनीं टिपलेले असतात. आपल्या व्यावसायिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून उरलेला वेळहि आरामांत न घालवितां, ते तितक्याच कसोशीनें कारणीं लावतात.

विजय मर्चंटचा खासगी पत्रव्यवहार खूपच मोठा आहे. आपण क्रिकेटमधून कित्येक वर्षांपूर्वी निवृत्त झाल्यानंतरहि लोक आपल्याला पत्रानें विचारतात ह्याबद्दल ते स्वतःला धन्य मानतात. कारण, दृष्टीआड झालेल्यांचा विसर पडायला वेळ लागत नाहीं, अशी जगाची राहटी आहे; हवेंत उडत

असलेल्या पतंगाकडेच लोकांचें लक्ष असतें. विजय मर्चंट ह्यांची पत्रद्वारा कितीतरी जणांशीं मैत्री झाली आहे. एका तरुणीनें १९४८ मध्यें त्यांना दक्षिण भारतांतून पहिलें पत्र लिहिलें, त्याला विजय मर्चंटचें उत्तर गेलें. सुरू झालेला हा पत्रव्यवहार अजून चालू आहे. त्या तरुणीची आणि मर्चंट पतिपत्नींची भेट गेल्या वर्षी मुंबईत प्रथमच झाली.

प्रत्येक पत्राला उत्तर धाडल्याखेरीज ते राहात नाहींत आणि त्यांचीं पत्रेंहि काळजीपूर्वक लिहिलेलीं, सविस्तर अशीं असतात. त्यासाठीं इतर कामांतून सवड मिळत नाहीं, म्हणून ते मुद्दाम पहांटे पांच वाजतां उठून आपलीं पत्रें पुरीं करतात. वेळ न मिळाल्याची सबब सांगणारांना विजय मर्चंटची ही संवय निरुत्तर करील. एखादी गोष्ट विसरून राहून गेली, असें त्यांच्या बाबतींत होणें कठीण. "मी आठ दिवसांनीं काय तें कळवीन" असें त्यांनीं लिहिलें असलें, तर त्याप्रमाणें नोंद करून ठेवून ते खरोखरीच ठराविक दिवशीं पत्र पाठवतील.

विजय मर्चंट ह्यांचें संभाषणचातुर्य बहारीचें आहे. कोणाशींहि बोलतांना ते तादात्म्य पावतात आणि सहजतेनें आपुलकी व्यक्त करतात; त्यांच्या बोलण्यांत इतरांच्या विषयीं अनादराचा, टीकेचा शब्दहि कधीं येणार नाहीं. जरूर तर एखाद्या प्रश्नाचें उत्तर देणें ते सफाईनें टाळतील. प्रश्न नीट समजल्या-खेरीज उत्तराची घाई करणार नाहींत; नेहमीं अवधान राखतील; कोणतेंहि विधान ते पूर्व विचारांतींच करतील; आधाराशिवाय करणार नाहींत; त्यामुळें त्यांनीं सांगितलेल्या गोष्टींत चुका दाखविण्याचा प्रयत्न गळ्याशीं आल्याखेरीज राहात नाहीं. त्यांचें हस्ताक्षरसुद्धां किती सुंदर आणि वळणदार आहे — जणूं मोत्यांची माळ! कर्तव्यतत्परता आणि कार्यक्षमता असूनहि त्यांच्यामध्यें कठोरता नाहीं; उलट मानवता आणि सौंदर्यदृष्टि आहे.

बारा वर्षांपूर्वी एका क्रिकेटप्रेमी युवतीने त्यांच्या आयुष्यांत मोठ्या कौशल्यानें प्रवेश मिळवून विजयवरहि विजय मिळविला! त्यांच्या क्रिकेट पराक्रमावर खूष होऊन ती त्याला अभिनंदनपर पत्रें लिहूं लागली. तिच्या लेखनांतील जिव्हाळ्याचा नेमका तो परिणाम होऊन विजयनें तिला भेटण्याची इच्छा दर्शविली, आणि शेंकडो तरुणींना ह्यापूर्वी जें साध्य करतां आलें नाही तें तिनें हस्तगत केलें! सौ. प्रभाला सुखी राखण्यासाठीं विजय मर्चंट एकसारखे जपत

असतात. तिच्याप्रीत्यर्थ आपल्या कडक शिस्तीलाहि मुरड घालण्यास ते तयार होतात. हा प्रेमाचा केवढा विजय आहे! आपल्या प्रभाला आणि मुलांना आपल्या बरोबर बाहेर घेऊन जाणें विजय मर्चंटना मनापासून आवडतें.

विजय मर्चंट ह्यांनी हिंदी क्रिकेट संघांतील खेळाडू ह्या नात्यानें १९३६ मध्यें व १९४६ मध्यें इंग्लंडचा दौरा केला. १९३६ सालीं परत येतांना फ्रान्स, इटली आणि स्विझर्लंड हे युरोपांतील देशहि ते पाहून आले. १९५७ सालीं ते प्रभाला बरोबर घेऊन पुन्हा गेले. ह्या वेळीं ते दोघे वरील देशांबरोबर जर्मनी, नॉर्वे आणि इजिप्त ह्या देशांतूनहि हिंडून आले.

अदिति आणि अमर अशीं त्यांना दोन अपत्यें आहेत. विजय आपल्या पत्नीशीं स्वतःच्या भाषेंतच, गुजरातीमध्यें बोलतात. त्यांना गुजरातीचा सराव राहावा हाच यांत उद्देश. मुलें आपल्या आईशीं मातृभाषेंत म्हणजे मराठींत बोलतात. वडील आणि मुलें ह्यांचें संभाषण इंग्रजींतून होतें. इंग्रजी माध्यम असलेल्या शाळेंत मुलांना ही भाषा सोपी जावी हा त्यामागील हेतु स्पष्ट आहे.

'अमर' ह्या नांवामागें थोडा मनोरंजक इतिहास आहे. भारतांत होऊन गेलेले एक असामान्य क्रिकेटपटु कै. अमरसिंह आणि विजय मर्चंट ह्यांनीं २५ वर्षांपूर्वी आपसांत ठराव केला होता, त्याला अनुसरून विजय मर्चंट ह्यांनीं आपल्या पुत्राचें नांव 'अमर' असें ठेवलें, त्याला चार वर्षें झालीं. ह्या उलट, कै. अमरसिंहांचा पुत्र 'विजय' ह्याचा विवाह होऊन त्याला मुलगाहि झाला आहे! विजय मर्चंटला ठरावाची आपली बाजू पुरी करायला बराच वेळ लागला तरी त्या पूर्तीचा आनंद त्यांना विशेष वाटतो. दि टाइम्स ऑफ इंडियाच्या 'स्मृतिविशेष' ह्या सदरांत विजय मर्चंट आपल्या ह्या क्रिकेट-मित्राचें त्याच्या मृत्युदिनीं दरसाल आदरपूर्वक स्मरण करतात, हें कित्येकांच्या लक्षांत आलेलेंच असेल.

विजय मर्चंट आपल्या नोकरांना स्वतःच्या कुटुंबियांप्रमाणेंच वागवतात. मालक आणि नोकर एकमेकांची काळजी वाहातात. जानू आणि धर्मा हे दोघे भाऊ गेलीं १५ वर्षें त्यांच्याकडे कामाला आहेत. त्यांच्यावर सबंध घर आणि मुलें विश्वासानें सोपवून मर्चंट पति-पत्नी मुंबईबाहेरहि निर्धास्तपणें जाऊं शकतात. त्यांचे नोकर त्यांना विजयभाई म्हणतात; विजयसेठ नाहीं. त्यांच्या एका मोलकरणीच्या मुलीनें प्रेमविवाह ठरविला, पण तिच्या नियोजित वराच्या

आई-बापांनीं हुंड्यासाठीं अडवून धरलें. हें कळतांच विजय मर्चंट ह्यांनीं हुंड्याची चार आंकडी रक्कम स्वतः देऊन, त्या मुलीची इच्छा पुरविली. स्वतः मर्चंट जेव्हां विवाह-समारंभाला गेले आणि त्या मुलीला त्यांनीं शुभाशिर्वाद दिले, तेव्हां तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. " केवळ तुमच्यामुळेंच मी माझ्या प्रियकराला आज माळ घालूं शकलें, " असेंच ती आपल्या अश्रूंच्या भाषेनें विजय मर्चंटला सांगत होती. सत्पात्र अशा गरजूंना आपण मदत केली तर आपण आपलें कर्तव्यच केलें, असें ते मानतात. आंधळ्यांच्या विषयीं त्यांना विशेष कळवळा आहे. कित्येक अंधांना त्यांनीं आपल्या गिरण्यांतून सामावून घेतलें आहे.

कुटुंब-नियोजनाचा प्रसार ही त्यांच्या घराण्यांतील सर्वांच्याच शर्टिंच्याची खात्र आहे. ठाकरसी समूहांतील कामगारांसाठीं त्यांनीं सल्ला देणारें एक केंद्र आणि प्रत्यक्ष उपचार केंद्र चालविलें आहे. प्रोत्साहनादाखल शस्त्रक्रियेचा खर्च, त्यानंतर दोन दिवसांची पगारी रजा, संतति-प्रतिबंधक साधनांच्या खरेदीला ५० टक्के मदत आणि शस्त्रक्रिया करून घेणाराला ५० रु. बक्षीस, असें त्याचें स्वरूप आहे. एक मोठी राष्ट्रीय गरज भागविण्यासाठीं आपलाहि थोडा हातभार लागावा, हा त्यामागील त्यांचा हेतु.

दुसऱ्याच्या मदतीला धांवण्याच्या तत्परतेमुळें त्यांना कधींकधीं टीकाहि सहन करण्याची पाळी येते. ज्याला मदत करावी, त्याची भूक वाढतच जाते. आपल्यासाठीं व आपल्या कुटुंबियांसाठीं विजय मर्चंटनीं सर्व कांहीं करण्याचा पत्कर घ्यावा, असें त्यांना वाटूं लागतें. ठराविक मर्यादेपलीकडे जाण्याची आपली असमर्थता विजय मर्चंटनीं व्यक्त केली कीं तेच लोक उलटतात आणि कटु टीका करूं लागतात. पण असे अनुभव आले तरी विजय मर्चंट हे ' आपल्यापेक्षां जास्त गरज असणारांच्या मदतीला जाण्याच्या ' व्रतापासून परावृत्त होत नाहींत.

व्यवसायानंतर उरलेला सर्व वेळ विजय मर्चंट हे आपल्या पत्नीच्या आणि मुलांच्या सहवासांत घालवितात हें खरें असलें तरी त्याला एक मोटा अपवाद आहे. क्रिकेटचें ऋण फेडण्याच्या संधीला ते नेहमींच प्राधान्य देतात. क्रिकेटनें त्यांना दिगंत कीर्ति तर मिळवून दिलीच, पण त्याबरोबरच क्रिकेटनें त्यांच्या जीवनाला विशेष रीत लावून दिली आहे. म्हणूनच क्रिकेटविषयीं त्यांची

भावना कृतज्ञतेची आहे. "जें जें आपणासि ठावें, तें तें इतरांसि शिकवावें" ह्या उक्तीप्रमाणें क्रिकेटचा संदेश सर्वत्र पसरविण्याची एकहि संधि विजय मर्चंट सोडीत नाहींत. क्रिकेटपासून ते जें जें कांहीं शिकले, तें तें इतरांनाहि शिकायला मिळावें, ह्यासाठीं क्रिकेटसंबंधीं भाषणांचीं दूरदूरचीं निमंत्रणेंहि ते गैरसोय सोसूनहि पत्करतात. त्यांचीं भाषणें ऐकणारांवर क्रिकेटच्या तत्त्वज्ञानाचा ठसा उमटल्याखेरीज राहात नाहीं. ते किती हंसवत-खेळवत श्रोत्यांना क्रिकेटचीं जीवन-मूल्यें पटवून देतात, हें त्याचें भाषण ऐकल्याखेरीज समजणार नाहीं. अशा भाषणांसाठीं त्यांना पुष्कळ वेळां परगांवींहि जावें लागतें आणि प्रभानेंहि आपल्याबरोबर यावें अशी त्यांची इच्छा असते. प्रभाला नेहमीं त्यांच्याबरोबर जाणें शक्य होतेंच असें नाहीं. "क्रिकेटचा मी ऋणको आहे; मी त्याचें फार मोठें देणें लागतों. जगांतील सर्वश्रेष्ठ अंपायरनें मला कायमचा 'आऊट' देण्यापूर्वी तें शक्य तेवढें फेडलें पाहिजे." अशी ह्या क्रिकेटच्या वारकऱ्याची भूमिका आहे.

विजय मर्चंट हे कर्वे विद्यापीठाला ज्यांचें नांव देण्यांत आलें आहे त्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसींचे नातू; सर विठ्ठलदास ठाकरसींचे सख्खे पुतणे. ठाकरसी घराण्यांतल्या विजयला 'मर्चंट' हें आडनांव कसें प्राप्त झालें? कारण त्यांच्यांत आडनांव लावीत नाहींत. सात वर्षांचा विजय आपल्या थोरल्या बंधूंच्या बरोबर शाळेंत नांव घालण्यासाठीं गेला. त्यांच्या समवेत त्यांच्या घरचे मास्तरहि होते. शाळेच्या प्रिन्सिपॉलनीं विजयला आडनांव विचारलें, तेव्हां साहजिकच "आम्हांला आडनांव नाही; आम्हांला ठाकरसी म्हणतात" असें त्यानें उत्तर दिलें. "त्याचं आडनांव ठाकरसी" असें प्रिन्सिपॉलनें म्हणतांच, मास्तरांनीं मधें पडून दुरुस्ती केली, "ठाकरसी हें त्यांच्या आजोबांचं नांव, आडनांव नव्हे." प्रिन्सिपॉलनीं विचारलें, "त्यांचा व्यवसाय कोणता आहे?" मास्तरांनीं उत्तर दिलें, "ते मर्चंट (व्यापारी) आहेत." प्रिन्सिपॉलनीं तेंच आडनांव म्हणून टिपून घेतलें. हे दोघे बंधु, बहीण लक्ष्मी आणि धाकटा बंधु उदय हे शाळा–कॉलेजांत मर्चंट ह्या नांवानेंच वावरले. तिघांना विद्यापीठाच्या पदव्या ह्याच नांवानें मिळाल्या. व्यवसायांत पडतांना बाकीच्यांनीं आपल्या घराण्याचें नांव घेतलें. विजय आणि उदय हे क्रिकेट खेळाडू मर्चंटच राहिले. उदयहि क्रिकेट सोडल्यावर ठाकरसी झाला.

आतां फक्त विजयलाच मर्चंट हें आडनांव उरलें आहे. त्यांचें खरें संपूर्ण नांव विजयसिंह माधवजी दामोदर टाकरसी असें होईल.

विजय मर्चंट हे आपल्या चार टाकरसी बंधूंच्या समवेत व्यापार आणि कारखानदारी करतात. कित्येक गिरण्या, कारखाने व व्यवसाय ह्यांचें नेतृत्व ह्या टाकरसी समूहाकडे आहे. विजय मर्चंटच्या उद्योगधंद्याचा व्याप कांहीं लहान नाहीं. हिंदुस्थान स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स लि. आणि सरदार कॅर्ब्रॉनिक् गॅस कं. लि. ह्या दोन कंपन्यांचा संपूर्ण कारभार त्यांच्या हातीं आहे. फॅक्टरींत आणि कचेरींत त्यांना दररोज जावें लागतें आणि तेथें भरपूर काम करावें लागतें. विजय मर्चंट हे स्वतः मुंबई विद्यापीठाचे बी. कॉम्. आहेत. आपला उद्योग संभाळून ते क्रिकेटचा नुसता खेळ खेळले नाहींत; त्याची शिकवण त्यांनीं आपल्या रक्तांत भिनविली आहे. "कसोशीनें खेळत राहा!" हें त्यांच्या नोटपेपरवरील ब्रीदवाक्य त्यांच्या जीवनांतहि प्रतिबिंबित झालें आहे. क्रिकेटमध्यें क्रीज संभाळून, सरळ बॅटीनें सर्व चेंडू तटविणारा हा खेळाडू जीवनाच्या सामन्यांतहि कधीं लक्ष्मणरेषा ओलांडीत नाहीं कीं आडवी बॅट दाखवीत नाहीं. अखंड दक्षता, हें विजय मर्चंटच्या जीवनाचें सूत्र म्हणतां येईल.

२

# डॉ. तारा ( देवधर ) रॉथलेव्ह

डॉ. तारा देवधर नुकत्याच एका महिन्याच्या मुक्कामासाठीं डेन्मार्कमधून भारतांत आल्या, त्यावेळीं एका अनुभवी क्रीडा-तज्ज्ञानें त्यांच्याविषयीं खालीलप्रमाणें लिहून त्यांचा गौरव केला--"बॅडमिंटनचें फूल जाळ्यापलीकडे केवळ परत ढकलण्यांत सार्थक मानणाऱ्या बॅडमिंटन खेळाडूंच्या आजच्या पिढीला, तारा देवधरच्या स्वगृहीं आगमनानें आनंदाचें भरतें कसें येणार ? ज्यांना बॅडमिंटन कोर्टाच्या ह्या एके काळच्या सम्राज्ञीला मोठ्या डौलानें ओळीनें तीनदां राष्ट्रीय अजिंक्यपद मिळ-वतांना पाहण्याचें सद्भाग्य लाभलें आहे, त्यांना मात्र पंधरा वर्षांपूर्वीच्या सामन्यांची आठवण झाल्याविना राहणार नाहीं. चंद्रू रांगणेकर, राजा पटवर्धन, जॉर्ज लुइस, दविंदर मोहन आणि देवधर भगिनी हे तारे त्या वेळीं अशा तेजानें चमकले, कीं त्यामुळें डोळे दिपून जाऊन त्यानंतरच्या चांदण्या दृष्टींत भरेनाशा झाल्या. तारा, सुंदर आणि सुमन ह्या तिघी देवधर भगिनींचें त्या काळांत नुसतें नांव घेण्याचा अवकाश; सर्व प्रतिस्पर्धी निष्प्रभ होऊन जाऊन ह्या तिघी मिळून सर्व वेंचक अजिंक्यपदें घेऊन चालू लागायच्या. आणि त्यावेळीं प्रतिस्पर्ध्यांत कोण होतें, माहीत आहे ? मूमताझ चिनॉय ( सौ. लेटवाला ), रविबाला चितळे ( सौ. सोमण ) ह्यांसारखे खंदे खेळाडू !



ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्र. ३८८३८ वि: चरित्र
१२२५ नों दि २५/५/६५

डॉ. तारा (देवधर)
रॉथलेव्ह



प्रा. धनंजयराव गाडगीळ



ज्योत्स्ना भोळे

" अजिक्यपदांची गोष्ट सोडा; तारा देवधरची आठवण ताजी आहे ती तिच्या वेगवान, तडफदार, आक्रमक खेळामुळें; पुरुषासारख्या शक्तीनें मारलेल्या तडाख्यांमुळें; कोर्टावरील तिच्या मोकळ्या वागण्यामुळें आणि सहजतेमुळें. त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखाद्या राणीसारख्या तेजस्वीपणानें आणि आत्मविश्वासानें वावरण्याची तिची मोहक धाटणी. त्यामुळें विरोधक एकदम निष्प्रभ होत. प्रत्येक फटकाऱ्याबरोबर उडणाऱ्या त्या लांब वेण्या, पायांची ती चपलता, निर्भय पण प्रसन्न अशी ती मुद्रा, हीं सर्व तिच्या नुसत्या आठवणीनेंहि मनचक्षूंपुढें येतात आणि वाटूं लागतें, ' गेले ते बॅडमिंटनचे दिवस. "

बॅडमिंटनच्या खेळामुळें प्रथम पुढें आलेल्या आणि नंतर शास्त्रीय संशोधनक्षेत्रांत आघाडीवर असलेल्या पाश्चात्य देशांतहि अग्रेसर असलेल्या ह्या चाळीस वर्षांच्या असामान्य स्त्री-रत्नाचा यथायोग्य परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

तारामध्यें निर्भयता, बेडर वृत्ति, इत्यादि मुलींतच नव्हे, तर मुलग्यांतहि क्वचितच आढळणारे गुण उपजतच होते. तिच्या आई-वडिलांनीं त्या गुणांना वाव दिला आणि ते वाढीस लावले. तारानेंहि त्याचा सदुपयोग केला. " तारावर तिच्या आयुष्यांत त्रींच्त्र संकटें आलीं, पण प्रत्येक वेळीं तिनं त्यांवर मात केली आहे " असें तिचे वडील ' काका ' मोठ्या अभिमानानें सांगतात. ती दीड-दोन वर्षांची असतांनाच पी. वाय्. सी. जिमखान्याच्या पाण्याच्या हौदांत घसरून पडली होती. हौदाच्या पाण्यावर दोन छोटे हात हालत असलेले जिमखान्याच्या गड्यानें पाहिले व त्यानें तिला बाहेर काढलें. श्वास कोंडल्यामुळें ती अर्धा तास बेशुद्ध होती, पण सावध होतांच पूर्ववत् खेळूं लागली. लहानपणींहि ती अगदीं एकटीच कुठेंहि जायला भीत नसे. टांगे, मोटरी, बैलगाड्या, म्हशी — ह्या सर्वांना चुकवून आणि वाटा लक्षांत ठेवून ती आपल्या मामांच्याकडे ( प्रिन्सिपल करमरकर ) किंवा शाळेंत जावयाची; आई-काकांचा जीव मात्र ती सांपडेपर्यंत खालींवर होत राहायचा ! ताराच्या निर्भयतेचें आणि बाणेदारपणाचें एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे १९४२ सालचें. त्या वेळीं ती एस्. पी. कॉलेजांत शिकत होती. त्या वर्षीच्या चलेजाव चळवळींत कॉलेजसमोर गोळीबार झाला त्या वेळीं विद्यार्थ्यांचें नेतृत्व तारानें केलें होतें आणि राष्ट्रीय निशाण

घेऊन ती सर्वांच्या अग्रभागीं होती. झालेल्या लाठीहल्ल्यांत तिला बराच मार बसला होता.

तारा एक व दोन वर्षांची असतांना शिशु-प्रदर्शनांत तिला आरोग्य आणि सुदृढता ह्यांसाठीं पहिलीं बक्षिसें मिळालीं होतीं. क्रिकेट, हॉकी, व्हॉलीबॉल, टेनिस, टेबल टेनिस, बॅडमिंटन, इत्यादि खेळ ती मुलग्यांच्या बरोबर खेळूं लागली आणि त्यांत प्रवीण झाली. तिचा प्रतिस्पर्धी म्हणून खेळावें, तर ती विजयी व्हावयाची आणि भिडू म्हणून खेळून जय मिळवावा तर तिचा खेळ उठून दिसून आपल्याला दुय्यम स्थान मिळावें, असा अनुभव कित्येक तरुणांना त्या वेळीं आलेला आहे. बॅडमिंटनमध्यें तर तिची एवढी प्रगति झाली कीं, ती एम्. पी. कॉलेजांत असतांना तिनें पुरुष खेळाडूंचाहि सपशेल पराभव करून कॉलेजचें खुलें अजिंक्यपद मिळविलें होतें. आपल्या तुल्यबल पुरुषांचा पराभव करण्याचें असें, कोणत्याहि खेळांतलें, दुसरें उदाहरण अजून तरी घडल्याचें आढळत नाहीं.

तिच्या बॅडमिंटनमध्यें, आवेशाला सफाई व आकर्षकता ह्यांची जोड असल्यामुळें, तिच्या खेळाचें तेज कांहीं विशेष होतें. ओळीनें तीन वर्षें तिनें भारताची अजिंक्य महिला बॅडमिंटनपटु म्हणून अग्रस्थान विभूषित केलें होतें. तिच्या क्रीडाक्षेत्रांतील व्यक्तित्वाचें वर्णन, “ झाले बहु, होतिल बहु, परंतु ह्यासम हा ” असेंच करावें लागेल. तिचा टेनिसचा खेळहि वेगवान व आक्रमक होता; अजूनहि आहे. पण तिनें बॅडमिंटनमध्यें अधिक लक्ष घातल्यानें टेनिसच्या वांट्याला ती पुरेशी आली नाहीं.

ह्या संदर्भांत विंबल्डनचें टेनिसचें जागतिक अजिंक्यपद मिळविणाऱ्या अल्थिया गिब्सनची आठवण झाल्याविना राहात नाहीं. पण, दोघींच्यामध्यें केवढा तरी मोठा फरक आहे. अल्थिया ही हूड, उडान, पुंड अशी टॉमबॉय मुलगी होती; खेळण्यापलीकडे तिनें कांहींच केलें नाहीं; अभ्यासाचें तिला वावडें असायचें. ह्याच्या उलट, तारा ही अत्यंत सुस्वभावी, शांत, प्रेमळ, निगर्वी, अभ्यासू, मनमोकळी, सरळ वृत्तीची. इंटर सायन्समध्यें व बी. एस्सी. मध्यें ती पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाली. तिनें बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्यें एक वर्षभर बायोकेमिस्ट्रीचा अभ्यास केला. १९४५ सालीं तिनें वाटुमल शिष्यवृत्ति मिळविली. तिच्याविषयीं कौतुक असणारे त्या वेळचे

मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश, सर जॉन बोमंट, ह्यांची शिफारस तिला बरीच उपयोगी पडली.

तारानें १९४५ ते १९४७ पर्यंत अमेरिकेंतील विसकॉन्सिन विद्यापीठांत बायोकेमिस्ट्रीचा अभ्यासक्रम पुरा करून एम्. एस्‌सी. ही पदवी मिळविली. १९४८ मध्यें तिनें युनायटेड नेशन्स आणि अमेरिकन सरकार ह्यांच्या जोड सहकार्यानें चालू असलेल्या सोशल व पब्लिक हेल्थ कार्यक्रमांत भाग घेतला आणि बायोकेमिकल संशोधनाची पाहणी करण्यासाठीं सर्व अमेरिकेंत दौरा करून प्रत्यक्ष अनुभव मिळविला. १९४९ ते १९५२ मध्यें तिनें ह्या शास्त्रविषयक पुढचा अभ्यास व संशोधन करून पेन्सिल्व्हानिया स्टेट युनिव्हर्सिटीची पी.एच्. डी. ही पदवी मिळविली. गृहकृत्यांची व मुलांची जबाबदारीहि तिनें या वेळीं नीट सांभाळली होती.

मध्यंतरी, १९४७ साली अमेरिकेंत तिच्याचबरोबर काम करणाऱ्या एका दक्षिण भारतीय डॉक्टरबरोबर ताराचा विवाह झाला. आणि १९४९ मध्यें तिला पुणें येथें मुलगी होऊन तिचें नांव शीला असें ठेवण्यांत आलें. ताराचा ह्या गृहस्थाशीं झालेला विवाह तिला सुखकारक झाला नाहीं; तिला नाइलाजानें कोर्टांत त्याचें गैरवर्तन सिद्ध करून घटस्फोट घ्यावा लागला आणि नंतर तिनें कु. शीलाला स्वतःकडे घेतलें. दोन वर्षांनीं, तिनें आपले डेन्मार्कचे सहाध्यायी डॉ. जॉर्ज रॉथलेव्ह ह्यांच्याशीं विवाह केला आणि ती डेन्मार्कमध्यें पतिगृहीं राहावयास गेली. एका भारतीयाशीं पहिला विवाह, नंतर घटस्फोट, डॉ. रॉथलेव्हशीं पुनर्विवाह——ह्या सर्व गोष्टी तिनें आई-वडिलांच्या सल्ल्यानें व संमतीनेच केल्या, यावरून त्या सर्वांचा दृष्टिकोन कसा विशाल आहे हें दिसून येतें. आई-वडिलांचें तारावरील प्रेम आणि तिच्या विवेकावरील व तारतम्यावरील विश्वास, ह्यांमुळेंच हें शक्य झालें. ताराला खूपच आधार वाटला आणि धीर आला. तिचें नवें वैवाहिक जीवन 'नील्स' ह्या पुत्राच्या आगमनानें प्रफुल्लित होतें न होतें तोंच तिच्यावर काळाची कुऱ्हाड कोसळली. स्कीइंग ह्या बर्फावरील खेळांत तरबेज असलेल्या जॉर्जला स्कीइंग करीत असतांनाच अचानक मृत्यु आला.

आई–वडील आणि तिघी बहिणी भारतांत आणि धाकटा भाऊ क्लीव्हलँड (ओहिओ) येथें पीएच्. डी. साठीं अमेरिकेंत; तारा डेन्मार्कमध्यें अशा

परिस्थितींत एकाकी ! पण प्रसंगाला धीरानें तोंड देणें, परिस्थितीवर मात करणें हा तिचा उपजत गुण. तो कसोटीला उतरला; त्याचा प्रभाव आतांहि दिसून आला. आईवडिलांना वाटलें, कीं आपल्या ताराला भारतांत आपल्याजवळ आणावें; पण मग शरदची व त्याच्या पत्नीची – जॉयसची – भेट कशी होणार ? त्यापेक्षां आई–वडील आणि शरद–जॉयस हेच डेन्मार्कमध्यें कोपनहेगला आले तर ? तारानें ह्याप्रमाणें सर्वांची एकत्र भेट घडवून आणली. तिनेंच आई–वडिलांची येण्या-जाण्याची सर्व व्यवस्था डेन्मार्कमधूनच केली. तिच्या मोठ्या फ्लॅटमध्यें हीं सर्वजण एक महिनाभर राहिलीं, आणि ताराचें मनोधैर्य समक्ष पाहून, काळजी थोडी कमी होऊन, आपापल्या घरीं परतलीं.

ह्या भेटीमुळें दुसरे अनेक मोठे फायदे झाले. एक तर, आई-वडिलांना डेन्मार्क देश आणि ताराची परिस्थिति प्रत्यक्ष पाहतां आली. तिचा मोठा मित्रवर्ग, अतिशय प्रेमळ सासूसासरे, नातवंडांच्या शिक्षणाची उत्कृष्ट सोय इत्यादि गोष्टींचा अनुभव आल्यानें त्यांची चिंतेची तीव्रता कमी झाली. दुसरी गोष्ट म्हणजे मुलगा शरद व सून जॉयस ह्यांचीहि भेट होऊन सून अमेरिकन असली तरी शरदला अनुरूप आणि आदर्श हिंदी सुनेप्रमाणेंच नम्र व प्रेमळ आहे हें दिसून त्यांना समाधान वाटलें.

डॉ. जॉर्ज रॉथलेव्ह ह्यांच्या मृत्यूनंतर श्रीमती तारा रॉथलेव्ह ह्यांनीं कोपन-हेगनमध्यें नॉर्डिस्क इन्सुलिन लॅबोरेटरींत इन्सुलिनवर संशोधन सुरू केलें आणि त्या तेथेंच एका प्रयोगशाळेच्या प्रमुख झाल्या. ( गेल्या वर्षापासून त्या कोपन-हेगन येथील ' स्टॅटेन्स सीरमिन्स्टिटयूट ' नांवाच्या औषधि संशोधन संस्थेंत काम करीत आहेत. ) अमेरिकेंत पीएच्. डी. पदवी मिळविल्यानंतर त्यांनीं बॉस्टन-मधील सुप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठांत इन्सुलिनवर संशोधन केलें होतें. तेंच काम त्यांनीं कोपनहेगन येथें चालू ठेवून त्याचे निष्कर्ष बायोकेमिस्ट्रीला वाहिलेल्या मासिकांतून प्रसिद्ध केले आहेत.

डॉ. तारा रॉथलेव्ह ह्यांच्या नॉर्डिस्क इन्सुलिन लॅबोरेटरीची स्थापना कॅनडांतील डॉ. बेस्ट व डॉ. बँटिंग ह्यांनीं इन्सुलिनचा शोध लावल्यानंतर लवकरच करण्यांत आली. अजूनहि युरोपांतील प्रमुख इन्सुलिन-उत्पादकांत तिची गणना होते. ह्या कारखान्याला जोडून मधुमेहाच्या रोग्यांचें एक मोठें इस्पितळहि चालविण्यांत येतें आणि त्यालाच जोडलेली एक मोठी संशोधन–

शाळाहि आहे. तिच्या तीन शाखांपैकीं एका शाखेच्या डॉ. तारा ह्या प्रमुख होत्या. शेंकडों डॉक्टर्स, बायोकेमिस्टस्, केमिकल इंजिनिअर्स ह्या प्रचंड संस्थेमध्यें कार्य करीत आहेत. केवळ इन्सुलिनच नव्हे, तर इतर प्रोटीन्स, हार्मोन्स व बायोकेमिकल पदार्थविषयक संशोधन येथें चालतें.

ह्याविषयीं माहिती देतांना डॉ. तारा म्हणाल्या—

"मधुमेहाची व्यथा असणारांना उपचार म्हणून इन्सुलिननामक द्रव्य टोंचतात. टोंचल्यावर, थोड्याफार अवधींतच तें शरीरांत वापरलें जातें व जरूर पडेल त्याप्रमाणें पुन्हां टोंचणें भाग पडतें. शरीरांत दीर्घ काल कार्यकारी स्वरूपांत तें राहूं शकत नाहीं. दीर्घ काल प्रभावी राहण्याचा गुण त्याच्या अंगीं यावा, ह्या दृष्टीनें त्याचें एखाद्या सोयिस्कर, रासायनिक पदार्थांत रूपांतर करतां येईल काय, हें पाहणें हा माझ्या संशोधनाचा एक विषय होता. असा गुण असणाऱ्या एका पदार्थाचें जागतिक पेटंट आमच्या प्रयोगशाळेस मिळालेलें आहे. ह्या इन्सुलिन प्रकारास 'रिटार्ड इन्सुलिन' किंवा एनपीएच इन्सुलिन असें म्हणतात.

"माझ्या संशोधनाचा दुसरा एक विषय म्हणजे घोड्याच्या पॅंक्रियास ग्रंथींपासून मिळणाऱ्या इन्सुलिनची घटना ठरविणें हा होय. ह्या इन्सुलिनचा अणुभार ६००० आहे, म्हणजे याचा सर्वांत सूक्ष्म कण हैड्रोजनच्या सर्वांत सूक्ष्म कणापेक्षां ६००० पट जड आहे. यामध्यें अनेक अमिनो नांवाचीं आम्लें (ॲसिड्स) संयोग रूपानें समाविष्ट आहेत. सर्व प्राण्यांत इन्सुलिन असतें व त्यामध्यें असणारीं आम्लेंहि बहुतेक तींच असतात. परंतु, तीं ज्या अनुक्रमानें एकमेकांशीं संयोग पावलेलीं असतात, तो अनुक्रम वेगवेगळा असतो. केंब्रिज विद्यापीठाचे डॉ. सँगर ह्यांनीं इन्सुलिनची घटना प्रथमच विशद करण्याची कामगिरी बजावली व त्याबद्दल त्यांना रसायनशास्त्राचें नोबेल पारितोषिक मिळालें. त्यांनीं मेंढीच्या इन्सुलिनवर काम केलें; मीं घोड्याच्या इन्सुलिनसंबंधीं संशोधन चालविलें."

अमेरिकेंत असतांना ताराला अभ्यास व संशोधन ह्यांमुळें खेळण्यास फारसा वेळ मिळाला नव्हता, तरीसुद्धां विसकॉनसिन स्टेटच्या बॅडमिंटन सामन्यांत तिनें अजिंक्यपद मिळविलें होतें. पण, त्या बॅडमिंटनपेक्षां टेनिसच जास्त खेळत. डेन्मार्कमध्यें त्या दोन्हीं खेळ खेळतात आणि स्कीइंग हा

बर्फावरील खेळहि त्यांच्या आवडीचा झाला आहे.

शीला व नील्स ह्यांनाहि स्कीइंगचा आत्तांपासूनच छंद आहे. स्कीइंगचा खेळ आपल्या इकडे अपरिचित असल्यामुळें मी त्यांना त्याविषयीं माहिती विचारतां, त्या म्हणाल्या, " डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन व फिनलंड ह्या स्कँडिनेव्हिअन देशांत स्कीइंग अतिशय लोकप्रिय आहे. मी हा खेळ अमेरिकेंत शिकलें. स्कीइंग, स्केटिंग, हे बर्फावरील खेळ अवघड नाहींत, पण त्यांत तोल राखणें अत्यंत आवश्यक असतें. लहान वयांत स्नायु लवचिक असतात त्या वेळीं, हा खेळ शिकणें सोपें जातें. नॉर्वेचा तर स्कीइंग हा राष्ट्रीय खेळ आहे आणि त्यांत ७० वर्षांपर्यंतचे म्हातारेसुद्धां हौसेनें भाग घेतात. हिंवाळ्यांत दररोज संध्याकाळीं आणि आठवड्याच्या सुट्टींत लोकांच्या झुंडीच्या झुंडी डोंगरावर सर्व सामग्री घेऊन जात असतात. स्कीज, स्कीइंगचे पोल्स, स्कीइंग बूट, अशी सामग्री भाड्यानेंहि घेतां येते. बर्फावरची ही क्रीडा अत्यंत आल्हादकारक वाटते. "

डॉ. तारानें युरोपियन संगीताचे—विशेषतः क्लासिकल—अभ्याक्रम पुरे करून शास्त्रोक्त शिक्षण घेतलें आहे. आणि त्या संगीताचा त्यांना आतां चांगलाच नाद लागला आहे. त्यांना स्वतःला फारसें गातां किंवा वाजवितां येत नाहीं, पण संगीताचें रहस्य उत्तम समजतें. बेथोव्हेन, चॅकोव्हॉस्की, ब्राह्मस् इत्यादींच्या रचनेचें अभिजात संगीत त्यांना अतिशय आवडतें. त्यांच्याजवळ टेप रेकॉर्डर, लॉंग प्लेइंग रेकॉर्ड प्लेअर व ध्वनिमुद्रिकांचा मोठा संग्रह आहे, हें सांगावयास नकोच. हिंदी व मराठी ध्वनिमुद्रिकाहि त्यांनीं बऱ्याच जमविल्या आहेत.

त्यांची शीला ही आतां दहा वर्षांची झाली असून ती पांचव्या इयत्तेंत शिकत आहे. तिनें शाळेंत आपला पहिला नंबर अजून कायम राखला आहे. गर्ल गाइड्सच्या कार्यक्रमांत ती हौसेनें भाग घेते. तिला गायन-वादनाची विशेष आवड असून ती नियमानें पियानो वाजविण्याचें शिक्षण घेते व त्याची मेहनत करते. धाकटा नील्स हा पांच वर्षांचा झाला असून तो किंडरगार्टनमध्यें जातो. मोटर, विमान इत्यादींच्या रचनेबद्दल त्याला विलक्षण कुतूहल असून त्यांच्या यांत्रिक रचनेविषयीं त्याचे प्रश्न उत्तर देण्यास अवघडच जातात; त्यासाठीं त्याच्या आईनें मेकॅनिक्सचा अभ्यास सुरू केला आहे. डेन्मार्क हा देश लहान असल्यानें आणि तेथील लोकांचा शेजारच्या देशांतील लोकांशीं

वराच संबंध येत असल्यामुळें तेथील सर्वच विद्यार्थ्यांना डॅनिशबरोबर जर्मन, फरेंच व स्वीडिश ह्या भाषा शिकवण्यांत येतात; शीला इंग्रजीहि चांगलें बोलते.

डॉ. ताराचे सासरे कागदाच्या एका गिरणीचे संचालक आहेत. सासू-सासरे कोपनहेगनपासून सुमारें शंभर मैल दूर असलेल्या नेस्टव्हिड ह्या गांवीं राहतात. त्यांचा आपल्या ह्या सुनेवर अतिशय लोभ आहे. आपले व्याही व विहीण, देवधर पति-पत्नी ह्यांच्याशीं ते नेहमीं पत्रव्यवहार करतात. ताराचे आई-वडील तिला भेटण्यासाठीं डेन्मार्कला गेले होते, तेव्हां त्यांचें त्यांनीं अत्यंत आपुलकीनें स्वागत करून योग्य प्रकारें सांत्वनहि केलें.

पाश्चात्य पद्धतीच्या जीवनाशीं समरस होऊनहि डॉ. ताराचें मन भारतीयच आहे. वेगवेगळ्या प्रसंगीं होणाऱ्या सभांतून त्या भारताविषयीं माहिती सांगतात; हिंदी वस्तूंच्या प्रदर्शनांत भाग घेतात. बंगालमधील दुष्काळाच्या वेळीं त्यांनीं अमेरिकेंत अल्पसे फंड जमवून भारतांत धाडले होते आणि " केअर " संस्थे तर्फे अमेरिकन तांदळाची पोतीं येथील अनाथांच्या संस्थांसाठीं पाठविलीं होतीं. डेन्मार्कमधील डॅनिश–इंडियन सोसायटीच्या कामकाजांत त्या आस्थेनें भाग घेतात.

देवधर पति-पत्नींची तारा ही सर्वांत मोठी मुलगी. तिनें आपल्या असामान्य गुणांनीं उत्कृष्ट लौकिक मिळवून आणि कठोर प्रसंगांना निर्भयतेनें सामना देऊन आपल्या मातापितरांना धन्य केलें आहे इतकेंच नव्हे, तर कर्तबगार ज्येष्ठ पुत्राप्रमाणें जबाबदारीनें कित्येक गोष्टी करून देवधर कुटुंबाला मोलाची मदत केली आहे. अमेरिकेंत असतांना, तिनें भावंडांतल्या धाकटा शरद व बहीण श्यामा ह्यांना शिष्यवृत्या मिळवून देऊन त्यांची तेथील उच्च शिक्षणाची व्यवस्था केली. स्वतःच्या कौटुंबिक आघातांनीं दुसरी एखादी स्त्री असहाय्य होऊन बसली असती. डॉ. तारानें, डेन्मार्कसारख्या भारतीयांना अपरिचित अशा उत्तर युरोपीय देशांत उत्कृष्ट कीर्ति संपादन करून, आपल्या मनाच्या समतोलपणाची प्रचीति आणून देऊन, आई-वडिलांनाच धीर दिला. अशा आपल्या ताराबद्दल सौ. इंदिराबाईंना व काकांना अलोट प्रेम, कौतुक आणि अभिमान वाटतो, त्यांत काय नवल ? ताराचें त्यांनीं केलेलें संगोपन व संवर्धन, त्यांचा व्यापक दृष्टिकोन, त्यांचें प्रोत्साहन, त्यांची हार्दिक सहानुभूति, ह्या सर्वांचें

योग्य चीज तारानें करून दाखविलें आहे, ह्यांत शंका नाहीं.

"तुमच्या शिक्षणानंतर तुम्हीं अमेरिकेंत किंवा युरोपांत राहण्याचें कसें ठरविलें ?" ह्या प्रश्नाचें त्यांनीं दिलेलें उत्तर अर्थपूर्ण आहे. त्या म्हणाल्या, "मीं भारतांत येण्यास साहजिकच उत्सुक होतें. त्या दृष्टीनें मीं प्रयत्नहि पुष्कळ केले पण मीं तेथून भारतीय अधिकाऱ्यांना व व्यक्तींना पाठविलेल्या बहुतेक पत्रांची साधी पोंचसुद्धां मला मिळूं शकली नाहीं. त्यामुळें माझा नाइलाज झाला. अध्यक्ष आयसेनहॉवरनासुद्धां कुणीं पत्र धाडलें, तरी त्याचें उत्तर तावडतोब येतें, असा अमेरिकेंतला अनुभव ! आपल्या भारतीयांची ही अनास्था मला खटकली आणि अमेरिकन कार्यपद्धतीची छाप माझ्यावर साहजिकच बसली. आई-काकांनीं माझ्यावर भारतांत परत येण्याचें दडपण आणलें नाहीं, हा त्यांचा मोठेपणा."

पाश्चात्य देशांत शिक्षणासाठीं जाणाऱ्या कित्येक विद्यार्थ्यांवर त्यांचें शिक्षण वाया जाण्याची पाळी येते. स्वावलंबनानें, हिंमतीनें आयुष्यक्रम आंखून पाश्चात्य देशांतील प्रमुख संशोधनशाळेंत मोठें मानाचें स्थान मिळविणाऱ्या डॉ. तारा देवधरचें म्हणूनच विशेष महत्त्व आहे. घटस्फोट आणि वैधव्य ह्या दोन्ही आपत्तींना तोंड देऊन, आपलें जीवन स्वावलंबनानें आणि धैर्यानें यशस्वी केलेल्या एका सुशील, कर्तृत्ववान व अपराजित महाराष्ट्रीय महिलेची ही रोमांचित करणारी, चैतन्यकारक कहाणी आहे.

## ३

# प्रा. धनंजयराव गाडगीळ

समाजांत मान्यता पावलेल्या महाराष्ट्रीयांचा आपण विचार केला, तर आपणांस काय आढळतें ? बहुतेकांच्या लौकिकाचें प्रमुख कारण त्यांनीं वेगवेगळीं मानाचीं व महत्त्वाचीं स्थानें भूषविलीं, हेंच आहे. सरकारी किंवा निम-सरकारी संस्थांतून कित्येकांनीं मोठाल्या कामगिऱ्या पार पाडल्या, पण त्या संस्थांची व उपक्रमांची आरंभापासून जोपासना व वाढ त्यांनीं बहुधा केलेली नव्हती आणि त्या कार्याशीं ते एकरूप झालेले नव्हते. तें त्यांनीं जीवितकार्य मानलेलें नव्हतेंच. संस्था सोडली कीं तेथील कार्यहि संपलें, नव्या संस्थेंत नवें कार्य पत्करलें, पण सर्व कार्ये कसोशीनें व कर्तव्यबुद्धीनें केलीं, अशी त्यांची उत्कर्षगति होती.

प्राध्यापक धनंजयराव गाडगीळ ह्यांचें वैशिष्ट्य असें कीं त्यांनीं इतरांच्या पगारी कामगिऱ्या कधींच केल्या नाहींत. कधीं कुणाची नोकरी पत्करून स्वातंत्र्य गमविण्याचा आणि मिळतें घेण्याचा प्रसंग स्वतःवर ओढवून घेतला नाहीं. गोखले राजकारण-अर्थशास्त्र संशोधन मंदिर ( गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स ), ह्या संस्थेशीं तिच्या स्थापनेपासून ते एकरूप झाले. एकाच संस्थेच्या कार्याला त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें; सार्वजनिक धोरणाच्या आंखणीला व अंमलबजावणीला सामाजिक व आर्थिक संशोधनाची

व पाहण्यांची आवश्यकता असते, हें त्यांनीं आपल्या प्रत्यक्ष कार्यानें पटवून दिलें आणि वैशिष्ट्यपूर्ण, उच्च दर्जाच्या कामगिरीनें इन्स्टिट्यूटला मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. आज गोखले इन्स्टिट्यूटकडे मध्यवर्ती व राज्य सरकारांची संशोधनाचीं व पाहण्यांचीं कामें येत असून इन्स्टिट्यूटच्या अधिकाऱ्यांना जगांतील वेगवेगळ्या देशांकडून आर्थिक सल्लामसलतीसाठीं निमंत्रणें येत आहेत.

सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीच्या आवारांत दोन खोल्यांत सुरू झालेल्या ह्या संस्थेनें आतां स्वतःच्या प्रचंड इमारती उभारून, ग्रंथशाळा वाढवून, आंकडेशास्त्रीय आधुनिक उपकरणें बसवून आणि तज्ज्ञ सहाय्यक नेमून त्या आवाराचा कायापालट केला आहे.

पूर्वी संस्थेचें वार्षिक अंदाजपत्रक ५,००० रुपयांचें असे; आतां तें ३,००,००० रुपयांचें झालें आहे आणि पूर्वी फक्त एक कारकून होता; आतां शिपाई वगैरे सेवकांची संख्या जवळ-जवळ १०० आहे. संशोधनकार्यांत निमग्न असणारे ७५ पर्यंत आहेत.

गोखले इन्स्टिट्यूटला जगाच्या नकाशांतहि प्रमुखस्थान प्राप्त होऊन, तिला फोर्ड फौंडेशनकडून सुमारें २४ लक्ष रुपयांची देणगी मिळाली, ही धनंजय-रावांच्या कार्याचीच ग्वाही आहे. सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे जनक नामदार गोखले ह्यांच्या नांवानें रा. ब. काळे यांनीं निर्माण केलेल्या गोखले इन्स्टिट्यूटनें आपल्या कार्यानें नामदारांच्या नांवाचा संबंध सार्थ केला आहे, आणि योगायोग असा कीं, लोकमान्य टिळकांचे अभिमानी धनंजयराव हे त्याला कारणीभूत आहेत !

गोखले इन्स्टिट्यूटचें कार्य कितीहि व्यापक आणि महत्त्वाचें असलें, तरी धनंजयरावांच्या कार्याचा तो केवळ एक भाग आहे. सहकारी चळवळीवर त्यांची पूर्ण निष्ठा आहे आणि सहकारी संघटनेमार्फत ग्रामीण आर्थिक प्रगति घडवून आणण्याची त्यांची कामगिरीहि अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शेतकऱ्यांच्या पतपुरवठ्यास सरकारी व रिझर्व्ह बँकेच्या संपत्तीचा आतां मोठा हातभार लागण्यास प्रारंभ झाला आहे, त्यास धनंजयरावांची दूरदृष्टि व चिकाटी मुख्यतः कारणीभूत आहे. साखर-कारखान्यांची सहकारी तत्त्वावर उभारणी करण्याचा पहिला प्रयोग त्यांच्याच नेतृत्वाखालीं व मार्गदर्शनाखालीं यशस्वी झाला. त्यांनीं मांडणी घालून दिली, तिचें अनुकरण आतां सर्वत्र होत आहे.

सहकारी साखर कारखान्याची कल्पनाहि ज्यावेळीं स्वप्नवत् वाटत होती, त्या वेळीं धनंजयरावांनीं नेटानें, विश्वासपूर्वक तिचा पाठपुरावा करून केवढें तरी व्यापक आर्थिक क्षेत्र शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिलें.

लोकशाहीच्या व सहकारी कार्यपद्धतीच्या तत्त्वांबद्दल इष्ट तेवढा आग्रह धरूनहि, आर्थिक नियोजनाच्या सांच्यांत बसविण्यास आवश्यक इतका मोठा बदल सहकारी चळवळींत धनंजयरावांनीं घडवून आणला. महाराष्ट्रजीवनाचा गाभा जो मराठा शेतकरी, त्याच्या निश्चित, नियोजित उन्नतीच्या योजनांच्या आड येणाऱ्या संकुचित, सोवळेपणाच्या, स्वायत्ततेच्या, 'अविचारी' कल्पनांना त्यांनीं कसून विरोध केला.

"सहकारी तत्त्वांना मुरड घातली नाहीं, तर घरीं गंगा येऊनहि तींत स्नान न करण्याचें करंटेपण आपण पत्करूं" अशा कडक शब्दांत त्यांनीं आपल्या व्यावहारिक धोरणाचा हिरीरीनें पुरस्कार केला. अगदीं थोडें कां होईना, पण पूर्णपणें स्वतंत्र व स्वेच्छेनें घडून आलेलें कामच खरें महत्त्वाचें, ह्या जुन्या कल्पनेचा त्यांनीं त्याग करायला लावला; सबंध समाजाच्या परिवर्तनाची जाणीव निर्माण केली.

पुणें विद्यापीठाची स्थापना व वाढ ह्या संबंधांतील त्यांचें कार्य, भारतीय अर्थनियोजन मंडळाच्या अर्थशास्त्र–सल्लागार समितीचें सभासदत्व, रिझर्व्ह बॅंकेच्या संचालक मंडळाचें सभासदत्व, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचें धुरीणत्व, अपुरा विकास झालेल्या देशांच्या उद्धाराच्या उपययोजनेबाबत युनायटेड नेशन्सच्या समितीमधील कामगिरी, त्यांची ग्रंथनिष्पत्ति, इत्यादि गोष्टींचा येथें फक्त उल्लेखच करणें शक्य आहे. इन्स्टिटयूटचें नित्याचें काम कसोशीनें पार पाडून केलेल्या ह्या व इतर कित्येक कामगिऱ्यांचें मोल इतकें मोठें आहे कीं, तें एकएकटें कामहि थोरपणा देण्यास पुरेसें आहे ! ह्या सर्व जागा कामाच्या आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शोभेसाठीं जागा पत्करण्यास धनंजयरावांची कधींच तयारी नसते. सरकारला सल्ला देणाऱ्या कित्येक मंडळांवर त्यांनीं कामें केलीं. रुचेल तो सल्ला देण्यापेक्षां खऱ्या हिताचाच सल्ला ते देत आणि तो मानला जात नाहीं असें अनुभवाला येतांच ते त्यांतून बाहेर पडत. कमॉडिटीज प्राइसेस बोर्डांतून ते १९४७ सालीं ह्याच कारणामुळें बाहेर पडले. धनंजयराव थोडे जरी लवचीक असते, तरी ते केव्हांच रिझर्व्ह बॅंकेचे गव्हर्नर आणि

भारताचे अर्थमंत्री होऊन गेले असते !

धनंजयरावांचे श्वशुर कै. रावबहादुर काळे हे प्रागतिक मताचे, कर्ते सुधारक होते. कै. कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांच्या शिक्षणविषयक व सामाजिक कार्याच्या कौतुकांतून त्या दोघांमध्यें मैत्री निर्माण झाली आणि कै. रावबहादूर काळे हे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. धनंजयरावांनाहि कर्मवीरांच्या कार्याबद्दल आत्मीयता असून ते गेलीं कितीतरी वर्षे रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व विश्वस्त आहेत. कर्मवीर पाटील आणि धनंजयराव ह्यांचे वैयक्तिक संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते आणि पुण्यास आल्यावर कर्मवीर हे गाडगीळ पति-पत्नींची भेट घेतल्याविना सहसा राहत नसत. धनंजयरावांनीं रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास केवळ सल्लामसलतीनेच नव्हे तर आर्थिक मदत मिळवून देऊनहि फार मोठा हातभार लावला आहे. कर्मवीरांच्या कार्याचें महत्त्व धनंजयरावांनीं फार पूर्वीच जाणलें व तें आपलेंच कार्य मानलें. त्याला आपुलकीनें सर्वतोपरि मदत केली. जातिभेदाला थारा नसलेल्या वातावरणांतच धनंजयरावांचा संस्कारक्षम काळ गेला आणि त्याला बुद्धिनिष्ठतेची व समाज-हिताच्या तळमळीची जोड मिळाली, त्याचा हा सुपरिणाम होय.

धनंजयराव हे नागपूर येथील सुप्रसिद्ध वकील कै. रामचंद्र भार्गव गाडगीळ व कै. सौ. सीताबाई गाडगीळ ह्यांचे एकुलते एक चिरंजीव. त्यांचा जन्म नाशिक येथें १० एप्रिल, १९०१ ह्या दिवशीं झाला व शालेय शिक्षण नाग-पूरच्या पटवर्धन हायस्कुलांत झालें. सीनियर केंब्रिजची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांना आय्. सी. एस्. साठीं इंग्लंडला पाठविण्यांत आलें, पण तेथें बी. ए. झाल्यावर त्यांनीं त्या परीक्षेला न बसण्याचा, सरकारी नोकरी जन्मभर न करण्याचा आपला निश्चय आईवडिलांना कळविला. ते दोघे अतिशय खट्टू झाले. आपला धनंजय आय्. सी. एस्. व्हावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्या वेळीं त्यांना आपल्या मुलाच्या ध्येयवादाची आणि निष्ठेची काय कल्पना असणार !

धनंजयरावांनीं केंब्रिज येथील क्वीन्स कॉलेजांत अभ्यास पुरा करून एम्. ए. व एम्. लिट्. ह्या पदव्या मिळविल्या. ते १९२३ सालीं भारताला परत आले आणि सुरतच्या एम्. टी. बी. आर्टस् कॉलेजचे प्राचार्य होण्यापूर्वी त्यांनीं मुंबई येथें अर्थखात्यांत कांहीं काळ काम केलें. गोखले इन्स्टिट्यूटची स्थापना

झाल्यावर १९३० सालीं ते तिचे डायरेक्टर बनले. आपल्या वडिलांचा कांहींसा अबोल मार्मिकपणा आणि आईचा करारीपणा व कर्तबगारी ह्यांचा जो वारसा धनंजयरावांना मिळाला, त्यांत त्यांनीं कितीतरी भर घातली हें पुढें दिसून आलें.

धनंजयरावांचा विवाह १९२७ सालीं सातारचे सुप्रसिद्ध कायदेपंडित रावबहादुर रावजी रामचंद्र काळे ह्यांच्या कु. सुशीला ह्या एफ्. वाय्. पास झालेल्या एकुलत्या एक कन्येशीं होऊन, त्यांना अनुरूप अशी भार्या लाभली. सौ. प्रमिलाबाईनीं आपल्या पतीशींच नव्हे, तर त्यांच्या कार्याशीं तन्मय होऊन गृहिणीचा एक मोठा आदर्श निर्माण केला आहे. त्यांचें स्वतःचें सामाजिक सेवेचें कार्य अतिशय मोठें आहे. त्यांनीं स्वतःला त्या कार्याला तळमळीनें वाहून घेतलें आहे. पण त्यांना प्रसिद्धी नको असल्यामुळें त्यांच्या कामगिरीचा आणि दातृत्वाचा संबंधितांखेरीज इतरांना परिचय नाहीं. आपल्या आई-वडिलांनीं निवडलेलीच ही वधू धयंजयरावांनीं पसंत केली; हा संयोग उभयपक्षी हितावह आणि अभिमानास्पद झाला आहे.

धनंजयराव हे आई-वडिलांचे एकुलते एक चिरंजीव असले, तरी त्यांचे लाड करण्यांत आलेले नव्हते. नातेवाइकांच्या इतर मुलामुलींत ते रमायचे. लहानपणचा धनंजय चळवळ्या, धडपड्या होता; नेहमीं त्याला खोक पडायची नाहीं तर गुढगा फुटायचा, असें सांगतात. त्यांच्या साधेपणामुळें त्यांच्याशीं वागतांना कुणालाहि भीति वाटायची नाहीं. त्यांच्या जुन्या स्वयंपाकिणीचा मुलगा अजूनहि " अरे धनंजय " अशी त्यांना हांक मारूं शकतो !

धनंजयरावांना जरी पुणेकरांनीं आपले मानलें असलें, तरी ते मनानें अस्सल नागपुरी आहेत. नागपूरचा त्यांना अतिशय अभिमान आहे. त्यांची वृत्ति पूर्णपणें नागपुरी आहे. डेक्कन क्वीनमध्यें ते ज्येष्ठपणाची जबाबदारी हौसनें, आपण होऊन पत्करून जवळपास ओळखीचे असतील त्या सर्वांना चहा-पेय देतील, बिलाचे पैसे न चुकतां स्वतः देतील.

धनंजयरावांचें रेशीमकांठी धोतर आणि लालभडक जोडा त्यांच्या नागपूरच्या अभिमानाचेंच प्रतीक होतें. त्यांनीं इंग्लंडमध्यें आपल्या तरुणपणचीं पांच वर्षे घालविलीं, तरी तेथील धूम्रपान त्यांनीं येथें आणलें नाहीं आणि इंग्रजी पोशाखाचा येथें अंगीकार केला नाहीं. टेनिस खेळतांना ते पँट घालीत असत, तें खेळाला आवश्यक म्हणूनच. ते लहानपणापासूनच साधे आहेत; मोठेपणाला

उठाव आणण्यासाठीं त्यांनीं साधेपणा धारण केलेला नाहीं; त्यांचा साधेपणा म्हणजे सुव्यवस्थितपणा, हें मात्र खरें आहे. साहजिकच, त्यांच्या पोषाखांत सातत्य असतें; शहराप्रमाणें आणि समारंभाप्रमाणें त्यांचा पोषाख बदलत नाहीं. ते शाकाहारी असले, तरी त्यांना मांसाहार वर्ज्य नाहीं. १९१८ सालीं इंग्लंडमध्यें साखरेचें रेशनिंग कडक होतें त्यामुळें बिनसाखरेच्या चहाची संवय झाली; तेव्हांपासून गेलीं ४५ वर्षें ते बिनसाखरेचा चहा घेत आले आहेत, पण गोड पक्वान्नें मात्र त्यांना आवडतात. विलायतेला जातांना त्यांनीं आपल्या बरोबर गीतारहस्य, केशवसुतांची कविता आणि नवनीत हीं मराठी पुस्तकें बरोबर घेतलीं होतीं, त्यावरून त्यांच्या सुसंस्कृततेची कल्पना येईल.

धनंजयरावांनीं आपल्या स्वतःला यत्किंचितसुद्धां मिंधे करून घेतलेलें नाहीं. उदाहरणार्थ, प्रवरा सहकारी साखर-कारखान्याच्या सभांच्या कामासाठीं त्यांनीं कधींच पैसे घेतले नाहींत. औद्योगिक प्रगतीचा आणि व्यवहाराचा पुस्तकी उपदेश करून ते थांबले नाहींत. महाराष्ट्रीय उपक्रमांसाठीं त्यांनीं दशसहस्रावधि रुपयांचा व्यय केला आहे. त्यांची कृति स्वार्थप्रेरित नसल्यामुळें ते आपलीं मतें स्पष्टपणें मांडू शकतात, आग्रह धरूं शकतात. त्यांचा सल्ला नेहमींच निरपेक्ष असल्यामुळें, त्यांना खऱ्या हिताचा पाठपुरावा निर्भयपणें करतां येतो; दुसऱ्याला संभाळून घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाहीं. सत्य अप्रिय आहे, म्हणून तें बोलून दाखविण्यास ते कचरत नाहींत. आपला मुद्दा ते उपऱ्या कारणासाठीं सोडणार नाहींत; फार तर तात्पुरते गप्प बसतील. त्यांचा भर वाचनापेक्षा चिंतनावर अधिक; त्यांची आकलनशक्ति दांडगी आहे.

धनंजयराव हे नियोजनाचे कट्टे पुरस्कर्ते असल्यामुळें, त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र योजनापूर्वक आंखून घेतलें ह्यांत आश्चर्य नाहीं. ते भरीस पडून दुसऱ्या कार्यास हात लावणार नाहींत. त्याचें एक घडलेलें उदाहरण सांगतों. थेऊर येथें दरसाल रमामाधव स्मृतिदिन साजरा होत असतो. त्याचें अध्यक्षस्थान एके वर्षी स्वीकारण्याची त्यांना विनंती करण्यांत आली. तेव्हां ते म्हणाले, “ अहो, इतिहास हा माझा विषय नाहीं. ” चिटणीस गळ घालूं लागले, “ त्याला कांहीं हरकत नाहीं. मागच्या वर्षी डिस्ट्रिक्ट जज आले होते. त्याच्या

मागच्या वर्षी फलाणे प्रोफेसर अध्यक्ष होते." धनंजयरावांनीं समारोप केला, "कुणी कोठें जावें, हें मी सांगू शकत नाहीं. पण जो माझा प्रांत नाहीं, त्यांत मी लुडबूड करूं नये, एवढें मी जाणतों !"

धनंजयरावांच्या जन्मवेळीं मूळ नक्षत्र धनावर होतें. त्याच्या परिहारासाठीं त्यांचें नांव धनंजय असें ठेवण्यांत आलें. मूळ नक्षत्राचा प्रभाव असा कीं, धनंजयरावांनीं धनाचा कधींच अभिलाष बाळगला नाहीं; उलट, अव्हेरच केला. आपलें आयुष्य धनप्राप्तीसाठीं खर्च न करतां, तें त्यांनीं महाराष्ट्राला आणि भारताला समृद्ध करण्यासाठीं वेंचण्याचें ठरविलें आणि क्रियाशील अर्थशास्त्रज्ञाच्या भूमिकेंतून कोट्यवधि रुपयांच्या संपत्तीचा झरा महाराष्ट्राला उपलब्ध करून दिला. सामाजिक व राष्ट्रीय हितास त्यांनीं नेहमींच प्राधान्य दिलें. त्यांच्यांत नागपुरी चोखंदळपणा असला, तरी त्यांचा साधेपणा कायम आहे. कोचाइतकेंच सतरंजीवरहि ते आरामांत बसूं शकतात; सायकलीवरून इन्स्टिट्यूटमध्यें जाण्या-येण्यांत त्यांना कमीपणा वाटत नाहीं. कोटाच्या खिशांत चांदीच्या डबीत ते लवंग-वेलची बाळगतात आणि त्याचा केव्हां तरी आस्वाद घेतात, हाच त्यांचा विलास.

---

सौ. प्रमिलाबाई ह्या स्वतः लक्षाधीशाच्या एकुलत्या कन्या असूनहि त्यांनीं साधेपणाची रहाणी ठेवली आहे. ज्युव्हेनाइल कोर्टांत त्या गेलीं १८ वर्षें ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून वक्तशीर, कसोशीनें काम करीत आहेत. घराची सर्व जबाबदारी त्यांच्याकडेच आहे; स्वतः धनंजयराव एका पैशाचाहि व्यवहार पहात नाहींत. सौ. प्रमिलाबाईंशीं ते वेगवेगळ्या प्रश्नांची मोकळेपणानें चर्चा करतात. गोखले इन्स्टिट्यूटच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या त्या एक सभासद आहेत, तें कांहीं उगीच नाहीं. सौ. प्रमिलाबाई धनंजयरावांच्या खऱ्याखुऱ्या सहचरी आहेत. पतीबरोबर त्यांनीं परदेशचा प्रवासहि केलेला आहे. धनंजय-रावांना त्यांची सर्व बाबतींत उत्कृष्ट साथ आहे. ही कामगिरी किती अवघड आहे, ह्याची कल्पना सामान्य जनांना येणें अशक्य आहे. माहेरच्या सुसंस्कारांमुळेंच सौ. प्रमिलाबाईंना हें सर्व सहजतेनें करतां येऊन त्याचें चीज झालें. आपल्या सार्वजनिक जीवनांत असें दांपत्य क्वचितच आढळेल.

धनंजयरावांना अजित, सुलभा ( ब्रह्मे ), पुरुषोत्तम आणि माधव अशीं चार अपत्यें आहेत. १९४२ सालीं न्यायमूर्ति रानडे ह्यांचा जन्मशताब्दि उत्सव झाला त्याची आठवण म्हणून त्या वर्षी जन्मलेल्या मुलाचें नांव माधव असें ठेवण्यांत आलें. सौ. सुलभा ही एम्. ए., पी. एच. डी. असून इन्स्टिटयूटमध्यें जबाबदारीच्या जागीं काम करीत आहे, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. धनंजयराव सकाळीं साडेसहाच्या सुमारास उठतात आणि आसनांचा व्यायाम करतात. इन्स्टिटयूटमधून एरंडवणें येथील आपल्या घरीं परतल्यावर जेवण उरकून पायीं फिरायला जातात, त्या वेळीं सौ. प्रमिलाबाई ह्या बरोबर असतात. शनिवारीं-रविवारीं जरा लवकर निघून ते डोंगरावर दूरपर्यंत जाऊं शकतात. त्यांनीं फिरण्यासाठीं किंवा करमणुकीसाठीं मोटारीचा उपयोग कधींच केलेला नाहीं ! इंग्लंडमध्यें असतांना धनंजयरावांना बोट वल्हविण्याचा छंद होता, त्यामुळें त्यांचें आरोग्य उत्कृष्ट राहण्याचा पाया तयार झाला. पोहोण्याची त्यांची आवड अजून कायम आहे. आकाशांतले आणि झाडावरचे पक्षी पाहण्याचा त्यांचा छंद फारच थोड्यांना माहीत असेल. १० मार्च, १९३४ ह्या दिवशीं धनंजयराव मोटारीनें तळेगांवला जात असतांना, मोटार खोल खड्ड्यांत पडली आणि मोटार चालवीत असलेल्या धनंजयरावांना खूप इजा झाली. पण ते सुदैवानें बचावले. मोटारींतील इजा न झालेल्या मित्रांनीं त्यांच्या उपचारांची व्यवस्था केली. १० मार्च हा दिवस पुनर्जीवनाचा दिवस म्हणून गाडगीळ-कुटुंबांत आजहि मानला जातो.

धनंजयरावांच्या विचारसरणीचें आणि कार्यपद्धतीचें थोडक्यांत वर्णन असें करतां येईल. त्यांनीं आपलीं उद्दिष्टें पूर्ण विचारांतीं ठरविलेलीं असतात आणि भक्कम पुरावा आणि तर्कशुद्धता ह्यांच्या आधारानेंच ते पुढें पावलें टाकतात. शास्त्रीय तत्त्वांचें महत्त्व जाणूनहि ते त्यांच्या कार्यक्षम अंमलबजावणीस अधिक महत्त्व देतात. सहकारी लोकशाहीवर त्यांची श्रद्धा असून, परिस्थितीला वळण लावण्याच्या दृष्टीनें शास्त्रीय तत्त्वें राबविण्याकडे त्यांचा कल आहे. ते तात्कालिक अपयशानें निरुत्साही होणार नाहींत, किंवा तात्कालिक यशानें बेसावध राहणार नाहींत. उद्दिष्टाकडे सतत लक्ष ठेवून पण पायाखालीं पाहून ते मार्ग आक्रमतील. विवेकावर त्यांचा भर आहे. सर्वंकष नियोजनाचा त्यांनीं प्रारंभापासून केलेला पुरस्कार सुप्रसिद्ध आहे. सुशिक्षितांवर समाजाचें योग्य

नेतृत्व करण्याची जबाबदारी आहे, पण मध्यमवर्गीय आपलें कर्तव्य नीट पार पाडीत नाहींत अशी त्यांची तक्रार आहे. आर्थिक व सामाजिक समतेचा ते पुरस्कार करतात, कारण त्यांना त्याबद्दल आस्था वाटते. कार्यावर त्यांचा भर आहे; स्थानमाहात्म्यावर नाहीं. त्यामुळें, त्यांचें मार्गदर्शन सर्वांना उपलब्ध आहे; परस्परविरोधी पक्ष आणि गटहि त्यांचा सल्ला विचारतात. धनंजय-रावांच्यामध्यें इतक्या परमोच्च गुणांचा एकत्र वास आहे, त्यांचीं उद्दिष्टें इतकीं उच्च आहेत आणि कार्यपद्धति चोख आहे, कीं कोणत्याहि राष्ट्राला अशा लोकोत्तर पुरुषाबद्दल अभिमान वाटावा !

# ४

# ज्योत्स्ना भोळे

सौ. ज्योत्स्नाबाई भोळे ह्यांचें रंगभूमीवरील दर्शन आणि बैठकींमधील किंवा रेडिओवरील गायन, ह्याची रसिक आतुरतेनें वाट पहात असतात. त्याची संधि मिळाली, कीं, " क्षण आला भाग्याचा " असेंच त्यांना वाटतें. ज्योत्स्नाबाईनीं आपल्या माधुरीनें सुशिक्षित आणि सुसंस्कृत वर्गाला मोहित केलें आहे. ऋजुता, खेळकर वृत्ति, हंसरा चेहेरा, आदरातिथ्य, मनमोकळेपणाचें बोलणें, इत्यादि गुण प्रथितयश नटींत आणि गायिकेंत असतील, अशी लोकांची अपेक्षा नसते. पण, ज्योत्स्नाबाई त्याला अपवाद आहेत. त्यांनीं आपला व्यवसाय उत्कृष्ट रीतीनें दीर्घकाळ करून गृहिणीची भूमिकाहि यशस्वी केली आहे. त्यांच्या परिचितांना त्यांचीं भावगीतें अधिक भावपूर्ण वाटतात !

सौ. ज्योत्स्नाबाई भोळे ह्या प्रतितयश नटीचें आणि गायिकेचें वास्तव्य पुणें शहरांत असूनहि त्यांचा निकटचा परिचय फारच थोड्यांना आहे. मुलाखती, फोटो आणि प्रसिद्धि, ह्यांची त्यांना मुळींच आवड नाहीं. त्यामुळें, असामान्य वैशिष्ट्यांनीं परिपूर्ण अशा ह्या व्यक्तीच्या थोरवीची पुरेशी कल्पना लोकांना कोठून असणार ?

ज्योत्स्नाबाईंचा जन्म गोव्यांतला, बांदोडें येथला. नागेशी जवळ असल्या-

कारणानें त्यांचें पाळण्यांतलें नांव दुर्गा ठेवण्यांत आलें, ह्यांत आश्चर्य नाहीं. पण दुर्गा केळेकर विवाहानंतर केशवराव भोळ्यांची पत्नी झाली, तेव्हां तिचें नवें नांव ज्योत्स्ना ठेवण्यांत आलें. श्रीकृष्ण फिल्म कंपनी त्यावेळीं 'संत सखु' हा चित्रपट मुंबई येथें काढीत होती, त्यांत सखूचें काम दुर्गाकडे होतें आणि केशवरावांकडे संगीताचें काम होतें. कंपनीच्या दिग्दर्शकांनीं सुचविल्यावरून केशवरावांनीं त्यांचें नांव ज्योत्स्ना असें ठेवलें आणि तें सर्वांना पसंत पडलें. हें नांव सार्थ ठरलें आहे; ज्योत्स्ना ह्या नांवाला साजेशीच त्यांची शीतलरम्य वृत्ति आहे.

ज्योत्स्नाबाईंना अगदीं लहानपणापासूनच गाण्याची आवड होती. त्यांचा आवाज गोड, चढा, असा होता. वडिलांनाहि गाण्याचा नाद असल्याकारणानें त्यांनीं आपल्या मुलींना गाणें शिकवण्याची व्यवस्था केली. गिरिजाबाई आणि केसरबाई ह्या ज्योत्स्नाबाईंच्या थोरल्या बहिणींना शिकवायला वझेबुवा येत, त्याचा अप्रत्यक्ष फायदा धाकट्या बहिणीलाहि मिळाला. ज्योत्स्नाबाईंनीं आपल्या 'आराधना' नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचें खर्चवेच उत्पन्न (१,००० रु.) बुवांचे चिरंजीव शिवरामबुवा ह्यांना कलावंताच्या कर्तव्यबुद्धीनें दिलें.

मुंबई येथें आल्यावर आंग्रेवाडींतील मुलींच्या मराठी शाळेंत दुर्गाचें नांव घालण्यांत आलें. आंतर-शालेय गाण्यांच्या चढाओढींत दुर्गाचा पहिला अनुक्रम आला आणि तिला शाळेतर्फे एक सोनेरी फूल बक्षीस मिळालें. ही गाणारी मुलगी आपल्या शाळेंत यावी, ह्यासाठीं शाळांच्या मुख्याध्यापिकांत चढाओढ सुरू झाली आणि अखेर लॅमिंग्टन रोडवरील म्युनिसिपल मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका, श्री. शांताबाई नाडकर्णी ह्यांनीं दुर्गाला आपल्या शाळेंत ओढलें. ती बाईंची लाडकी विद्यार्थिनी बनली. कुणीहि शाळा बघायला आलें, तर शाळा दाखविण्याच्या ऐवजीं दुर्गाचें गाणें ऐकवूनच नाडकर्णीबाई पाहुण्यांना खूष करून टाकायच्या! दुर्गानें राष्ट्रीय चळवळीच्या वेळीं प्रभातफेऱ्यांत भाग घेतला आणि त्यामुळें तिच्या आवाजाची आणि गायनाची कीर्ति पसरण्यास मदत झाली. मुंबई येथें रेडिओ केंद्र नुकतेंच सुरू झालें होतें, तेथें तिचें कार्यक्रमहि सुरू झाले. "राधेकृष्ण बोल" हें तिचें गाणें फारच लोकप्रिय झालें होतें.

खादीम हुसेन, इनायत हुसेन खां, महंमद बशीर खां, इत्यादि गुरूंच्याजवळ ज्योत्स्नाबाईंनीं गाण्याची तालीम घेतली. आपल्या गुरुजनांत केशवरावांचाहि

त्या मोठ्या अभिमानानें समावेश करतात. इतर गुरूंनीं ज्योत्स्नाबाईंना रागदारी शिकवली, पाया तयार केला, पण राग शास्त्रशुद्ध व पद्धतशीर कसे गावेत, गाणीं लोकप्रिय कशीं करावीत, भावगीतें कशीं रंगवावींत, ह्यांतले बारकावे केशवरावांनीं त्यांना शिकविले; स्वतःच्या चिकित्सक, साहित्यिक आणि अभ्यासू दृष्टिकोनानें ज्योत्स्नाबाईच्या गायनांत मोहकता आणली. इतर गुरूंनीं ज्योत्स्नाबाईच्या यशोमंदिराचा पाया घातला, तर केशवरावांनीं कळस चढविला.

ज्योत्स्नाबाईंनीं प्रथम नाट्यमन्वंतर आणि नंतर नाट्यनिकेतन ह्या संस्थांमार्फत होणाऱ्या नाटकांखेरीज इतर कंपन्यांच्या नाटकांतून कामें पत्करली नाहींत. नाईटवर त्यांनीं कामें केलीं नाहींत. नाट्यमन्वंतरच्या प्रारंभींचें काळांत त्यांना एकदोन महिने दरमहा फक्त ७५ रु. पगार मिळाला आणि तो पुढें दरमहा फक्त १५० रु. झाला. पण, तो अल्पायुषीच ठरला आणि मोबदल्यापेक्षां नाट्यप्रेमाखातरच त्यांनीं पुढें कामें केलीं. नाट्यमन्वंतर आर्थिक दृष्ट्या फारसें यशस्वी न झाल्यामुळें हा पगारहि नेहमीं हातीं येईच, असें नाहीं. उलट, संस्थेच्या कर्जफेडीसाठीं त्यांनीं विनामोबदला कामें केलीं! नाट्यनिकेतनमध्यें मात्र त्यांना भरभराटीच्या काळांत भरपूर वेतन मिळालें.

ज्योत्स्नाबाईनीं आतांपर्यंत हजारों नाट्य-प्रयोगांतून कामें केलीं असतील. एकट्या कुलवधूचेच हजारावर प्रयोग झाले आहेत. पण, नटीच्या व्यवसायापेक्षां गायिकेची भूमिका त्यांना अधिक पसंत आहे. लोकांच्यापुढें येऊन झगझगीत कीर्ति मिळविण्याची त्यांना कधींच हांव वाटली नाहीं. गायनामध्येंच त्या अधिक रमतात. पण, त्यांच्या रंगभूमीवरील प्रभावी कामामुळें त्यांच्या संगीताविषयीं लोकांत आकर्षण निर्माण झालें, हें मात्र खरें आहे. गाण्याच्या बैठकींच्या निमित्तानें त्यांनीं भारताच्या बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं प्रवास केला आहे. बहुतेक सर्व रेडिओ केंद्रांतून त्यांनीं आपलें संगीत ध्वनिक्षेपित केलें आहे. भारताच्या सांस्कृतिक शिष्ट-मंडळाच्या सदस्य म्हणून त्यांनीं चीनमध्येंहि भारतीय संगीताची उकल करून दाखविली आहे. कित्येक प्रथितयश कंपन्यांनीं ज्योत्स्नाबाईंना सिनेमांत कामें देऊं केलीं, परंतु तें क्षेत्र आपल्या प्रकृतीला मानवेल, असें ज्योत्स्नाबाईंना वाटलें नाहीं.

ज्योत्स्नाबाईची आणि केशवराव भोळ्यांची ओळख होऊन, तिचें विवाहांत

रूपांतर होऊन श्रेष्ठ दर्जाची नटी व गायिका आणि यशस्वी संगीत-दिग्दर्शक ह्यांचें दांपत्य समाजाच्या कुतुहलाचाच नव्हे तर आदराचा विषय व्हावा, असा संकेतच होता म्हणायचा ! कारण, केशवराव हे अमरावतीहून मुंबईला वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होण्यासाठीं आले होते, तरी त्यांचा ओढा होता नाट्य, संगीत आणि साहित्य ह्यांकडे. ते डॉक्टरीच्या आपल्या अभ्यासांतच गर्क राहिले असते, तर त्यांची आणि ज्योत्स्नाबाईंची कशाला गांठ पडती ? पण, केशवराव पडले ध्येयवादी रसिक. साहजिकच त्यांचा बराच वेळ अशाच मंडळींच्या कंपूंत जात असे. ज्योत्स्नाबाईंचे बंधु अशा "घरकुलां" तलेच असल्याकारणानें, त्यांचा आणि केशवरावांचा स्नेह जमला आणि त्यांच्या आग्रहामुळें ज्योत्स्नाबाईंना केशवराव भावगीतें म्हणायला शिकवूं लागले. १९३१ सालीं त्या दोघांचा विवाहहि झाला. पण, त्याला केशवरावांच्या ज्येष्ठ बंधूंची संमति मिळण्याची शक्यता नव्हती. केशवरावांनीं एक युक्ति योजली. "निदान तुम्हीं दुर्गाला पहा; तिचें गाणें तरी ऐका" असें केशवरावांनीं आपल्या बंधूंना सुचविलें; त्याप्रमाणें त्यांनीं मुंबईस येऊन दुर्गाचें गाणें ऐकलें आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यांचा विरोध मावळला. ज्योत्स्नाबाई अमरावतीला सासरीं रहावयास गेल्या, तेव्हां त्यांनीं आपल्या निरामय वृत्तीनें सासर जिंकलें; कांहीं वर्षांनीं तर त्यांनीं अमरावतीच्याच रंगभूमीवर सर्वांची प्रशंसा मिळविली. भोळे मंडळी त्यांचें कौतुक करूं लागली. केशवरावांच्या नातेवाईकांची अढी नाहींशी करून त्यांचें प्रेम संपादन करण्याची कामगिरी ज्योत्स्नाबाईंनीं पार पाडली आहे. आतां त्या भोळे कुलाच्या भूषणभूत कुलवधू आहेत !

ज्योत्स्नाबाईंचा व्यवसाय पडला नटीचा आणि गायिकेचा. विशेषतः नाट्यप्रयोगांसाठीं त्यांना वरचेवर, दीर्घ काळ, बाहेरगांवीं मुक्काम करीत दौऱ्यावर जावें लागे. तरी, त्यांचें लक्ष प्रेक्षक आणि श्रोते ह्यांच्यापेक्षां घराकडेच अधिक असे. संसाराची त्यांची आवड कमी झाली नाहीं. सैंपाक करायला, नवे नवे जिन्नस करून पहायला त्यांना अतिशय आवडतें. वर्षांचें तिखट, लोणचें, पापड, हळद, मेतकूट, इत्यादि त्या स्वतःच घरीं बनवितात. आपलें घर स्वच्छ, नीटनेटकें, सुशोभित राखण्याचा त्यांना छंदच आहे. शिवणकाम त्यांनीं खूप केलें आहे. अजूनहि एखादे दिवशीं लहर आली तर दिवसभर मशीनवरून

त्या उठणार नाहींत. गोव्याला त्यांचें माहेर असल्यामुळें तेथील मासे त्यांना अधिक चवदार लागले, तर नवल नाहीं. पण, पुण्याला बरींच वर्षें राहिल्यामुळें त्या बऱ्याचशा शाकाहारी बनल्या आहेत. तरीसुद्धां, कोळंबीची आमटी अधुमधुन केल्याखेरीज त्या रहात नाहींत. खाण्या-पिण्याच्या बाबतींत त्या विशेष चोखंदळ नाहींत. सर्व कांहीं चालतें; चालत नाहीं असें कांहीं नाहीं. पण त्यांना जेवायला बोलवायचें असेल, तर काऱ्यांची किंवा मेथीची भाजी करावी आणि शेवग्याच्या शेंगा आमटींत घालाव्या, म्हणजे झालें! ज्योत्स्नाबाई दौऱ्यावरून परत येण्याच्या दिवशीं ही भाजी-आमटी करण्याची सूचना केशवराव सैंपाकिणबाईंना न चुकतां देतात!

ज्योत्स्नाबाईंना कपड्यांचा हव्यास नाहीं. भारी किंमतीच्या साड्या त्यांनीं घेतल्या, तरी त्या इतरांच्या डोळ्यांत भरूं नयेत ह्या दृष्टीनें त्यांची निवड करतात. भगवा रंग त्यांना विशेष पसंत पडतो. ह्याच रंगाच्या डिझनावारी साड्या त्या आलटून पालटून नेसतील. पण, आतांशा त्यांना पिवळा रंग आवडायला लागला आहे. नऊवारी साडी नेसूनच 'कुलवधू'नें रंगभूमीवर प्रवेश केला. अजूनहि त्या सणावारीं आणि उत्सवप्रसंगीं नऊवारी साडीच नेसतात. समारंभासाठीं बाहेर जाण्यासाठीं उत्तम साडी नेसावी, चांगले अलंकार घालावे आणि आरशांत पाहून ते कमी करण्याचें ठरवावें, असें त्यांचें कित्येक वेळां घडतें. ह्याचें कारण, त्यांचा कल साधेपणाकडे आहे.

केशवरावांची संमतीच नव्हे तर प्रत्यक्ष प्रोत्साहन नसतें, तर ज्योत्स्नाबाईंच्या नाट्य आणि गायनकलेची प्रगति इतकी झालीच नसती. ह्याविषयक ज्योत्स्नाबाईंची भावना कृतज्ञतेची आहे. केशवरावांनीं त्यांच्या गुणांना वाव दिला, इतकेंच नव्हे तर योग्य तें कलात्मक वळणहि लावलें. केशवराव हे स्वतः काटेकोर वागणारे सरळमार्गी गृहस्थ असून घरचे सुखवस्तु आहेत; त्यांनीं आपल्या संगीत दिग्दर्शनाचा व्यवसाय यशस्वी केला असून मान्यता मिळविलेली आहे. ज्योत्स्नाबाईहि गृहिणीपदास महत्त्व देणाऱ्या आहेत. त्यामुळें पतिपत्नी आपआपल्या व्यवसायांत अग्रस्थानीं असूनहि त्याचा त्यांच्या कौटुंबिक जीवनावर दुष्परिणाम झालेला नाहीं.

आपलें घर गजबजलेलें असावें, आपण सर्वांचें आदरातिथ्य करावें, आपले तीनहि मुलगे आपल्याजवळ रहावेत, सुनांनीं घरांत आनंदानें नांदावें आणि

सुखसमृद्धीनें घर भरून जावें, असें ज्योत्स्नाबाईंचें स्वप्न आहे. पडलेलीं स्वप्नें खरीं ठरतात असा त्यांचा अनुभव आहे. किशोर, सुहास आणि अनिल ह्यांच्या पाठीवर आपल्याला मुलगीच होणार, ती आपल्या गुणसमुच्चयानें कीर्ति मिळविणार, असें स्वप्न तिच्या जन्माचे आधीं कांहीं दिवस त्यांना पडलें होते. ही वंदना आतां १७ वर्षांची असून कॉलेजांत शिकत आहे. उत्कृष्ट प्रतीच्या मुली तिला आदर्श मानतात. नृत्य, गायन, अभिनय, ह्यांत तिनें पुष्कळच प्रगति केलेली आहे. आपल्याला स्वतःला उच्च शिक्षणाचा लाभ झाला असता, तर आपण आणखी कितीतरी पुढें जाऊं शकलों असतों, असें ज्योत्स्नाबाईंना वाटतें. ज्योत्स्नाबाईंनीं स्वतः टेनिस खेळण्यास वयाच्या २१ व्या वर्षीं प्रारंभ केला, पण त्यांना त्याला पुरेसा वेळ देतां आला नाहीं. पी. वाय. सी. जिमखान्यावर स्त्रियांनीं पुरुषांच्याबरोबर टेनिस प्रथम सुरू केलें, तेव्हां ज्योत्स्नाबाईहि खेळायला येऊं लागल्या. प्रस्तुत लेखकानें त्यांचें गाणें प्रथम ऐकलें, तें टेनिसच्या खेळानंतर सावलींतील मनोरंजनाचे वेळीं. वंदनानें खेळांतहि नांव कमवावें असें त्यांना सहाजिकच वाटतें. गाण्याच्या बाबतींत तर त्या वंदनाचे बाबतींत फार मोठ्या अपेक्षा बाळगून आहेत. तिनें गायन-कलेंत आपल्यापेक्षां खूपच पुढें जावें अशी आईची आत्यंतिक इच्छा आहे. त्याला आवश्यक ती पूर्वतयारी चालू आहे, तरीसुद्धां इतर शिक्षणाला त्या आज अधिक महत्त्व देतात. वंदनाकडे सर्वांचें लक्ष लागून राहील, ह्यांत शंका नाहीं.

ज्योत्स्नाबाई दररोज स्नानानंतर भक्तिभावानें सरस्वतीची प्रार्थना करतात आणि रात्रीं न चुकतां देवाला नमस्कार करतात. त्या संबंधांतील हकीकत मनोरंजक आहे. आगगाडींतून त्या प्रवास करीत असतांना, त्यांच्या शेजारीं एकदां एक म्हतारा बसला आणि तो त्यांना म्हणाला, "मी तुझीं गाणीं पुष्कळ वेळां ऐकलीं आहेत. आतांशा तुझ्या आवाजाला थोडी खरखर आल्या-सारखी वाटते बघ. तूं माझं ऐक. रोज देवाची पूजा करून एखादा अभंग म्हणत जा. निदान अभंगाची एखादी तरी ओळ म्हणत जा. करशील ना एवढं ?" तेव्हांपासून ज्योत्स्नाबाईंनीं सरस्वतीची प्रार्थना करण्याचा क्रम कायम ठेवला आहे. पुनः त्या व्यक्तीची कधींच भेट झाली नाहीं, कीं त्यानें चौकशी केली नाहीं. पण, ज्योत्स्नाबाईंचा आवाज उत्तम प्रकारें टिकला आहे, हें मात्र खरें.

५

# डॉ. मो. वा. चिपळूणकर

आंतरराष्ट्रीय भू-वैज्ञानिक वर्षाच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून पुणें विद्यापीठाच्या आवारांत डॉ. मो. वा. चिपळूणकर ह्यांनीं आपल्या नेतृत्वाखालीं 'नाइट एअर ग्लो'चे वेध घेऊन महत्त्वाचें संशोधन पार पाडलें. त्याचा अहवाल डॉ. चिपळूणकरांनीं इंटरनॅशनल युनियन ऑफ जिओडेसी व जिओफिजिक्स ह्या संस्थेस आपल्या निष्कर्षांसह सादर केला. अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च इन्स्टिटयूटचे प्रमुख डॉ. के. आर. रामनाथन् ह्यांनींहि माउंट अबूवर ह्याविषयीं संशोधन केलें होतें. भारताप्रमाणें इतरहि अमेरिका, फ्रान्स, जपान, प्रभृति आणखी सात देशांनीं ह्या चत्मकारासंबंधीं माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला होता. ह्या सर्व राष्ट्रांच्या बारा संशोधकांची बैठक पॅरिस येथील इन्स्टिटयूट ऑफ अॅस्ट्रोफिजिक्समध्यें ८–९ जुलै, १९६० रोजीं भरली होती. त्या वेळीं प्रत्येकानें आपल्या कार्याची माहिती सांगितली; परंतु डॉ. चिपळूणकरांच्या शिवाय दुसऱ्या कोणींहि निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला नाहीं. "काळोख्या रात्रीं आकाशांत दिसणाऱ्या प्रकाशाचें तेज मध्यरात्रीपर्यंत वाढत जाऊन नंतर तें कमीकमी होतें. हा प्रकाश वातावरणाच्या ज्या थरांतून येतो, त्या थरांतील विद्युत्भारित (आयोनाइज्ड) अणूंची संख्या वाढते; ह्या संस्थेवर प्रकाशाचें



डॉ. मो. वा. चिपळूणकर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
... क्र ...

डॉ. मधुमालती गुणे





केशवराव भोळे

इंदिराबाई देवधर



तेज अवलंबून राहतें," असा त्यांच्या निष्कर्षांचा सोप्या भाषेंत सारांश सांगतां येईल.

डॉ. चिपळूणकरांनीं पॅरिसमधील बैठक आटोपून जर्मनी, ऑस्ट्रिया, ग्रेट ब्रिटन येथील कांहीं वेधशाळा व प्रयोगशाळा पाहिल्यावर, ते लंडनमध्यें साजऱ्या झालेल्या रॉयल सोसायटीच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवास पुणें विद्यापीठाचे प्रतिनिधि ह्या नात्यानें उपस्थित राहिले आणि देशोदेशींच्या संशोधकांशीं विचारविनिमय करून भारताला परत आले.

एखादा संशोधनात्मक निबंध लिहून एम्. एस्सी. किंवा पीएच्. डी. मिळूं शकते. असे कित्येक मौलिक निबंध लिहून ते शास्त्रीय मासिकांतून प्रसिद्ध झाल्यावर ते एकत्र करून सादर केलेल्या साहित्याची देशीविदेशी तज्ज्ञांकरवीं छाननी झाल्यावर डी. एस्सी. मिळूं शकते आणि ती मिळविण्याचा चिपळूण-करांनीं चंग बांधला होता. पुणें विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान शाखेचे प्रमुख डॉ. मोरेश्वर वासुदेव चिपळूणकर ह्यांनीं दीर्घ तपश्चर्येनें मुंबई विद्यापीठाची डी. एस्सी. मिळविलेली आहे आणि त्या वर्षीच्या सर्व शास्त्रीय विषयांच्या सर्वोच्च परीक्षेतील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून त्यांनीं मुंबई विद्यापीठाचें मूस गोल्ड मेडलहि मिळविलें आहे. पॅरिस येथील शास्त्रज्ञांच्या बैठकीस ते नुसते उपस्थित नव्हते, तर तेथें आपलें संशोधन व निष्कर्ष मांडण्यासाठीं ते गेले होते आणि त्यांच्या कार्याचा मोठा गौरवहि झाला. त्यांच्यासारखें अनुमान काढणारे ते जगांतील पहिलेच शास्त्रज्ञ ठरले आहेत. त्यांचें अभिनंदन अज्ञाण जनतेनें केलेलें नसून, त्यांच्याहीपेक्षां श्रेष्ठ आणि मातब्बर संशोधकांनीं केलेलें आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

पृथ्वीच्या वातावरणाचे मुख्यतः तीन विभाग मानले जातात. जमिनीपासून सुमारें आठ मैल उंचीपर्यंतच्या पहिल्या विभागाला 'ट्रोपॉस्फिअर' म्हणतात. याच थरांतील वास्तव घटनांमुळें रोजच्या रोज दिसून येणारे विविध प्रकारचे हवामानाचे आविष्कार घडून येतात. ह्याच्या वरच्या अधिकाधिक विरळ होत गेलेल्या वातावरणाच्या दुसऱ्या विभागाला 'स्ट्रॅटोस्फिअर' म्हणतात व त्याची वरील मर्यादा अदमासे तीनशें मैल मानली जाते. या विभागांतील आविष्कारांच्या अभ्यासाला अलीकडे अतिशय महत्त्व प्राप्त झालें आहे. या दुसऱ्या विभागांतील खालच्या ३० – ३५ मैलांपर्यंतच्या थराला 'ओझोनो-

स्फिअर' आणि राहिलेल्या वरच्या सर्व विभागाला 'आयनोस्फिअर' म्हणतात. अदमासें तीनशें मैलांपलीकडील वातावरणाला 'ऐक्झोस्फिअर' म्हणतात.

पहिल्या विभागांतील ढग, वीज–वावटळीं, विजांचा कडकडाट, जमिनी,-जवळील विद्युत्क्षेत्र व निरनिराळ्या उंचीवरील हवेचें तपमान आणि दाब इत्यादि घटकांसंबंधींचा प्रायोगिक व तात्त्विक अभ्यास करून डॉ. चिपळूण-करांनीं आजवर अनेक प्रबंध प्रसिद्ध केले आहेत. वाऱ्यापासून शक्ति मिळविण्याच्या उद्देशानें हिंदुस्थानच्या पश्चिम आणि दक्षिण प्रदेशावर वाहणाऱ्या वाऱ्यांचा अभ्यासहि त्यांनीं केलेला आहे.

"ओझोनोस्फिअर"मधील आणि जमिनीलगतच्या थरांतीलहि ओझोन वायूसंबंधींचीं अचूक मोजमापें हिंदुस्थानांत करणारे हे पहिलेच संशोधक होत. 'बारिसाल तोफां'च्या नैसर्गिक आविष्कारांत उत्पन्न झालेल्या ध्वनिलहरींच्या साह्यानें 'ओझोनोस्फिअर' मधील तपमानाचा त्यांनीं अचूक अंदाज केलेला आहे व त्या आविष्काराचें उगमस्थानहि निश्चित केलें आहे.

"ॲटमॉस्फेरिक्स" किंवा रेडिओमध्यें ऐकूं येणारा खडखडाट यासंबंधीं व त्यावरून 'आयनोस्फिअर'संबंधींचा प्रायोगिक अभ्यास त्यांनीं स्वतः व अनेक विद्यार्थ्यांच्या मदतीनें बरीच वर्षें करून या शाखेंत भर घातली आहे.

संधिप्रकाशाच्या वेळीं आकाशांतून येणाऱ्या तेजाचेंहि अचूक मोजमाप अनेक वर्षें करून 'स्ट्रॅटोस्फिअर'मधील निरनिराळ्या उंचीवरील हवेचें तपमान व घनता हीं अजमाविलीं आहेत. त्याचप्रमाणें 'आयनोस्फिअर'मधील निरनिराळ्या थरांतून रात्रींच्या वेळीं येत असलेल्या अत्यंत मंद प्रकाशाचें म्हणजेच 'रात्रीप्रकाशा'चें मोजमाप निरनिराळ्या पद्धतींनीं त्यांनीं स्वतः आणि विद्यार्थ्यांच्या करवींहि अनेक वर्षें केलेलें आहे. या शेवटल्या विषया-संबंधींचाच उल्लेख सुरवातीस आलेला आहे.

स्फोटक ध्वनिलहरींच्या परिणामामुळें धातूंच्या अंतर्रचनेंत आणि त्यांच्या गुणधर्मांत जें बदल घडून येतात त्यासंबंधींहि त्यांनीं संशोधन केलें आहे.

डॉ. चिपळूणकर हे अकोला येथील सुप्रसिद्ध वकील आणि थिऑसॉफिस्ट श्री. वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर आणि सौ. राधाबाई चिपळूणकर ह्यांचे

कनिष्ठ चिरंजीव. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे डॉ. चिपळूणकरांच्या वडिलांचे सख्खे चुलते. सौ. राधाबाई ह्याहि लेखिका म्हणून त्यांच्या पिढींत सुप्रसिद्ध. डॉ. चिपळूणकर हें लहानपणीं आणि विद्यार्थीदशेंत मोरू चिपळूणकर ह्या नांवानें सर्वांना माहीत होते. अकोला येथील सरकारी हायस्कुलांतून ते शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन फर्ग्युसन कॉलेजांतून १९३१ सालीं बी. एस्सी. झाले आणि बनारस विद्यापीठांतून १९३३ सालीं एम्. एस्सी. झाले. पदार्थ-विज्ञान हा त्यांचा आवडता विषय आणि त्यांच्या संशोधकबुद्धीला जसजसा त्यांना वाव मिळत गेला, तसतशी त्यांची चमक दिसूं लागली. फर्ग्युसन कॉलेजची प्रयोगशाळा आणि पुण्याची वेधशाळा येथें डॉ. के. आर. रामनाथन् ह्यांच्या हाताखालीं त्यांनीं १९३३ ते १९३६ या काळांत संशोधन केलें. त्यांच्या गुरूची पुण्याहून कुलाबा वेधशाळेंत बदली झाल्यावर, शिष्यानेंहि तेथें स्थलांतर करून १९३६ ते १९३८ पर्यंत तेथील वेधशाळेंत संशोधन चालू ठेवलें. गुरूची पुन्हां पुण्याला बदली झाल्यावर ते पुनरपि पुण्यास येऊन १९४० मध्यें त्यांनीं संशोधन पुढें चालू केलें. युद्धपरिस्थितीमुळें, त्यांच्या संशोधनाचें मूल्यमापन करण्यास परदेशी तज्ज्ञ उपलब्ध नव्हता, त्यामुळें त्यांना डी. एस्सी. पदवी मिळण्यासाठीं १९४२ पर्यंत थांबावें लागलें. मुंबई विद्यापीठाच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून त्यांना मूस मेडल मिळाल्याचा उल्लेख आधीं आलाच आहे.

१९४१ ते ४५ मध्यें डॉ. चिपळूणकर स. प. महाविद्यालयांत पदार्थविज्ञान-शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते आणि १९४३ ते ४५ ते तेथील रेडिओ स्कूलचे प्रमुख होते. शिक्षण प्रसारक मंडळीचें आजीव सभासदत्व त्यांना मिळूं शकलें नाहीं, हें त्या संस्थेचें दुर्दैव म्हणायचें! कारण, हाच शास्त्रज्ञ १९५२ मध्यें पुणें विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान शाखेचा प्रमुख म्हणून निवडण्यांत आला. त्यापूर्वी, १९४५ मध्यें त्यांची भारत सरकारच्या हवामान-खात्यांत 'मीटिऑरॉलॉजिस्ट' ह्या उच्च जागीं नेमणूक करण्यांत येऊन त्यांनीं पुणें, अलिपूर व डमडम येथील वेधशाळेंत त्या नात्यानें कामहि केलें. पण त्यांना ह्या उच्च पदींहि सरकारी नोकरी मानवली नाहीं; स्वाभिमान राखणें अशक्य झालें आणि त्यांनीं त्याखेरीज कसलाहि विचार न करतां आपल्या जागेचा सरळ राजीनामा देऊन टाकला. हजारों रुपयांच्या नोकरीवर पाणी

सोडलें. डॉ. चिपळूणकरांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना बऱ्याच ठिकाणीं नोकरीसंबंधीं विचारणा झाली. एका कॉलेजाचे प्राचार्यपदहि त्यांना देऊं करण्यांत आलें होतें. पण, आपल्या स्वतःच्या ज्ञानाबद्दल आणि पात्रतेबद्दल त्यांना रास्त विश्वास होता आणि आपल्या संशोधनाला पुरेसा वाव मिळेल अशी योग्य जागा मिळेपर्यंत वाट पाहण्याचें त्यांनीं ठरविलें; पगार किंवा मान ह्याला ते बळीं पडले नाहींत. त्यांची स्वतःची राहणी अगदीं साधी असल्यामुळें आणि जीवनाचीं मूल्यें वेगळीं असल्यामुळें त्यांना कोणतेंहि आकर्षण ध्येयापासून चलित करूं शकलेलें नाहीं. पुणें-मुंबईच्या वेधशाळांशीं व एकंदर हिंदुस्थानच्या हवामानखात्याशीं अनेक वर्षें निकटचा संबंध आल्या-कारणानें त्या खात्यामधील सर्व लहानमोठ्यांशीं त्यांचा चांगलाच परिचय असून त्यांनीं त्या खात्यांतील नोकरी सोडल्यानंतरहि त्या सर्वांच्या मनांत अजूनहि चिपळूणकरांच्याबद्दल अत्यंत आदर वसत आहे.

उत्कृष्ट, मानाची, पगाराची नोकरी त्यांनी सोडली खरी; पण त्यानंतरची सात वर्षें त्यांना अतिशय अवघड गेलीं. पोटाच्या व्यथेनें त्यांना बेजार केलें. वैद्यकीय उपाययोजनेस यश येईना. बेकारीमुळें मनस्वास्थ्यहि अशक्य होतें आणि संसार तर वाढलेला होता. ह्या दुखण्यांतून डॉ. चिपळूणकर पार पडतील असें कुणालाहि वाटत नव्हतें; त्यांना कुठलेंहि काम झेपण्याइतपत ते सुधार-तील अशीहि अपेक्षा कुणी बाळगली नसेल. पण डॉ. व्ही. जी. खेर हा धन्वंतरी त्यांच्या मदतीला आला. वास्तविक, डॉ. खेर हे विशेष अनुभवी किंवा प्रसिद्ध डॉक्टर नव्हते. पुण्यांतील कुंटे रस्त्यावर त्यांनीं नुकताच दवाखाना उघडला होता. पण त्यांनीं आपल्या पेशंटचें अचूक रोगनिदान केलें आणि आश्वासन-पूर्वक उपाययोजना करून चिपळूणकरांना पूर्णपणें बरें केलें. डॉ. खेरांना चिप-ळूणकरांची प्रकृति पहाण्यास केवळ योगायोगानें बोलावण्यांत आलें होतें आणि त्यांनींहि चिपळूणकरांचें आयुष्य राष्ट्रीय मोलाचें आहे हें ओळखून आपल्या पेशंटसाठीं शिकस्त केली.

आपल्या आजारपणांत डॉ. चिपळूणकरांनीं किती यातना भोगल्या हें त्यांचें त्यांनाच माहीत. ओळीनें तीन दिवस पूर्णपणें उपास करावयाचा, मग दोन-तीन दिवस पातळ अन्न खायचें आणि शक्ति टिकवायची आणि पुढचे तीन दिवस पोटाला पुन्हां विश्रांति द्यावयाची, असा क्रम कित्येक महिने चालू

होता. पथ्य सांभाळण्याची चिपळूणकरांची तत्परता विलक्षण होती. तरुणपणीं चिपळूणकरांनीं कित्येक खेळांत चांगलेंच प्रावीण्य दाखवून बक्षिसें मिळविलेलीं आहेत. विशेषतः त्यांचा हॉकीचा तडफदार खेळ अजूनहि लोकांच्या लक्षांत आहे. 'लेफ्ट आउट' या आघाडीवरील अवघड जागीं ते खेळत असत. तरुणपणीं कमावलेलें आरोग्य आणि खेळांची शिकवण त्यांना पुढील आयुष्यांतील संकटांना तोंड देण्यास उपयोगी पडली ह्यांत शंकाच नाहीं.

डॉ. चिपळूणकर हे भारतांतील प्रमुख पदार्थविज्ञान-शास्त्रज्ञांत गणले जातात. त्यांनीं आतांपर्यंत सुमारें ५० संशोधन-निबंध प्रसिद्ध केले आहेत. अशा मोठ्या विद्वानाचा शाळेंत व कॉलेजांत नेहमीं वरती अनुक्रम असणारच, असा कुणीं अंदाज केला, तर तो मात्र चुकीचा ठरेल. शाळेंत ते बुद्धीनें चलाख विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते; वेटाबादकर, चौगुले आणि टावरे ह्या शिक्षकांचे ते आवडते विद्यार्थी होते. अवघड प्रश्नांचीं उत्तरें इतर विद्यार्थ्यांना देतां आलीं नाहींत, तरी मोरू चिपळूणकर सहज देऊं शकायचा. पण पाठांतरावर गुण अवलंबून असलेल्या परीक्षा ह्या विद्यार्थ्यांचें मूल्यमापन करण्यास असमर्थ होत्या. बी. एस्‌सी.च्या परीक्षेंत ते वर्गांतील विद्यार्थ्यांत पहिले आले, एवढेंच. पण संशोधनक्षेत्रांत मात्र त्यांच्या संशोधक वृत्तीचा जोरानें विकास झाला. एम्. एस्‌सी.त ते पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले आणि पुढेंहि संशोधनांत अग्रेसर राहिले त्याची प्रचीति आतां आलेलीच आहे.

डॉ. चिपळूणकरांचे आतेभाऊ, डॉ. श्री. स. जोशी हे लंडन विद्यापीठाचे डी. एस्‌सी. होते आणि त्यांनीं संशोधक म्हणून खूपच लौकिक मिळविलेला होता. बनारस युनिव्हर्सिटीच्या सायन्स कॉलेजांत ते प्रमुख प्रोफेसर होते. घरांत ते मोठ्या भावासारखे होते आणि त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें सर्व भावंडें सर्व गोष्टी करीत असत. डॉ. जोशी ह्यांचें बालपण चिपळूणकरांच्या घरींच गेलेलें. साहजिकच डॉ. जोशी ह्यांची छाप त्यांच्या तीनहि मामेभावांवर न पडली तरच नवल! गोपाळ वासुदेव, गंगाधर वासुदेव आणि मोरेश्वर वासुदेव ह्या तिघांनींहि आपल्या आतेभावाच्या मार्गदर्शनाचें चीज केलें आणि आपापल्या क्षेत्रांत नांव मिळविलें. चिपळूणकरांच्या घरची संस्कृति आणि आचार-विचार त्याला पोषकच होते. चिपळूणकरांच्या कर्तृत्वशक्तीवर डॉ. जोशी ह्यांचा विश्वास असल्यामुळें त्यांनीं चिपळूणकरांना सर्वोच्च अशी डी. एस्‌सी. पदवी घेण्यासच

उत्तेजन दिलें. बेकारीच्या काळांतहि त्यांनीं धीर दिला आणि साहजिकच वेळोवेळीं चिपळूणकर त्यांच्या सल्ल्यानेंच निर्णय घेत गेले. त्याचें झालेलें चीज पाहून डॉ. जोशी यांना कितीतरी समाधान वाटतें.

डॉ. चिपळूणकरांना उच्च शिक्षणासाठीं आपण परदेशीं जावें, असें कधींच वाटलें नाहीं. स्वदेशांतच उपलब्ध असलेल्या साधनांनीं संशोधन करून त्यांत पुढें येण्यांत खरा पराक्रम आहे अशी त्यांची भावना. विदेशी पदव्यांच्या आधारावर येथें संशोधक म्हणून मिरविणें त्यांना मुळींच पसंत नव्हतें. डॉ. चिपळूणकर वयाच्या ५२ व्या वर्षी प्रथम विलायतेला गेले, ते तेथून एखादी पदवी विकत आणण्यासाठीं नव्हे; उलट, दरिद्री देशांतहि आम्हीं काय केलें आहे तें विदेशी संशोधकांच्या पुढें त्यांनीं मांडून त्यांना चकित केलें! पुरेशीं साधनें नसतांहि त्यांनीं ध्येयनिष्ठेनें केलेल्या सततोद्योगानेंच हें शक्य झालें आहे. आतां साधनें आणि शिष्यवृत्त्या ह्यांची रेलचेल झाली व त्यामुळें शास्त्रीय पदवीधर वाढले, पण खऱ्या संशोधकांची संख्या व त्यांचा दर्जा पुरेसा वाढलेला नाहीं, ह्याचें कारण एकच — "तेथें पाहिजे जातीचें!"

डॉ. चिपळूणकर ह्यांचा बहुतेक सर्व वेळ लेखन-वाचनांत व संशोधनांतच जातो; करमणुकीसाठीं वेगळें कांहीं करण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाहीं. त्यांची वृत्ति त्यांच्या अंगीकृत कार्याला पोषक अशीच आहे. ज्याची आपल्या कार्याला जरुरी नाहीं असें ते सहसा कांहींहि करणार नाहींत. त्यामुळें चार-चौघांशीं गप्पागोष्टी करतांना, चहाचिवडा खातांना किंवा कांहींतरी वृत्तपत्र वा पुस्तक मजेखातर वाचतांना ते सहसा आढळणार नाहींत. ह्या कारणानें, ते इतरांच्यापेक्षां वेगळे दिसतात; इतरांशीं समरस होऊं शकत नाहींत. 'उगीच', 'सहज' हे शब्द त्यांच्या शब्दकोशांत नाहींतच मुळीं. विवेकाला पटेल तेंच करण्याचा ते आग्रह धरतील; एखाद्याला खूष करण्यासाठीं मिळतें घेणार नाहींत. पत्करलेलें काम तंतोतंत, कटाक्षानें पार पाडतील; कोणतीहि सबब सांगणार नाहींत. त्यांचा वक्तशीरपणा इतका, कीं ते मिनिटांची भाषा करतील. ते तोलून, मापून बोलतील. जी गोष्ट इतरांना कळण्याची आवश्यकता नाहीं, ती चुकूनहि सांगणार नाहींत. "आधीं केलें, मग सांगितलें" ह्या पद्धतीनें ते वागतात असें म्हणणेंहि चुकीचें आहे—"आधीं केलें, तरी न सांगितलें" अशी त्यांची पद्धत आहे! ते आगामी गोष्टींची जाहिरात करणार नाहींत,

कीं गतगोष्टींचा उच्चार करणार नाहींत. ह्या कारणानें, इतरांप्रमाणें त्यांची प्रसिद्धि होणें शक्य नाहीं. पण त्यांच्या स्वतःच्या शास्त्रीय जगाला ते सुपरिचित आहेत; तेथें प्रत्यक्ष कार्यच बोलत असतें !

डॉ. चिपळूणकरांनीं 'सृष्टिज्ञान' ह्या मासिकाच्या संपादकत्वाची धुरा कितीतरी वर्षे यशस्वी रीतीनें वाहिली आहे. शास्त्रीय विषय सोपा करून सांगण्याची त्यांची हातोटी त्यांच्या लेखांतून आणि रेडिओवरील भाषणांतून अनुभवाला येते. किर्लोस्कर, सह्याद्रि, केसरी, प्रभृतीमध्यें त्यांचें लिखाण प्रसिद्ध झालें असून त्यांचीं कांहीं पुस्तकेंहि सुप्रसिद्ध आहेत. त्यांनीं अशा रीतीनें शुद्ध संशोधनकार्य चालू ठेवून, तरुण संशोधकांना मार्गदर्शन करीत राहून, मराठी-मधून शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करण्याचें कार्य प्रभावीपणें पार पाडलें आहे. मराठी प्रतिशब्दांवांचून त्यांचें अडत नाहीं; ते आपला आशय सुबोध रीतीनें सांगू शकतात; कारण त्यांना त्याची तळमळ आहे.

त्यांनीं एका लेखकाच्या नव्या पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठीं (डॉ. चिपळूणकर हे उत्कृष्ट दर्जाचे हौशी चित्रकार आहेत) चित्र काढून देण्यास संमति दिली. ३० सप्टेंबरला चित्र तयार होईल, असें त्यांनीं सांगितलें. लेखकानें दहा-पंधरा दिवस आधीं त्यांच्याकडे चौकशी केली. तेव्हां डॉ. चिपळूणकरांनीं कॅलेंडरावरील ३० च्या आंकड्याकडे लक्ष वेधलें आणि त्या दिवशीं ठरल्या-प्रमाणें त्याला येण्यास सांगितलें. त्या दिवशीं संध्याकाळीं लेखक त्यांच्याकडे जातांच भिंतीवर फ्रेम करून आणून लावलेल्या चित्राचें त्यांनीं पडदा सारून अनावरण केलें आणि लेखकासाठीं शानदार किटलींतून चहा ओतला.

एकदां प्रस्तुत लेखक डॉ. चिपळूणकरांच्याकडे वेळ निश्चित करून गेला होता. सकाळची आठची वेळ होती. त्याच्या आधींच त्यांच्याकडे एक संशोधक येऊन बसले होते. प्रस्तुत लेखकाला डॉ. चिपळूणकरांनीं बसायला खुर्ची दिली आणि ते स्वतः उठून त्या संशोधकाला म्हणाले, "मीं ह्यांना आठ वाजतां कांहीं कामासाठीं बोलावलं आहें. आपण पुन्हां केव्हांतरी या !" वास्तविक, ते संशोधक आम्हां दोघांपेक्षांहि सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ; पण ठरलेल्या कामांत, दिलेल्या शब्दांत, बदल न करण्याच्या डॉ. चिपळूणकरांच्या शिस्तीला मात्र ते वळीं पडले.

'एन्डेव्हर' ह्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या, अनेक भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या शास्त्रीय त्रैमासिकांत डॉ. चिपळूणकरांचा दगांविषयीं संशोधनात्मक सचित्र लेख प्रसिद्ध व्हावयाचा होता. लेखाच्या प्रारंभीं तीन ओळींमध्यें लेखाचा सारांश डॉ. चिपळूणकरांनीं लिहून पाठविला होता. पण, त्यांत आणखी तीन शब्दांची भर घालण्याविषयीं त्या त्रैमासिकानें केवल धाडली होती. कारण, मजकूर कंपोज केला तेव्हां तेवढी जागा रिकामी राहिली होती. वास्तविक, शब्दांमधील अंतर वाढवून ती जागा सहज भरून काढतां आली असती. डॉ. चिपळूणकरांनीं आपले पांच शब्द केबल करून धाडले आणि लिहिलें—"तीन शब्द म्हणजे किती अक्षरें? मीं पाठविलेल्या पांच शब्दांपैकीं जरूर तेवढे शब्द वापरा."

डॉ. चिपळूणकरांचें नुकतेंच एक व्याख्यान झालें. 'रॉयल सोसायटीचा त्रिशतसांवत्सारिक उत्सव' असा व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यान इंग्रजींतून होईल अशी मूळ कल्पना; पण मराठींत विषय जाहीर झाल्यावर त्यांनीं तात्काळ मराठीमध्यें अस्खलित भाषण केलें.

कांहीं दिवसांपूर्वी त्यांच्याकडे रेडिओचा लायसेन्स तपासण्यासाठीं सरकारी इन्स्पेक्टर आला. लागलीच डॉ. चिपळूणकरांनीं आपल्या मुलीला हांक मारून सांगितलें, "अलका, आपल्या रेडिओचा लायसेन्स आण बरं ह्यांना दाखवायला." क्षणार्धांत तिनें तो लायसेन्स कपाटांतून काढून अप्पांना आणून दिला!

डॉ. चिपळूणकरांना जेव्हां मुंबई विद्यापीठाचें मूस मेडल मिळालें, तेव्हां ती गोष्ट विद्यापीठाचें प्रत्यक्ष पत्र हातीं येईपर्यंत त्यांनीं आपल्या आई-वडिलांनाहि सांगितली नाहीं. वास्तविक त्यांना स्वतःला ही बातमी कितीतरी अगोधीं कळली होती. न जाणो, कांहीं कारणामुळें आपणांस मूस मेडल मिळालें नाहीं तर? त्याचप्रमाणें सुमारें पांच वर्षांपूर्वी त्यांना युरोपला जाण्याचा योग आला होता; पण त्याबद्दल खात्री नव्हती. त्यांनीं परदेश-गमनाची सर्व तयारी केली, देवीसुद्धां टोचून घेतल्या, पण प्रत्यक्ष पत्नीलाहि त्याचा सुगावा लागूं दिला नाहीं. आधीं जाहीर झालेल्या गोष्टी घडून आल्या नाहींत, तर फजिती होते. पण बहुतेकांना आपली जाहिरात करण्याचा मोह आवरत नाहीं. ह्या खेपेस डॉ. चिपळूणकरांची दक्षता योग्य ठरली; कारण त्यांचें परदेशगमन घडून आलें नाहीं. आपल्या पत्नीला त्यांनीं ही हकीकत

मागाहून सांगितली. जायचें नक्की ठरलें असतें, तर आपल्यालाच सर्वांच्या आधीं कळेल, ही पत्नीची खात्री होतीच.

अशा प्रकृतीच्या संशोधकाच्या पत्नीची भूमिका किती कठीण असेल, ह्याची कल्पनाच केलेली बरी – खरें म्हणजे कल्पनाहि करतां येणार नाहीं ! तथापि, सौ. वासंतीबाईंनीं – पूर्वाश्रमींच्या कुमारी कृष्णाताई मराठे यांनी – डॉ. चिपळूणकरांना दिलेली साथ अलौकिक आहे. त्या स्वतः संस्कृत विषय घेऊन एम्. ए. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झालेल्या आहेत. त्यांनीं प्रत्येक परीक्षेंत चांगलें यश मिळवून शिष्यवृत्त्या व पारितोषिकेंहि मिळविलेलीं आहेत. प्राध्यापिका, लेखिका, वक्त्या ह्या नात्यांनीं त्या गाजू शकल्या असत्या. पण त्यांनीं आपलें कर्तृत्व पतीच्या कार्यासाठींच खर्च करायचें ठरविलें, आणि त्या डॉ. चिपळूणकरांना सर्व कामांत सर्व प्रकारें मदत करीत असतात. त्यांच्या लिखाणाला केवळ लेखनानेंच नव्हे तर विचारविनिमयानें सहाय्य करतात. अत्यंत मनमिळाऊ, सुस्वभावी, अबोल, कार्यतत्पर, संसारदक्ष अशा पत्नीमुळें डॉ. चिपळूणकरांचें कार्य अधिक प्रभावी होऊं शकलें. त्यांच्या आजारपणांत आणि बेकारीच्या काळांत सौ. वासंतीबाईंनीं वृद्ध सासू-सासऱ्यांचीहि मनोभावें सेवा केली. कशांतहि कसूर केली नाहीं. आजहि त्या पूर्वीसारख्याच साध्या आहेत. पतीच्या असामान्य यशामुळें त्यांचें सौजन्य आणखी विशेष खुलून दिसतें. आपली पत्नी निवडतांना डॉ. चिपळूणकरांनीं पत्नीच्या शारीरिक उंचीपेक्षां तिची मानसिक उंची पाहिली, सांस्कृतिक उंचीची पारख केली आणि सौ. वासंतीबाईंनींहि पतीच्या गुणावर भक्ति केली आणि त्यासाठीं तपश्चर्या पत्करली. त्या दोघांना एकमेकांबद्दल वाटत असणारा आदर ते बोलून दाखवीत नसले तरी त्या भावनेनें वातावरणच भारून गेलेलें आढळतें. डॉ. चिपळूणकरांचे कौटुंबिक जीवन बघणारालाहि किती आनंद होतो ! एखाद्या बरोबरीच्या प्राध्यापकाचा एक वेळ त्यांच्या हातून मान राखला जाणार नाहीं, पण आपल्या मुलांचें मन ते कधीं मोडणार नाहींत; तें मोडण्याची पाळीच मुलें येऊं देणार नाहींत. छांदिष्ट शास्त्रज्ञाचेंहि कौटुंबिक जीवन किती सुखी व समृद्ध असूं शकतें, ह्याचें डॉ. चिपळूणकरांचें कुटुंब हें उत्कृष्ट उदाहरण आहे. आजहि त्यांचे आई-वडील, भाऊ-बहिणी, मुलगे-मुली एकमेकांच्या भावना किती जपतात, हें पाहिल्याखेरीज समजणार नाहीं.

आम्ही कांहीं मित्र सुमारें २५ वर्षांपूर्वी भोर-अंबवड्याला सहलींसाठीं गेलों होतों, तेव्हां भोर येथें आम्हांला जो भात खायला मिळाला, त्याच्या आठवणीनेंसुद्धां त्याचा सुवास आणि आस्वाद पुन्हां मिळाल्याचा अजूनहि आनंद होतो. ठेवणींतल्या आंबेमोहराच्या तांदुळाचा तो भात होता आणि त्यावर साजूक ताजें गरम तूप वाढण्यांत आलें होतें. डॉ. चिपळूणकरांशीं कांहीं वेळ सहवासांत येणारालासुद्धां जो सात्त्विक, सुखकारक अनुभव मिळतो, तोहि असाच टिकाऊ असतो. पण त्यांच्या सहवासाचा लाभ मिळणें सोपें मात्र नाहीं !

६

# डॉ. मधुमालती गुणे

पुणें येथें एका सुप्रसिद्ध तज्ञ सर्जनच्या इस्पितळाचें मोठ्या थाटानें उद्‌घाटन झालें. ह्या समारंभास पुण्यांतील वैद्यकीय व्यवसायांतील आघाडीवरील बहुतेक स्त्री – पुरुष उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आधीं दोन-तीन मिनिटें एक स्त्री – डॉक्टर मंडपांत येऊन दाखल झाली. तिला समारंभाच्या चालकांनीं सन्मानानें पुढें नेऊन पहिल्या रांकेंतील कोचावर बसविलें. समारंभासाठीं आधीं येऊन बसलेले लोक नवीन येत असलेल्या लोकांचेकडे सहाजिकच निरखून बघत असतात व त्यांचेवर टीकाहि करीत असतात. माझ्या शेजारी बसलेल्या गृहस्थानें ह्या स्त्रीला पाहून जवळच्या आपल्या स्नेह्यास विचारलें, "ह्या बाई कोण रे ?" "अरे, ह्या तुला माहीत नाहींत ? मधुमालती ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या डॉक्टरीणबाई त्या ह्याच." मधुमालतीचें नांव माहीत नाहीं असे पुण्यांत अनेक लोक असले तरी टांगेवाले, टॅक्सीवाले, बसवाले, ह्या सर्वांना 'मधुमालती' हा पत्ता पूर्ण परिचयाचा आहे. साध्या एल. सी. पी. एस. असलेल्या या बाईनें पुण्यांतील डॉक्टरी व्यवसायांत कमालीचें यश व नांव संपादन केलें आहे. व्यवसायांत पुढें येण्यास परदेशी, महागड्या व उच्च पदव्यांचा उपयोग होत असला, तरी त्यांचें प्रस्थ माजवून दुपार परंतु गरीबीमुळें स्थानिक पदवीवर संतुष्ट राहावें

लागणाऱ्या लोकांवर नालायकीचा शिक्का मारणारांना मधुमालतीनें चांगलेंच उत्तर दिलें आहे. तिच्यापेक्षां कितीतरी जास्त शिकलेल्या व पिढीजात श्रीमंत डॉक्टरांना तिचेबद्दल हेवा वाटावा, अशी परिस्थिति आज निर्माण झाली आहे. ह्या मधुमालतीमध्यें कांहीं तरी विशेष असले पाहिजे, हें उघड आहे; त्याविना ताईच्या व्यवसायाची अशी अखंड प्रगति चालू राहिलीच नसती.

ताईचें जंगली महाराज रोडवरील तिमजली नवें भव्य इस्पितळ सर्वांना दिसतें. त्यांच्या मोटारी, घरांतील कित्येक नोकरचाकर व सहाय्यक इत्यादि पसारा, फिरावयास अगर टेनिस खेळावयास जाणारी त्यांची मुलगी लाली उर्फ रंजना, महाबळेश्वरचा मोठा बंगला, सकाळचें त्यांचें टेनीस, अधून मधून रात्रींचीं नाटकें, इत्यादींवरून त्यांच्या ऐश्वर्याबद्दल व चैनीबद्दल हेवा करणारे कितीतरी असतील. परंतु, ताईची बैठक किती कष्टाची आहे आणि ह्या ऐश्वर्याचा उपभोग वाटतो त्या मानानें त्यांना किती कमी प्रमाणांत घेतां येतो, हें फक्त जवळून निरीक्षण करणारांच्या लक्षांत येईल. त्यांना विश्रांति किती कमी मिळते, दिवसांतील किती तास त्या अक्षरशः स्वतःच्या पायावर उभ्या असतात, किती वेळ त्यांचा कामांत जातो आणि चैनीस वेळ कसा उरतच नाहीं, हें इतरांना कसें समजणार? दिवसाकाठचें त्यांचें अत्यल्प व साधें खाणें-पिणें पाहिलें आणि त्यांची एकसारखी धांवपळ पाहिली तर असें वाटेल कीं, एवढें मोठें प्रॅक्टिस असून करावयाचें आहे काय? मिळकतीचा उपभोग घेण्याची तयारी नसेल तर श्रीमंतीचा उपयोग काय? महाबळेश्वरला स्वतःचा मोठा बंगला रिकामा ठेवून, पुण्यांत भर उन्हाळ्यांत घाम पुशीत काम करीत रहाण्यांत किती मोठें सुख व समाधान असतें, ह्याची कल्पना सामान्य लोकांना येणार नाहीं.

मधुताई ज्या ज्या गोष्टी करतात त्या सर्वांत त्या पूर्ण लक्ष घालतात. त्यांचा रोख स्वतःच्या व्यवसायाचा उत्कर्ष साधणें, हाहि त्या बरोबर नेहमीं असतो. लोकांच्या ओळखी व्हाव्या व त्या टिकाव्या ह्यासाठीं आलेल्या प्रसंगांचा योग्य तो फायदा त्या जरूर घेतील. मनमिळाऊ स्वभाव, हंसतमुख, बोलण्यांत चातुर्य, इत्यादींमुळें चारचौघांत त्या उठून दिसल्या तर त्याचा व्यावहारिक दृष्टीनेंहि उपयोग झाल्याविना रहात नाहीं. कोणाचीहि ओळख न विसरणें, विचारपूस करणें, दैनंदिन घडामोडींची ताजी माहिती असणें, निंदा किंवा

कुचेष्टा न करणें, राग न येणें किंवा तो आल्यावरहि न दाखविणें, रोग्यासाठीं कष्ट करण्यास सदैव तत्पर असणें, आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा राहील अशा योग्य त्या पद्धतीनें वावरणें, इत्यादि गुणांमुळें त्यांची लोकप्रियता वाढली नाहीं तरच नवल. अर्थात, जसजशा ओळखी पसरतात, ऐपत वाढते, तसतशा लोकांच्या अपेक्षांनाहि निर्बंध रहात नाहीं आणि त्या पुऱ्या करणें कधींच शक्य नसतें. तेव्हां, मधुताईंचेकडून अपेक्षा पुरी झाली नाहीं म्हणून रागावलेले कांहींजण असले तरी त्यांची रोजची दिनचर्या व कामाचा व्याप ह्यांचा विचार करणारे त्यांच्या वागण्याबद्दल एकंदरीत कौतुकच करतील.

फर्ग्युसन कॉलेजांतील सुप्रसिद्ध संस्कृत प्रोफेसर कै. डॉ. पांडुरंग दामोदर गुणे ह्यांच्या शिष्यत्वाचा किंवा दातृत्वाचा ज्यांना पूर्वी लाभ झालेला असेल त्यांनाच मधुताईंच्या पार्श्वभूमीची कल्पना येईल. अत्यंत सांस्कृतिक व प्रेमळ वातावरणांत आणि लाडांत त्यांचें बालपण गेलें. परंतु १९२२ सालीं तात्यांच्या अकाली मृत्यूनंतर सर्व परिस्थिति एकदम पालटली. ज्या तात्यांच्या आश्रयानें अनेक विद्यार्थी व नातेवाईक विद्यार्जन करून कृतार्थ झाले, त्याच तात्यांच्या मुलामुलींना वनवास पत्करावा लागला. सुखाचा काळ जाऊन दारिद्र्य आलें आणि मानहानी सोसण्याची पाळी आली. श्री. इंदिराबाईंनीं पूर्वीचे दिवस विसरून कोणत्या दुःखी अंतःकरणानें मुलांची जोपासना केली असेल हें त्यांचें त्यांनाच माहीत. पूर्वीचे मित्र दूर झालेले, सर्व आधार तुटलेले, परंतु मुलें मात्र गुणी म्हणूनच त्यांचा धीर टिकला असला पाहिजे. त्याहि १९२६ मध्यें निवर्तल्या आणि सर्व भावंडांचा सांभाळ आजीकडे आला. मधूची रवानगी हिंगणें येथील अनाथ बालिकाश्रमांत करण्यांत आली. तेथें तिनें तीन वर्षे काढून व नंतर हुजुरपागेंत मॅट्रिकला बसून बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें प्रवेश मिळविला. तात्यांच्या कांहीं मित्रांनीं अधून मधून विचारपूस करावी, सात-आठ जणांचा घरखर्च कसातरी चालावा आणि वर येण्याच्या दृढ निश्चयानें मान खालीं घालून अभ्यास करावा, काम करावें, असे ते दिवस होते.

खुशालींत बालपण गेलेल्या मधूनें पुढें शनिवार पेठेंतल्या सार्वजनिक हौदावर कित्येक वर्षे घरच्यां धुणीं धुतलेलीं आहेत, भांडीं घासलेली आहेत. डॉक्टर गुण्यांची मुलगी अशा अवस्थेंत दिसूं नये, म्हणून अंधार पडल्यावर हौदावर बादली घेऊन जाणारी मधी मधूज्यांनी पाहिली असेल त्यांनाच

तिच्या आजच्या परिस्थितीबद्दल खरा आदर व कौतुक वाटेल. ती हिंगण्याला अनाथ बालिकाश्रमांत होती, तेव्हां संस्थेस भेट देणाऱ्या प्रत्येकाला, "ही डॉ. गुण्यांची मुलगी !" म्हणून दाखविल्या जाणाऱ्या मधूच्या मनाची कल्पना काय होत असेल ह्याचा इतरांना विचार करण्याचें तेव्हां कारण नव्हतें. पण, अशा होरपळलेल्या मुलीनें अपमान गिळून दृढ निश्चयानें आस्ते कदम पुढें यावें, हें विशेष आहे. मधूनें एफ. आर. सी. एस. ही उच्च पदवी मिळवून नामांकित सर्जन व्हावें, अशी तात्यांची मनापासून इच्छा होती. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर तिचें साधें शिक्षणहि कठीण झालें, तेव्हां ही पदवी प्राप्त करण्यास साधन कोठून मिळणार ? पुण्यांत मिळणारी एल. सी. पी. एस. ची पदवी मधूनें १९३२ मध्यें मिळविली आणि पुढें १९३४ सालीं ती कर्ज काढून विलायतेला जाऊन बाळंतपण करण्याचें विशेष शिक्षण घेऊन आली. साध्या पदव्यांना पोषक गुणांची जोड देऊन तिनें आपल्या व्यवसायांत असामान्य यश मिळविलें आहे. आपण फार मोठी पदवीधर डॉक्टरीण नाहीं, ह्याची मधूताईंना पूर्ण जाणीव आहे. मोठ्या पदवीवाल्याकडे लोकांची पहाण्याची दृष्टि वेगळी असते. बड्या डॉक्टरांना चुका करण्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो. परंतु न झालेल्या चुकीचेंहि खापर लहान डॉक्टराचे डोक्यावर फोडलें जातें. मधूताई आपल्या रोग्याची एवढी काळजी घेतात आणि जरूरीप्रमाणें इतर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यास नेहमीं तत्पर असतात, त्यामुळें रोग्यांना त्यांचा मोठाच आधार वाटतो.

रोग्यांच्याबद्दल चोवीस तास काळजी करीत बसणारा डॉक्टर क्वचितच आढळतो. पण मधुताई रोग्याच्याबद्दल काळज्या नेहमीं आपल्या डोक्यांत बाळगतील, त्यामुळें त्यांना स्वतःला पूर्ण विश्रांति कधींच मिळत नाहीं. इस्पि-तळाच्या बाहेर पडलें, कीं रोग्याचा विचार बंद, असें त्यांच्या बाबतींत केव्हांच होत नाहीं. रोग्यांची अपेक्षा नसतांहि, मधूताईंना जरूर वाटलें तर त्या आपण होऊन जाऊन त्यांची चौकशी करतील. डॉक्टरणीच्या व्यवसायांत त्यांनीं आपल्या तोंडानें पैसे नाहींत म्हणून कोणास औषध नाकारलें आहे, असें होणार नाहीं. चांगुलपणा व व्यवहार ह्यांच्या संगमाचें त्या उत्कृष्ट उदाहरण आहे असें म्हटलें, तर त्यानें चांगुलपणास बाध येण्याचें कारण नाहीं.

मधुताईंचें बालपण लाडांत गेलें परंतु लहानपण व विद्यार्थीदशा हलाखींतच गेली. ह्या आपत्तीचे वेळीं तात्यांचे शिष्य प्रा. न. गो. (नानासाहेब) सुरू ह्यांनीं आपल्या शक्तीनुसार जो आधार दिला आणि शिक्षणाला जी मदत केली, त्याबद्दल मधुताईंना अजूनहि ऋणी वाटत आहे. त्यांचें सहाय्य मिळालें नसतें, तर आपल्याला शिक्षण पुरें करतां आलें नसतें आणि डॉक्टरहि होता आलें नसतें, इतकेंच नव्हे तर एखाद्या अडाण्याची बायको म्हणून जन्मभर नांदण्याची पाळी आली असती, अशी त्यांची धारणा आहे. पुष्पांच्या दोन अवस्था असतात : " लोकांचिये एक शिरीं वसावें, वनींच कीं एक सुकोनि जावें. " ह्यापैकीं दुसरी अवस्था ह्या मधुमालतीच्या वांट्याला आली नाहीं, ह्याचें श्रेय नानासाहेबांच्या वेळेवारी मदतीलाच त्या देतात. त्याचबरोबर, आपल्या वडिलांच्याबद्दल आदरभाव आणि त्यांच्या नांवाचा अभिमान मधुताईंना कमालीचा वाटतो. डॉक्टर मधुमालती गुणे आणि सौ. सुरू ह्या दोन्ही भूमिकांशीं त्या समरस झालेल्या आहेत. प्रसिद्ध व्यक्तींचे विवाह खासगी बाबी न राहतां त्यांना सामाजिक स्वरूप प्राप्त होतें, तसेंच येथें घडलें. ह्या सर्व प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून मधूताईंनीं अपूर्व यश मिळविलें आहे व मात करून दाखविली आहे. परंतु त्यांच्या ह्या कर्तृत्वापेक्षां त्यांचें ऐश्वर्यच आज समाजाला दिपवूं लागलें आहे. मधुताईंनीं व्यवसाय यशस्वी करून द्रव्य संपादन केलें, तेव्हां आतां पूर्वी ओळख दाखविण्यास तयार नसणारे आतां जुन्या आठवणी व नातीं काढूं लागले आहेत. मधुताईंच्या विचारांत किंवा बोलण्यांत मात्र फरक पडलेला नाहीं किंवा कटुता आलेली नाहीं. त्या सर्वांशीं सारख्याच ताज्या वृत्तीनें वागतात.

मधुताईंचा बहुतेक सर्व वेळ त्यांच्या व्यवसायांतच खर्च होतो. तथापि, त्यांनीं आपलें जीवन नीरस केलेलें नाहीं. विश्रांतीच्या व करमणुकीच्या वेळेचा अधिकांत अधिक चांगला उपयोग करून त्या आपली कार्यक्षमता वाढवीत असतात. अर्थात्, डॉक्टरीण झाल्यानंतरच ह्या गोष्टी शिकणें त्यांना शक्य झालें. त्या टेनिस आपल्याकडील स्त्रियांच्या मानानें उत्तमच खेळतात. त्या खेळाच्या सामन्यांत त्यांनीं दहा-बारा पेले जिंकलेले आहेत. त्यांना पोहण्याचीहि आवड आहे, थोडेंफार गातां येते, नाटकांतहि त्यांनीं नायिकेचें काम केलें आहे. मित्रमंडळींबरोबर सहलीला गेल्या, तर बाकीचे

लोक आरामांत बसले तरी त्या मांडीं धुण्यांत रंगून जातील. दररोज कांहीं ताम तरी आपल्या मुलीबरोबर घालवितील. त्यांची रंजना आतां कॉलेजमधील विद्यार्थिनी झाली असली, तरी तिला एक दिवस आड तरी आईनें न्हायला घातलेलें आवडतें. ह्या न्हाण्याचा कार्यक्रम बराच वेळ चालतो; ह्याच निवांत वेळीं मधुताई आपल्या मुलीशीं मोकळेपणानें बोलून तिला घडवीत असतात. आपल्याला जें शक्य झालें नाहीं, तें तिनें करून दाखवावें, अशी त्यांची अंतर्यामींची इच्छा आहे. त्यांच्या विशिष्ट स्थानामुळें व गोडव्या स्वभावामुळें त्यांच्याकडे पाहुणे मंडळींची वर्दळ नेहमीं असावयाचीच. परंतु त्यांना न दुखविण्याची कला मधुताईंचे जवळ आहे. मधुताईंच्या बोलण्यांत त्यांच्या पूर्वेतिहासाची कथा कदापि येत नाहीं. त्या स्वतःचा दिमाख दाखवीत नाहींत. माझ्या एका मित्रानें वडिलार्जित पैशानें एक बंगला बांधला आहे. त्याचें वर्णन करून सांगण्यांत लोकांना तो दाखविण्यांत आणि लोकांचेकडून कौतुक वदविण्यांत त्याचा कितीतरी वेळ जातो, हें मी पाहिलें आहे. मधुताई स्वतःच्या इस्पितळाबद्दल चुकूनहि बोलत नाहींत.

मिळवत्या स्त्रियांना स्वतःच्या व्यवसायावर लक्ष केंद्रित करणें पुष्कळदां कठीण जातें. त्यांचे पति त्या भूमिकेचा विसर त्यांना पाडूं देत नाहींत. मधुताईंचे पति ह्या दृष्टीनें अगदीं वेगळे आहेत. व्यवसायांत पुष्कळ वेळां बिकट प्रश्न उपस्थित होतात, तेव्हां त्यांचें मार्गदर्शन मधुताईंना केव्हांहि उपलब्ध असतें. परंतु पति म्हणून त्यांच्या अपेक्षा अगदीं किमान आहेत. पत्नी आपल्या वांट्याला अधिक येण्यापेक्षां, ती रात्रंदिवस पेशंटांची करीत असलेली दुःखनिवृत्ति आणि त्यामुळें तिला वाटणारें समाधान त्यांना अधिक मोलाचें वाटतें. त्यांची वृत्तीच मधुताईंना जास्तींत जास्त वाव देण्याची प्रथमपासूनच आहे. त्यामुळें आपला सर्व वेळ व्यवसायांत खर्च करण्यास मधुताई मोकळ्या असतात. परंतु त्याचा गैरवाजवी फायदा त्या घेत नाहींत. संसारांत लक्ष देतां येईल तेवढें देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. पत्नी ह्या दृष्टीनें त्यांचें वागणें, बोलणें-चालणें, कोणत्याहि स्त्रीस शोभेल असें असतें. हाताखालीं काम करण्यासाठीं मधुताईंनीं निवडलेले सहाय्यक व नोकर अत्यंत इमानी व कष्टाळू असेच आहेत. त्यांना मालकिणीबद्दल प्रेम व आदर वाटावा, मालकिणीचें काम करण्यांत भूषण वाटावें, अशीच मधुताईंची वागणूक आहे. स्त्रियांच्या

हाताखालीं नोकर टिकत नाहींत, असें म्हणतात. मधुताईची त्याबाबत शिकवणी ठेवण्यास हरकत नाहीं. नानासाहेबांचें संभाषण—चातुर्य मधुताईच्या मूळ गोडव्या स्वभावांत मिसळलें असल्याकारणानें, पेशंट व नोकर हे सर्वच त्यांचेवर खूप होतात. त्यामुळें व्यवसायाची वाढ होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाल्याविना रहात नाहीं.

३ जानेवारी, १९५२ हा मधुताईच्या आयुष्यांतील अत्यंत आनंदाचा दिवस. स्वतःच्या 'मधुरंजन' मध्यें त्यांचें इस्पितळ त्या दिवशीं गेलें. मधुताईची ज्या ज्या वेळीं भेट होते. त्या त्या वेळीं माझे डोळ्यांपुढें मधुताईच्या जीवनाचा संबंध चित्रपट उभा रहातो. पति एका प्रमुख कॉलेजाचा प्रिन्सिपॉल, थोरला भाऊ दुसऱ्या एका कॉलेजांत प्रोफेसर, आणि धाकटा भाऊ लष्करांत मोठ्या हुद्यावरील अधिकारी; तरी त्या सर्वांचेपेक्षां मधुताईच्या यशाचें व आकांक्षाचें तेज अपूर्व आहे! एकुलत्या एका लहान मुलीपलीकडे स्वतःचा व्याप नसलेल्या मधुताईनीं पैसे सांठवीत न बसतां त्याचें मोठें इस्पितळ बांधावें आणि नव्या उमेदीनें आणखी दूरचीं उंच शिखरें काबीज करण्याचें ध्येय बाळगावें, हें त्यांच्या प्रगतिप्रिय मनोवृत्तीचें टोलेजंग लक्षण आहे. इस्पितळाची प्रत्येक वीट मधुताईच्या श्रमांची बनलेली आहे आणि त्या विटा रुग्णांच्या समाधानानें व कृतज्ञतेनें सांधलेल्या आहेत. तात्यांच्या चांगुलपणाच्या भांडवलाचा मधुताईनीं उत्कृष्ट उपयोग केला आहे, त्यांच्या पुण्याईत भर घातली आहे, त्यांच्या वृत्तीचा विकास करून त्यास साधनसंपन्नतेची जोड दिली आहे. आईचें ऋणहि त्या विसरलेल्या नाहींत. धन्य त्या माता-पितरांची!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८३८ दि:
क्रमांक २८२४ नों दि: २०।१।८८

# ७

# केशवराव भोळे

१९१८–१९ सालांतील ही गोष्ट आहे. मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांतील विद्यार्थी केशव भोळे अमरावतीला आपल्या घरीं सुट्टींत आला होता. गांवाच्या उपनगरांत मोडक वकिलांचे घरीं केशव संध्याकाळीं जायचा आणि बॅडमिंटनचा खेळ संपल्यावर तिथें त्याचें गाणें चालायचें. 'ललितकले'चा मुक्काम त्यावेळीं अमरावतींतच होता. केशवराव भोसल्यांनीं फिरायला जातांना हें गाणें पुष्कळदां ऐकलें, पण तें कुणाचें आहे हें त्यांना समजलें नाहीं. ते भोळे कुटुंबाचे मित्र होते; त्यांनीं केशवच्या बंधूंच्याकडे पृच्छा केली आणि ह्या गायकाला गाणें ऐकवायला कंपनींत घेऊन येण्याला सांगितलें. बंधूंनीं बरोबर आणलेला गायक आपल्या परिचयाचा केशव भोळे हाच आहे हें पाहून आणि त्याचें बैठकींतलें गाणें जवळून ऐकून केशवराव भोसले आश्चर्यचकितच झाले. "कांहीं झालं, तरी तो केशवच आहे; केशव चांगला गाणारा असायचाच" असे केशवराव भोसल्यांनीं उद्‌गार काढले.

दुसऱ्याच दिवशीं केशवराव भोसले आणि कंपनीचे मॅनेजर शितूत हे केशव भोळेच्या आईकडे आले आणि "ललितकलेसाठीं स्त्री पार्टाकरितां तुमचा केशव द्या" अशी मागणी केली. आपला मुलगा नाटकांत जावा, अशी

आईची इच्छा नव्हती आणि केशवला तर स्त्री-पार्ट पसंत नव्हताच, त्यामुळें केशव भोळे नट होण्याचें टळलें. पुरुष भूमिकेसाठीं केशवराव भोसल्यांनीं गळ घातली असती, तर केशव भोळे त्याला बळी पडला असतेहि कदाचित् !

पण, ह्या घटनेचा एक मात्र फायदा झाला. केशव भोळेच्या गाण्याच्या छंदाला संगीताच्या आवडीचा दर्जा प्राप्त झाला. त्याचें घरांतील महत्त्व वाढलें. खुद्द बंधूंनींच त्याला भातखंड्यांची शास्त्रीय संगीताचीं पुस्तकें विकत आणून दिलीं. केशव भोळे मुंबईला परत गेला पण डॉक्टर न होतां संगीत आणि नाट्यप्रेमी रसिक साहित्यिक बनला. मुंबई येथें रेडिओ केंद्र सुरू झाल्यावर त्यांचीं गाणीं ध्वनिक्षेपित होऊं लागलीं. केशवराव भोळे यशस्वी संगीतदिग्दर्शक झाले, त्याचें रहस्य ते डॉक्टरी परीक्षेंत गाण्याच्या छंदामुळें अयशस्वी होण्यामध्यें आहे. त्यांचा क्रिकेटचा छंद अधिक प्रभावी ठरला असता आणि ते कॉलेजच्या संघांतून खेळले असते, तर त्यामुळें ते परीक्षांतून कदाचित् सुटलेहि असते. पण, एक डॉक्टर कमी झाल्यानें साहित्य-संगीताचा फायदाच झाला आहे.

केशवरावांचें मूळ घराणें रत्नागिरी जिल्ह्यांतलें. त्यांचें आजोळ पुण्याचें, पण वडिलांची नोकरी झाली वऱ्हाडांत, इंजिनिअरिंग खात्यांत. त्यांना गाणें ऐकण्याचा अतिशय नाद होता. स्वतः सतार चांगली वाजवीत असत. अमरावतीमधील त्यांच्या वाड्यांत गाणीं, प्रवचनें, कीर्तनें, नेहमीं चालायचीं. रावसाहेबांच्या एकूण १४ अपत्यांपैकीं केशवराव हे शेंडेफळ. वडिलांच्या मृत्यूनंतर एक महिन्यानें २३ मे, १८९६ रोजीं यांचा जन्म झाला. मामा-मामी, आजोबा ( आईचे वडील ) आणि आई ह्यांच्या देखरेखी-खालीं केशवरावांचें बालपण गेलें. आई पहांटे उठून, स्नान करून, भूपाळ्या, स्तोत्रें, वगैरे म्हणत असे. वाड्यांतील शेजारी मल्हारराव चिटणीस ह्यांच्या पाठांतराची, थिऑसॉफीच्या तत्त्वज्ञानाची, प्रगतिपर विचारांची त्यांतच भर पडली. वेगवेगळ्या ग्रंथांचें आणि लेखांचें वाचन आणि चर्चा वाड्यामध्यें चाले. ग्वाल्हेर येथील साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष, सौ. कुसुमावती देशपांडे ह्यांचें हें आजोळ होतें. मुधोळकर, दादा-साहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, सर मोरोपंत जोशी, अशा थोरामोठ्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा ठसा त्यावेळीं अमरावतीच्या तरुणांवर उमटला होता. केशवराव भोळे अशा वातावरणांतच लहानाचे मोठे झाले.

केशवरावांचे थोरले मेहुणे यवतमाळचे निमकर हे नाटकप्रेमी, संगीतशोकी होते. नाटक मंडळ्यांचे मुक्काम त्यांचेकडे असायचे. केशवराव भोसल्यांचा आणि केशव भोळेचा त्यामुळें दीर्घकाळ संबंध आला. प्लेगची सांथ केशव भोळेला उपकारक ठरली; कारण त्यामुळें गाणें म्हणायला, पेटी वाजवायला, तबल्याची साथ करायला त्यांना राजरोस सवड मिळायची. केशव भोळे आतां भजनें म्हणूं लागला आणि त्यामुळें गांवांतील स्वतःच्या वाड्यांतहि त्याला संगीताचा व्यासंग सुरू ठेवायला संधि मिळाली. अभ्यासाचा झक्क लावणारे आणि संगीताच्या आड येणारे मामा आतां निवर्तले होते.

लहानपणापासून नाटकें पाहून, त्यांतील गाणीं स्वतः म्हणायला लागून, कीर्तनें ऐकून, अमरावतीच्या वकिलांच्या क्लबांतील मैफलींचा आस्वाद घेऊन, मोटमोठ्या गायकांच्या तोंडून ऐकलेले राग टिपून घेऊन, केशवरावांनीं आपलें संगीताचें ज्ञान वाढविलें. भास्करबुवा बखले ह्यांच्या सहवासाचा केशवरावांवर विशेष संस्कार झाला. पण त्यांचा संगीताचा अमका एक गुरु, असें सांगतां येणार नाहीं. त्यांनीं स्वतःच्या बुद्धिमत्तेनें आणि परिश्रमानें ठिकठिकाणच्या संगीतांतून स्वतःचें संगीत बनविलें आहे. १९१७ सालीं नागपूरला इंटरची परीक्षा उत्तीर्ण होऊन केशवराव डॉक्टर होण्यासाटीं मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत दाखल झाले. एम्. बी. बी. एस्. च्या अंतिम परिक्षेतहि ते दोनदां नापास झाल्यानंतर त्यांचें वैद्यकीय शिक्षण थांबलें. पण मुंबईमधील वास्तव्यांत त्यांच्या साहित्याच्या आणि संगीताच्या छंदानें खूपच प्रगति केली. त्यावेळीं मुंबई शहरावर केशवराव भोसले आणि बालगंधर्व मोहिनी घालून बसले होते. नाट्य आणि संगीत ह्यांच्या धुंदींत रसिक मग्न झाले होते. केशवराव भोळे ह्यांनीं आपलें तारुण्य त्यांत घालवलें नाहीं; कारणीं लावलें. गायनाच्या बैठकींना ते न चुकतां जात; जलसे ऐकत आणि इतर वेळीं ग्रामोफोनच्या तबकड्या लावीत बसत. स्वतःच्या गळ्यालाहि त्यांनीं वळण लावलें. अत्यंत बुद्धिमान, ध्येयनिष्ठ, उत्साही, अशा तरुणांच्या वर्तुळांत समाविष्ट झाले. नाटककार वर्तक, केशवराव दाते, आळतेकर, के. नारायण काळे, अनंत काणेकर, ह्यांच्या 'शाळें'त ते दाखल झाले. आंधळ्यांच्या शाळेंतील "एकलेपणाची आग लागली हृदया"ची विंबा प्रेक्षकांना धुंद करीत होती, पण त्या सेटिंगच्या मागें केशवराव गुप्तपणें तार छेडीत होते !

केशवरावांच्या पार्श्वसंगीताच्या नियोजनाचा बराच बोलबाला होऊन प्रभात फिल्म कंपनीनें त्यांना संगीत दिग्दर्शक म्हणून येण्याबद्दल आमंत्रण दिलें. प्रभात कंपनींत त्यावेळीं संगीत दिग्दर्शक म्हणून गोविंदराव टेंबे हे जरी होते, तरी कंपनीशीं त्यांचा करार संपत आला होता आणि कंपनी कोल्हापुराहून पुण्याला स्थलांतर करणार होती. १२ डिसेंबर, १९३३ रोजीं केशवरावांनीं संगीत दिग्दर्शकाचीं सूत्रें आपणांकडे घेतली. नाट्यमन्वंतराच्या कित्येक नाटकांना पार्श्वसंगीत देणारे केशवराव आतां बोलपटसृष्टींत प्रवेश करते झाले.

पार्श्वसंगीतामुळें चित्रपटाची परिणामकारकता किती वाढते हें 'पूरणभक्त' ह्या बंगाली चित्रपटानें सिद्ध केलें होतें. चित्रपट संगीताविषयीं शांतारामबापू प्रयोग करण्यास तयार होते. त्यांना धडपड करणारा, ध्येयवादी, संगीत-दिग्दर्शक हवा होता; केवळ नाटकांतील संगीत चित्रपटांत आणणारा नको होता. केशवराव हे दोन-चार वाद्यांवर भागविणारे संगीततज्ञ नव्हते. वेगवेगळ्या वाद्यांतून सुसंवाद निर्माण करून चित्रपटाला पार्श्वसंगीत देऊन तो अधिक परिणामकारक (संवेदनाक्षम) करण्याचा चंग त्यांनीं बांधलेला होता. चित्रपटनिर्मितीच्या अनेक घटकांपैकीं आपण एक आहोंत; कथानकाला उठाव येण्याचे दृष्टीनें सर्व घटकांमध्यें सुसंवाद आवश्यक आहे; दिग्दर्शकानें योग्य त्या बाबीला योग्य तें महत्त्व द्यावें; त्यासाठीं चर्चा आणि विचारविनिमय होऊन सर्व कांहीं ठरावें, असा केशवरावांचा दृष्टिकोन होता. त्यांनीं संगीतदिग्दर्शन केलेला 'प्रभात'चा पहिलाच बोलपट म्हणजे 'अमृतमंथन' कमालीचा यशस्वी झाला. त्यानें 'प्रभात'ला कीर्ति मिळवून दिली. टीमवर्कचा तो सुपरिणाम होता. 'तुकाराम' ह्या दुसऱ्या बोलपटानें केशवरावांच्या यशांत भरच घातली. 'प्रभात'ला त्यांचें सहकार्य मोलाचें वाटलें आणि त्यांचा करार बेमुदत वाढविण्यांत आला. केशवरावांनीं आपलें बिऱ्हाड पुण्यांत आणलें.

केशवरावांनीं चित्रपटांतील संगीताला वास्तवता आणून तें लोकप्रिय केलें. गाण्यांची संख्या आणि जागा बोलपटाला पोषकच असायला हवी, ह्या दृष्टीनें ते विचारपूर्वक योजना करीत. कुंकू, माझा मुलगा, इत्यादि चित्रपटांतील त्यांची योजना व संयम ह्या दृष्टीनें उल्लेखनीय आहे. त्यांनीं संगीत दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांची यादीच किती बोलकी आहे, तें पहा. अमृतमंथन (मराठी, हिंदी), चंद्रसेना (मराठी, हिंदी, तामीळ), रजपूत रमणी (हिंदी),

तुकाराम ( मराठी ), कुंकू ( मराठी, हिंदी ), माझा मुलगा ( मराठी, हिंदी ), संत ज्ञानेश्वर ( मराठी, हिंदी ), संत सखू ( मराठी, हिंदी ), दहा वाजता ( मराठी, हिंदी ), रामशास्त्री ( मराठी, हिंदी ), ह्या 'प्रभात'च्या चित्रपटांना केशवरावांनीं संगीतानें सजविलें. त्याचप्रमाणें, त्यापूर्वी श्रीकृष्ण फिल्म कंपनीच्या 'संत सखू'ला आणि 'कृष्णावतारा'लाहि त्यांनीं संगीताचा हातभार लावला होता. मोहन पिक्चर्सच्या 'तारामती'लाहि त्यांनीं संगीत दिलें होतें. १९४४ अखेर केशवराव हे चित्रपटांच्या संगीतदिग्दर्शकांत अग्रस्थानीं होते.

त्यानंतरची दहा वर्षें केशवरावांनीं आपला साहित्यिक संसार समृद्ध करण्यांत घालविलीं; संगीतावर अभ्यासपूर्ण लेख लिहिले, नाटकें बसविलीं. संगीताच्या शिकवण्या केल्या. त्यांच्या तपश्चर्येचा फायदा लोकांना वेगळ्या माध्यमांतून लवकरच मिळूं लागला. १९५३ मध्यें ते मुंबई रेडिओ केंद्रांतील लाइट म्यूझिक विभागाचे अधिकारी झाले. भक्तिसंगीत, नाट्यसंगीत, स्त्री-गीतें, लोक-गीतें, स्वातंत्र्य-गीतें, भाव-गीतें, उषा-स्तोत्रें, ओव्या, अभंग, फेरार्चीं गाणीं, भारूड, इत्यादींचें मंथन करून तीं रेडिओला योग्य अशी बसवून दिलीं. सुमारें सात वर्षांच्या आपल्या कारकीर्दींत त्यांनीं किमान २,००० गाणीं ध्वनिमुद्रित केली. तीं आतां ठिकठिकाणच्या केंद्रांवरून आपणांस ऐकावयास मिळतात. गाण्यांची निवड, त्यांच्या चाली, त्यांची मोहकता, त्यांचा सांस्कृतिक दर्जा, ह्या सर्वांच्यामागें केशवरावांचा हात आहे, तें तीं ऐकणारांना माहीतहि नसणार. पण आज लक्षावधि लोकांना दररोज त्यांच्या संगीतदिग्दर्शनाचा फायदा घरबसल्या मिळत आहे.

केशवराव मुंबईमध्यें असतांना ते केळेकर कुटुंबाशीं परिचित झाले आणि दुर्गाला ते भावगीतें शिकवूं लागले. त्या दोघांनीं विवाहबद्ध होण्याचें ठरविलें, तेव्हां दोन्ही पक्षाच्या नातेवाईकांनीं विरोध जाहीर केला. वधू आणि वर हीं दोघें अगदीं वेगळ्या पार्श्वभूमीचीं, भिन्न वातावरणांतली आणि निराळ्या संस्कारांतलीं होतीं. खरें सांगायचें म्हणजे हा विवाह मोठीच आव्हानाची समस्या होती. पण केशवरावांचा पिंड खराखुरा प्रागतिक होता. ते क्रियाशील सुधारक होते. त्यांनीं दुर्गाशीं विवाह करायचें ठरवलें, तो पूर्ण विवेकांतीं, ध्येयनिष्ठेनें; केवळ प्रेमाच्या आवेगात सांपडून नव्हे. केशवरावांच्या ज्येष्ठ

बंधूंना हा विवाह पसंत पडला नाहीं, पण त्यासाठीं केशवराव थांबले नाहींत. एके दिवशीं सकाळीं केशवराव आणि दुर्गा हे दोघे ' श्रीकृष्ण फिल्म कंपनींत ' चित्रपटाच्या कामाकरतां म्हणून घरून निघाले, ते थेट सुंदरराव वैद्यांच्याकडे गेले आणि विवाहबद्ध झाले. हळूहळू विरोध ओसरला आणि आतां तर हें दांपत्य सर्वांच्या आदरास पात्र झालें आहे. दुर्गाचें ज्योत्स्नाबाईंत रूपांतर झालें, त्याचप्रमाणें एका उदयोन्मुख गायिकेचें अखिल भारतीय कीर्तीच्या गायिकेंत, नटींतहि रूपांतर झालें. त्याचें बरेचसें श्रेय केशवरावांचें प्रोत्साहन, शिकवण, समंजसपणा, ह्यासच ज्योत्स्नाबाई मोठ्या आनंदानें देतात.

पुणें येथें शिवाजीनगरमधील आपटे रस्त्यावरील ' स्वर – वंदना ' ह्या आपल्या स्वतःच्या सुंदरशा बंगल्यांत भोळे कुटुंब सुखानें रहात आहे. किशोर, सुहास, अनिल आणि वंदना अशीं त्यांना चार अपत्यें आहेत. त्यांपैकीं किशोर लिव्हरपूल येथील एका फोटोग्रुव्ह प्रेसमध्यें उच्च दर्जाचें काम करीत आहे; तर अनिल उच्च शिक्षण घेत आहे. सुहास हा एम्. एस्सी. झालेला असून व्यापारांत आहे. वंदना फर्ग्युसन कॉलेजांत शिकत आहे. केशवरावांचें कौटुंबिक जीवन सर्व दृष्टींनीं समृद्ध आहे, तें त्यांनीं केलें आहे. त्यांनीं साहित्य आणि संगीत ह्या क्षेत्रांत अपार तपश्चर्या केली. कौटुंबिक बाबतींतहि ते तितकेच नियोजन-पूर्वक आणि काटेकोरपणानें उद्योग करणारे आहेत. त्यांनीं कथा – कादंबरींतच शक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्ष करून दाखविली आहे. त्यांचा ग्रंथसंग्रह शोभेसाठीं नसून, आपल्या वाचनाचा आणि मननाचा त्यांनीं जीवनांत प्रत्यक्ष उपयोग केला आहे.

केशवरावांनीं कौटुंबिक जीवन स्वतःच्या आणि ज्योत्स्नाबाईंच्याहि व्यावसायिक जीवनापासून अलिप्त राखलें आहे. संगीतामध्यें त्यांनीं " हार्मनी "चा पुरस्कार करून तें लोकप्रिय करून दाखविलें. स्वतःच्या संसारांतहि त्यांनीं अशीच " हार्मनी " निर्माण केली आहे. नाटक, सिनेमा, रेडिओ, ह्यांचेच संगीतदिग्दर्शक ते राहिले नाहींत; घरांतहि सुसंवाद प्रस्थापित करून फार मोठा आदर्श निर्माण केला आहे. साहित्यामुळें प्राप्त होणाऱ्या उच्च विचारसरणीनें आणि संगीताच्या सहाय्यानें जीवन कसें समृद्ध करतां येतें, ह्याचें केशवराव हें उत्कृष्ट उदाहरण आहे. केशवराव म्हणजेच मूर्तिमंत " हार्मनी " !

# ८

# इंदिराबाई देवधर

" सुप्रसिद्ध क्रिकेटपटु, प्रा. दि. ब. देवधर हे अध्यक्षस्थान स्वीकारणार असून, सौ. इंदिराबाई देवधर ह्यांच्या हस्तें बक्षीस-समारंभ होणार आहे " अशा अर्थाचीं निमंत्रणें किंवा स्थानिक कार्यक्रमांत; नोंदी क्वचितच आढळतील. प्रा. देवधरांच्याप्रमाणें सौ. इंदिराबाई देवधर ह्यांनींहि स्वतः कितीतरी महत्त्वाचीं अध्यक्षस्थानें भूषवून विद्वत्ताप्रचुर आणि माहितीपूर्ण भाषणें केलेलीं आहेत. त्यांना स्वतःच्या अधिकारांतच अशा प्रसंगीं निमंत्रणें येतात. अखिल भारतांतील क्रिकेट-क्षेत्रांत प्रा. देवधरांचें जसें स्वतंत्र स्थान, तसेंच स्थान सौ. इंदिराबाईंनीं महाराष्ट्रांतील समाजसेविकांत मिळविलेलें आहे.

अशी वस्तुस्थिति असली तरी सुद्धां, आपल्या उत्कृष्ट क्रिकेटपटुत्वामुळें अखिल भारतांत नामवंत होऊन राहिलेल्या प्रा. दि. ब. देवधर यांच्या पत्नी म्हणूनच ओळखलें जाणें, हें त्यांना स्वतःला अभिमानाचें वाटतें. पुण्याच्या नुतन मराठी विद्यालयाच्या झालेल्या एका वार्षिक संमेलनप्रसंगीं, आपल्या अध्यक्षीय भाषणांत त्या म्हणाल्या, " कुठेंहि मी, मी म्हणून ओळखली जाण्यापेक्षां, देवधरांची पत्नी म्हणून ओळखली गेलें, तर मला त्यामध्यें आनंद व भूषणच वाटतें. " खरोखर यांतच त्यांच्या आयुष्याच्या ध्येयाचें

सार सांपडतें.

"समाजसेवा करणं हेच स्त्रियांचं उच्चतम ध्येय असावं, असं तुम्हांला वाटतं कां?" असं सहज एकदां मी त्यांना विचारलें असतां, त्या म्हणाल्या—

"मला स्वतःला सर्वसाधारण स्त्रियांचं ध्येय आदर्श माता होणें हेंच असावं असं वाटतं. पत्नीची व मातेचीं कर्तव्यें आपल्या हातून पूर्णत्वानें व यथाशक्ति पार पाडीत असतां उरलेला वेळ समाजसेवेच्या कारणीं अवश्य लावावा, व तसा तो मीं लावतेंहि. स्वतःच्या घरचीं कामें आपण नीट केलीं नाहींत, तर दुसरं कोण करणार? तीं कर्तव्यें तशींच राहतील. पण सामाजिक कार्य हें एका व्यक्तिचं कार्य नाहीं; तें करावयाला इतर माणसें सांपडतील."

या त्यांच्या उक्तींतच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. सार्वजनिक कार्य फक्त 'श्रीमंत पतीच्या राणी'लाच करणें शक्य आहे, अशी पुष्कळ मध्यम-वर्गीय स्त्रियांची समजूत झालेली आहे. परंतु इंदिराबाईसारख्या सामान्य परिस्थितींतील स्त्रीला, घरचे दोन्ही वेळचे स्वैपाक-पाणी, मुलांचे व स्वतःचे कपडे शिवणें, घरांतील गाई-म्हशीचे करणें, घरांभोंवतालच्या बागेस सबडीनें पाणी घालणें व इतर गृहकृत्यें करणें, ह्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडून सार्व-जनिक काम करतां येतें, तसें तें इतरांनाहि शक्य आहे, असें इंदिराबाईच्या जीवनाकडे पहाणारांच्या लक्षांत येईल. त्यांचा टापटिपीचा संसार पाहिला म्हणजे, आचार, विचार व उच्चार यांचा सुंदर मिलाफ तेथें दिसतो. मीं आज गली कित्येक वर्षे त्यांचा प्रपंच पहात आहे. कधीं मुलांवर रागावणें नाहीं, घरांत कधीं गबाळेपणा दिसावयाचा नाहीं, घरांत नेहमीं शांत व खेळीमेळीचे वातावरण. सार्वजनिक कार्य करतांना, प्रपंचाकडे दुर्लक्ष होणें कधीं कधीं अपरिहार्य असतें. पण 'आधी प्रपंच नेटका' करूनच इंदिराबाई सार्वजनिक कामांत भाग घेत आलेल्या आहेत. घरीं मुलें आजारी टाकून, बाहेर त्या 'बालकाची काळजी कशी घ्यावी?' अशा विषयावर व्याख्यानें देण्यास गेलेल्या कोणी पाहिलेल्या नाहींत.

१९२० सालीं लोकमान्य टिळक मृत्यु पावल्यावर त्यांच्या दुःखप्रदर्शनार्थ स्त्रियांची एक जाहीर सभा पुण्यांत भरली होती. त्या सभेंत इंदिराबाईनीं पहिल्यानेंच भाषण केलें व "लोकमान्य टिळकासारखी प्रखर बुद्धिमत्ता, अगाध ज्ञान अगर उज्ज्वल राष्ट्रभक्ति आणि सर्वस्व त्यागाची तयारी आपणांत

नाहीं, तर आपण त्यांचे आवडते कार्य ‘स्वदेशी व्रत’, तेवढें तरी करूं या.” असें त्या भाषणांत त्यांनीं सांगितलें.

महात्मा गांधी पुण्यांत १९२० सालीं ता. ६ नोव्हेंबर रोजीं आलें असतांना किर्लोस्कर थिएटरमध्यें स्त्रियांची एक जाहीर सभा होऊन त्या सभेंत स्वदेशीच्या प्रसारार्थ ‘स्त्रियांची सूत कमिटी’ स्थापण्यांत आली. त्याच सभेंत महात्मा गांधींनी देशकार्याकरितां स्त्रियांनी आपलें अलंकार द्यावे असें सांगितलें, तेव्हां इंदिराबाईनीं, आपल्या हातांतील एक सोन्याची बांगडी काढून त्यांना दिली. ह्या सूत कमिटीच्या त्यावेळेपासून १९२७ सालापर्यंत, त्या एक सेक्रेटरी होत्या. त्या काळांत स्वदेशीवर व्याख्यानें देणें, स्वतः सूत काढणें, व सूत काढण्यास शिकविण्याचे वर्ग निरनिराळ्या पेठांतून चालू करून स्वदेशीचा प्रचार करणें, वगैरे कामें त्यांनी केली.

१९२७ सालीं ‘अखिल भारतीय महिला परिषदेचे पहिलें अधिवेशन पुण्यांत झालें. हें अधिवेशन पुण्यांत भरविण्याची तयारी करण्यापासून आजतागायत तीन तपें म्हणजे सुमारें ३६ वर्षें ह्या संस्थेचे काम त्या करीत आल्या आहेत. पुणें शाखेच्या अध्यक्ष, महाराष्ट्र प्रांतिक महिला मंडळाच्या उपाध्यक्ष, सेक्रेटरी व अध्यक्ष, अखिल भारतीय महिला परिषदेच्या स्टॅन्डिंग कमिटीच्या सभासद, अ. भा. म. परिषदेच्या उपाध्यक्ष, अशा जबाबदारीच्या जागांवर त्यांनी काम केलें आहे. अ. भा. म. परिषदेचे १९५३ सालीं पुण्यांत रौप्य-महोत्सवी अधिवेशन झालें. त्यावेळीं पुण्यांतील एका दैनिकानें परिषदेच्या कार्यकर्त्यांचा व परिषदेच्या कार्याचा परिचय करून देणारा विशेष अंक काढला होता. त्यांत सौ. इंदिराबाईंचा परिचय करून देतांना पुढीलप्रमाणें लिहिलें होतें,

“अनेक तरुण, उत्साही कार्यकर्त्या स्त्रियांच्या मागची प्रौढ व गंभीर जबाबदारी पेलणारी व्यक्ति म्हणजे, सौ. इंदिराबाई देवधर ! महोत्सव समितीच्या त्या कार्याध्यक्ष आहेत. महाराष्ट्र शाखेच्या त्या तीन वेळ अध्यक्ष होत्या. पुणें शाखेस बाळसे आणणारी त्यांची कारकीर्द होती. सर्वांच्या सर्व कार्यांचे बारीक निरिक्षण, आणि योग्य वेगानें चाललेल्या चांगल्या कामास पाठिंबा, हे त्यांचे वैशिष्ठ्य असून, आपल्या कामास त्यांची अनुमति मिळवावी, म्हणजे काम झालें, असें इतर सभासदांना सदैव वाटावें अशी त्यांची मंडळाचे कामावर छाप आहे.”

त्यांची कार्यपद्धती व व्यक्तिमत्व यांचें थोडक्यांत दिग्दर्शन ह्या उताऱ्यांत झालेलें आपल्याला दिसून येतें.

अ. भा. म. परिषदेच्या कामासाठीं सर्व महाराष्ट्रांत तर त्या हिंडल्या आहेतच, पण उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतहि पुढील ठिकाणीं त्या परिषदेच्या कामासाठीं गेलेल्या आहेत. कलकत्ता, दिल्ली, कानपूर, अजमीर, इंदूर, नागपूर, भंडारा, अकोला, अमरावती, कराची, सिंध हैद्राबाद, मद्रास, मंगलोर, बंगलोर, दक्षिण हैद्राबाद, इत्यादि. आज महाराष्ट्रांत ह्या परिषदेच्या जिल्हाशाखा व तालुक्यांतील आणि लहान गांवांतील उपशाखा मिळून सुमारें १३० शाखा आहेत. ह्यांतील बहुतेक शाखांना वेळोवेळीं भेटी देऊन, इंदिराबाईंनीं मार्गदर्शन केलें आहे.

१९५७ सालीं त्या युरोपमध्येंहि गेल्या होत्या. त्यांची थोरली मुलगी डॉ. तारा रॉथलेव्ह हिनें त्यांच्या प्रवासाची सर्व व्यवस्था केली होती. तिचेकडे डेन्मार्कमध्यें कोपनहेगनला त्या सुमारें १ महिनाभर राहिल्या होत्या. त्यावेळीं तेथील 'वृद्धाश्रम' वगैरे संस्था पाहून त्या संस्थांच्या कार्याची माहिती त्यांनीं करून घेतली, व परत हिंदुस्थानास येतांना लंडन, पॅरिस, जिनिव्हा, रोम, इत्यादि शहरेंहि पाहिलीं. हिंदुस्थानांत आल्यावर डेन्मार्कमधील लोकशाही व स्त्री-जीवन या विषयांवर पुण्यांत व इतर ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. तीं सर्वांना फार उद्बोधक वाटलीं.

कीर्तन करण्याचा त्यांचा व्यासंग फार जुना आहे. १९२३ सालीं त्यांनीं प्रथम कीर्तन केलें. त्यावेळीं स्वदेशीचा प्रचार करीत असतांना, व्याख्यानापेक्षां कीर्तनास लहानथोर सर्व स्त्रिया येतात असें दिसल्यामुळें, त्यांनीं कीर्तनें करण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांनीं स्वतः कित्येक आख्यानें रचलीं आहेत. डॉ. ॲनी बेझंट यांच्या जन्मशताब्दीच्या वेळीं, त्यांनीं डॉ. ॲनी बेझंट यांच्या चरित्रावर आख्यान तयार करून पुण्याच्या थिऑसफिकल लॉजमध्यें कीर्तन केलें होतें. हें आख्यान त्यावेळीं सह्याद्रि मासिकाच्या डॉ. ॲनी बेझंट विशेष-अंकांत छापलेलें पण आहे.

कविता करण्याचा पण त्यांना नाद आहे. त्यांच्या कांहीं कविता रत्नाकर, सह्याद्रि, वगैरे मासिकांत व अभिनव काव्यमालेच्या पांचव्या भागांत छापल्या गेल्या आहेत. तसेंच स्त्री, किर्लोस्कर, अनुराधा, सह्याद्रि, रत्नाकर, वगैरे

मासिकांत आणि अ. भा. म. परिषदेच्या 'रोशनी' ह्या मुखपत्रांत, त्यांचे अनेक लेखहि छापले गेले आहेत. गेल्या वर्षीपासून पुण्यांतील 'तरुण भारत' या वृत्तपत्रांत त्यांनीं विविध विषयांवर, महिलांच्यासाठीं लेख लिहिले आहेत. सध्या, त्या महाराष्ट्रांतील अनेक कार्यकर्त्या भगिनींच्या सूचनेवरून 'संस्था–संगोपन' ह्या विषयावर एक पुस्तक लिहीत आहे. आज महाराष्ट्रांत एक उत्तम वक्त्या असा त्यांचा लौकिक आहे. हिंदीमध्येंहि त्या चांगलें बोलूं शकतात. १९५९ सालीं पुणें सेवासदन संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाचे वेळीं भारताचे महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू अध्यक्ष म्हणून आले होते. समारंभानंतर पंडित नेहरूंचे आभार मानण्याचे वेळीं इंदिराबाईंनीं हिंदींतून भाषण केलें. तें भाषण अतिशय उत्कृष्ट व समयोचित आणि वक्तृत्व-पूर्ण असें झालें आणि त्याबद्दल उपस्थित मंडळींपैकीं पुष्कळांनीं समक्ष भेटून त्यांना धन्यवाद दिले. एक अविस्मरणीय भाषण, असा त्या भाषणाचा आजहि उल्लेख पुष्कळजण करतात. सेवासदनमध्यें राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन्, श्रीयुत श्रीप्रकाश, पं. कुंझरू हे आले असतांना, त्यांचे आभारहि इंदिराबाईंनीं हिंदींत भाषण करूनच मानले होते.

महाराष्ट्र प्रांतिक महिला परिषद्, पश्चिम महाराष्ट्र महिला परिषद्, विदर्भ महिला परिषद्, द. मध्य प्रदेश महिला परिषद्, तसेंच पुणें, सोलापूर, उत्तर सातारा, दक्षिण सातारा ह्या जिल्ह्यांच्या महिला परिषदा, आणि फलटण संस्थान महिला परिषद्, ह्या सर्व परिषदांचे अध्यक्षस्थानीं त्यांची नियुक्ति करण्यांत आली होती.

इंदिराबाईंनीं वेगवेगळ्या 'समाजसेवा संस्थां'त संस्थापक, अध्यक्ष, चिटणीस, कार्यकारी मंडळाच्या सदस्य, इत्यादि नात्यांनीं कामें केलीं आहेत; त्यांची माहिती थोडक्यांत सांगणें केवळ अशक्य आहे. परंतु, पुण्यांतील सामाजिक कार्यांच्या संस्थांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं स्थापन झालेल्या समाजसेवा संघटन मंडळाच्या त्या अध्यक्ष आहेत, ह्या एकाच गोष्टीवरून त्यांच्या कार्याबद्दल लोकांना वाटत असलेला आदर स्पष्ट होईल. ह्या समाजसेवा संघटन मंडळाच्या पटावर सुमारें १०० संस्था आहेत; त्या केंद्रीय संस्थेचें नेतृत्व इंदिराबाई ह्यांच्याकडे आहे. ऑल इंडिया वुइमेन्स् कॉन्फरन्सच्या स्टँडिंग कमिटीचें सभासदत्व आणि उपाध्यक्षपद, प्रांतिक

शाखेचें अध्यक्षपद, महाराष्ट्र महिला मंडळाच्या पुणें शाखेचें दहा वर्षे नेतृत्व, पुणें सेवासदन सोसायटीचें उपाध्यक्ष व कार्याध्यक्षपद, महिला सेवामंडळाच्या सेक्रेटरीचें व सध्यां अध्यक्षाचें काम व पूना वुइमेन्स कौन्सिलचें अध्यक्षपद, पी. वाय्. सी. स्त्रीशाखेचें प्रथमपासूनचें अध्यक्षपद, भोर विधिमंडळाचें सभासदत्व, सहकारी ऑनररी ऑर्गनायझरचें काम, इत्यादि त्यांच्या भूमिकाहि महत्वाच्या आहेत.

पतीचा पैसा, अधिकार किंवा स्थान ह्यांमुळें कित्येक स्त्रियांना समाजसेवेचें पुण्य फुकट लाभत असतें. तशी इंदिराबाईची परिस्थिति मुळींच नाहीं. पायानें किंवा बसनें जाणाऱ्या-येणाऱ्या, साध्या इंग्रजी शाळेंतहि शिकण्याची संधि न मिळालेल्या, एका शिक्षकाच्या ह्या पत्नीला समाजसेविकांत एवढें मोठें स्थान दीर्घकाळ कसें मिळालें आहे, ह्याची पाहणी केली तर त्याचें रहस्य इंदिराबाईच्या प्रत्यक्ष कार्यांत आणि कार्यपद्धतींतच आढळेल. दिवसांतील एकहि क्षण त्या वाया घालवीत नाहींत असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. हातीं घेतलेलें काम मन लावून त्या पार पाडतात, प्रसिद्धीपेक्षां प्रत्यक्ष कामाला महत्त्व देतात आणि सातत्य हा तर त्यांचा विशेष गुण आहे. आठवड्यांतून एक दिवशीं मुलांच्या व मुलींच्या रिमांड होममध्यें जाऊन त्यांना गोष्टीं वगैरे सांगण्याचा त्यांचा क्रम आठ वर्षे नियमित चालू होता.

त्यांना गप्पा मारीत बसलेल्या कोणीहि, कधींच पाहिलेलें नसेल. निंदा, टीका, मत्सर हीं तर त्यांना स्वप्नांतहि माहीत नाहींत. त्या कारणानें त्यांचें सर्वांशीं पटूं शकतें व सर्वांवर त्यांच्या चारित्र्याची व शालीनतेची छाप पडते. कित्येक कार्यकर्त्यांत साधारणतः कार्यक्षमतेचा अभाव आढळतो व त्यामुळें संस्था वाढीस लागत नाहींत. इंदिराबाईच्या ठिकाणीं कार्यक्षमता प्रकर्षानें दिसून येते. ह्या सर्व गुणांमुळेंच श्रीमंत, पदवीधर, अधिकारी, फॅशनेबल अशा समाजांतहि त्यांना मानाचें स्थान मिळणें क्रमप्राप्त झालें आहे. त्यासाठीं त्यांना पांचवारी पातळाचाहि अवलंब करावा लागलेला नाहीं !

त्यांचा विवाह त्यांच्या १३ व्या वर्षी झाला. त्या वेळीं त्यांना इंग्रजीची अक्षरओळखहि नव्हती. प्रा. देवधरांनीं त्यांना थोडेंफार इंग्रजी शिकविलें व त्यांत त्यांनीं वाचनानें व श्रवणानें भर घातली. आतां त्या इंग्रजी वृत्तपत्रें व पुस्तकें वाचूं शकतात. रघुवंश, मेघदूत, इत्यादींच्या द्वारा त्यांना संस्कृत भाषेची

गोडी लागली, त्याचें श्रेयहि त्या प्रा. देवधरांनाच देतात. सुसंस्कृतपणा प्राप्त होण्यास संस्कृत साहित्याचें वाचन अत्यंत उपयोगी पडतें, असा त्यांचा विश्वास आहे. ज्या वेळीं हिंदीचा प्रसार फारसा झालेला नव्हता, अशा वेळीं पंचवीस वर्षांपूर्वीच, त्या विशारद परीक्षा उत्तीर्ण झाल्या. आतां त्या हिंदींतून सराइताप्रमाणें लिहितात व बोलतात. त्यांचीं भाषणें ऐकणारांवर त्यांच्या बहुश्रुतपणाची छाप पडल्याविना राहत नाहीं.

पतीनें त्यांना जशी संधि दिली, प्रोत्साहन दिलें, त्याचप्रमाणें त्याहि प्रा. देवधरांच्या बॅटिंगला घरच्या सुखासमाधानानें 'स्टॅंड' देतात; त्यांच्या पराक्रमाचीं कात्रणें काढून लावून ठेवतात व त्यांच्या खेळांत आस्थेवाईकपणें आणि माहीतगारीनें लक्ष घालतात. त्यांच्या मुलींनीं—"देवधर सिस्टर्सनीं"—बॅडमिंटनच्या क्षेत्रांत केलेले अपूर्व विक्रम कोणाला माहीत नाहींत ? पण ह्या सर्वांपैकीं कोणालाहि कशाहिबद्दल प्रौढी वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर कोणीहि त्याबद्दल आपण होऊन कधीं बोलतहि नाहीं.

वयाच्या ६१ व्याहि वर्षी इंदिराबाईंना वाटणारा उत्साह वाखाणण्याजोगा आहे. किर्लोस्करवाडी येथें "स्त्री" मासिकाच्या रौप्यमहोत्सवाच्या प्रसंगीं फुगडीच्या खेळांत त्यांनीं तरुण मुलींनाहि दमविल्याची आठवण कित्येकींना अजून ताजी असेल ! घरचीं सर्व कामें टापटिपीनें करून, सुगृहिणी म्हणून लौकिक मिळवून, त्या दररोज दोन-तीन तास तरी वाचनासाठीं मुद्दाम काढतात. त्या दुपारीं कधींच झोंपत नाहींत, त्यामुळें वाचनास वेळ मिळूं शकतो; आणि रात्रीं ११ ते १२ त्या नियमित वाचन करतात. ह्या सर्व तपश्चर्येमुळें त्या उच्चपदीं जाऊन, डौलानें राहूं शकल्या आहेत. रमाबाई रानडे व ॲनी बेझंट ह्यांच्या जीवनाचा त्यांच्यावर पुष्कळच परिणाम झालेला आहे.

रोहिणी भाटे





भालबा केळकर

कॅप्टन शिवा दामले



# १

# भालबा केळकर

श्री. भालबा केळकर हे नाट्यदिग्दर्शक ह्या नात्यानें हौशी नाट्यक्षेत्रांत सुप्रसिद्ध आहेत. त्यांनीं आजवर १५० पेक्षांहि जास्त नाट्यप्रयोग बसविलेले आहेत. त्यांनीं जुन्या नाटकांपासून आरंभ केला आणि आतां ते मुख्यतः नवीं नाटकेंच दिग्दर्शित करतात. त्यांपैकी जगन्नाथाचा रथ, वेड्याचें घर उन्हांत, प्रेमा तुझा रंग कसा, देवांचें मनोराज्य, जाणार कुठें ?, पहांटेची चाहूल, पवनाकाठचा धोंडी, वनगरवाडी, इत्यादि नाटकें सर्वांच्या ताज्या आठवणींतील आहेत. त्यांपैकीं पहिल्या तीनहि नाटकांचे आत्तांच २५ पेक्षां अधिक प्रयोग झाले आहेत. एकाच हौशी नाट्य मंडळाचे एखाद्या नाटकाचेहि इतके प्रयोग झालेले इतरत्र क्वचितच आढळतील. ह्या तीनहि नाटकांना दिग्दर्शनाची राज्य नाट्य स्पर्धेत बक्षिसें मिळालेली आहेत, आणि प्रेमा तुझा रंग कसा मधील प्रा. बल्लाळच्या भूमिकेबद्दल भालबांना अभिनयाचें बक्षीस मिळालेलें आहे.

बरेच विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांना त्यांच्याकडून नाट्यशिक्षण मिळून ती मंडळी तयार झाली. त्यांना एकत्र आणून एक हौशी नट–नटींची नाट्यसंस्था स्थापन करावी, असें भालबांच्या मनानें घेतलें आणि आपल्या विद्यार्थी सह-काऱ्यांच्या साहाय्यानें ‘ प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅट्रिक ॲसोसिएशन ’ ही संस्था अस्तित्वांत

आणली. ह्या संस्थेतर्फे झालेल्या प्रयोगांना व त्यांच्या दिग्दर्शनाला प्रारंभीं सांगितलेलीं मुंबई राज्य-नाट्यस्पर्धेतील बक्षिसें मिळालीं. ह्या ॲसोसिएशनचे अध्यक्ष व दिग्दर्शक भालबा हेच आहेत. ह्या ॲसोसिएशनच्या नाट्यप्रयोगांत सुविद्य, पदवीधर स्त्री–पुरुष केवळ हौस म्हणून निष्ठेनें व मोकळेपणानें कामें करतात. ह्या संस्थेनें आतांपर्यंत शेंकडों नाट्यप्रयोग केले असून हजारो रुपये निरनिराळ्या लोकोपयोगी संस्थांना मिळवून दिले आहेत. संस्थेचें कार्य प्रगतिपथावर असून, दरवर्षी संस्थेच्या स्थापनादिनीं नवें नाटक रंगभूमीवर आणण्याचा भालबांचा क्रम असतो.

भालबा हे हौशी दिग्दर्शक म्हणून विशेष लोकप्रिय व प्रसिद्ध असले, तरी ते नट म्हणूनहि कांहीं कमी प्रसिद्ध नाहींत. शाळेंत असतांनाच त्यांनीं ५–७ लहानमोठीं, विनोदी व गंभीर कामें केलीं. कॉलेजमध्यें गेल्यावर त्यांनीं स्त्री–भूमिका करण्यास प्रारंभ केला. कॉलेज व हौशी क्लब ह्यांतून त्यांनीं १९४४ पर्यंत सुमारें १०० स्त्री–भूमिका पार पाडल्या. ‘ भावबंधन ’ मधील लतिका, मालती, इंदू–बिंदू ; ‘ खडाष्टक ’ मध्यें रागिणी, गौरी, गर्गशा; ‘ उद्यांचा संसार ’ मध्यें करुणा; ‘ लग्नाची बेडी ’ मध्यें यामिनी, रश्मि, इत्यादि भूमिकांचा त्यांत उल्लेख करतां येईल. १९४४–४५ पासून त्यांनीं पुरुष–भूमिका करण्यास व दिग्दर्शनाच्या कामासहि प्रारंभ केला. पुरुष–भूमिकेंत ‘ उद्यांचा संसार ’ मध्यें विश्राम; ‘ साष्टांग नमस्कार ’ मध्यें मल्लिनाथ; ‘ आत्मयज्ञ ’ मध्यें सतीश; ‘ लग्नाच्या बेडी ’ मध्यें गोकर्ण व अवधूत, ‘ खडाष्टक ’ मध्यें वक्रतुंड, ‘ आठवणींचे खंदक ’ मध्यें म्हातारा उदाजीराव; ‘ दूरचे दिवे ’ मध्यें विश्राम व सदानंद; ‘ आंधळ्यांच्या शाळे ’ मध्यें विश्वनाथ, सोमा, ‘ भ्रमाचा भोपळा ’-मध्यें जाफराबादचे जहागिरदार, ‘ जगन्नाथच्या रथा ’ मध्यें राणबा, ‘ वेड्यांचें घर उन्हांत ’ मध्यें दामू ; ‘ देवांचें मनोराज्य ’मध्यें विष्णु; ‘ प्रेमा तुझा रंग कसा ’मध्यें बल्लाळ इत्यादि वरून त्यांच्या भूमिकांच्या विविधतेची कल्पना येईल.

अशा रीतीनें विविध प्रकृतींच्या स्त्री–पुरुष भूमिका यशस्वी रीतीनें करीत असतांनाच दिग्दर्शकाच्या कामास आवश्यक असें सर्वांगीणत्व त्यांना प्राप्त झालें व त्यालाच दिग्दर्शनास आवश्यक अशी आत्मविश्वासाची जोड मिळाल्यामुळें ते फारच थोड्या अवधींत यशस्वी होऊं लागले. नाट्यकला शास्त्रीय अभ्यासानें वाढविली व जोपासली पाहिजे, ह्या नव्या दृष्टीनें त्यांनीं नाट्यकलेचा

शास्त्रोक्त अभ्यास विशेष सुरू केला व चालू ठेवला. आज कोणत्याहि हौशी नाट्यसंचालाला नाटक बसविणें असेल तर त्यासाठीं भालबांचें दिग्दर्शन मिळविणें अगत्याचें वाटतें. भालबा दिग्दर्शक असले कीं हौशी नट–नटींना मोटाच आधार वाटतो आणि त्यांच्यांतील नाट्यगुण भालबा नेमके वेंचून काढून त्याला उजळा देतात; त्या कारणानें, नाट्यप्रयोग कल्पनेपेक्षांहि यशस्वी होतो. प्रेक्षक नट–नटीला अभिनय कौशल्याचें श्रेय देतात; परंतु त्याचा मोठा वांटा दिग्दर्शक भालबांचा असतो हें फक्त नट–नटींनाच माहीत असतें.

हौशी नट व दिग्दर्शक ह्या नात्यानें नाट्यक्षेत्रांत अग्रस्थानीं असलेल्या भालबांच्या हातून फार मोठ्या प्रमाणावर समाजकार्य झालें आहे; होत आहे. भालबांनीं नाट्यकला सभ्य केली. कारण, भालबांच्या नेतृत्वानें आज कितीतरी सुविद्य, सुसंस्कृत मध्यमवर्गीय स्त्री–पुरुष मोठ्या हौसेनें नाट्यकलेपासून मिळणारा आनंद स्वतः उपभोगीत आहेत व इतरांना मिळवून देत आहेत.

भालबांच्या ह्या सर्व कार्याला त्यांच्या मातुश्री श्री. रमाबाई केळकर ह्यांनीं प्रथमपासूनच उत्तेजन दिलें, ह्या गोष्टीचा भालबा मोठ्या कृतज्ञतेनें उल्लेख करतात. भालबांच्या पत्नी सौ. वसुंधरा ह्यांनींहि पतीच्या छंदाबद्दल कधींच नाखुषी दाखविली नाहीं; उलट त्याला त्यांनीं मनोभावें मदतच केली, ही गोष्टहि भालबांना साहाय्यकारक झाली. घरांतील इतर मंडळींनींहि भालबांना अडथळा आणला नाहीं. स्वतःच्या पायावर उभे राहून अभ्यास केलेल्या, नोकरी करून शिक्षण पुरें केलेल्या, मोठ्या एकत्र कुटुंबांत वाढलेल्या व अजूनहि राहणाऱ्या भालबांच्या यशाचें एक कारण सुखी गृहजीवन हें आहे, असें म्हणणें योग्य ठरेल. त्यांच्या घरांतील शैक्षणिक, सांस्कृतिक व माणुसकीचें वातावरण विशेष हृदयंगम व गुणांच्या आविष्काराला पोषक असें वाटतें.

भालबांच्या दिग्दर्शनाखालीं काम केलेल्यांना भालबांच्या चारित्र्याबद्दल आणि उत्साहाबद्दल नितान्त आदर वाटणें स्वाभाविक आहे. तालमीच्या वेळीं सुबुद्ध कलावंतांशीं ते चर्चा करतात व त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेला जरूर तो वाव ते देतात; त्यामुळें तोच तो साचेबाजपणा रहात नाहीं आणि कामें करणारांना कलानिर्मितीचा कांहीं विशेष अनुभव चाखावयास मिळतो. भालबांच्या दिग्दर्शनाखालीं पांच-सात वर्षें ज्यांनीं काम केलें आहे, अशा एक सुप्रसिद्ध सुविद्य विदुषी म्हणतात, " मी नाटकाच्या तालमीला जात असें तेव्हां तेथील वाता-

वरण इतकें प्रसन्न, खेळीमेळीचें आणि घरगुती असें कीं तालमीची वेळ झाली कीं, घरीं मला चैनच पडत नसे. माझ्या न कळत माझे पाय त्या दिशेकडे वळायचे. भालबांच्या ठिकाणीं असणारी दांडगी हौस आणि उत्साह पाहिला म्हणजे आमच्यासारख्या वयस्क स्त्रियांच्या अंगांत सुद्धां चैतन्याचें वारें खेळूं लागतें. एकजुटीनें काम करण्याची शिकवण आम्हांला त्यांनींच दिली. एक एक गोष्ट ते आम्हांला दहा दहा वेळां सांगत असतात. त्यांच्या सहनशीलतेला इतका आम्ही ताण देतो, तरी ते चिडत नाहींत याचं मला भारी कौतुक व आश्चर्य वाटतं. प्रत्येक गोष्ट आत्मीयतेनें, तन्मयतेनें, कळकळीनें आणि आस्थेनें ते आम्हांला शिकवीत असतात. या कलेबद्दलच्या जिव्हाळ्यामुळेंच शेवटीं तयार होणारें नाट्यचित्र हें मनोहर होतें. "

भालबा केळकरांचें नट व दिग्दर्शक म्हणून यश त्यांच्याबद्दल आदर वाटण्यास, स्फूर्ति घेण्यास, पुरेसें आहे; परंतु, ते जितके यशस्वी नाट्यशास्त्रज्ञ आहेत, तितकेच ते नामवंत रसायनशास्त्रज्ञ व प्राध्यापकहि आहेत. पुणें येथील नौरोसजी वाडिया कॉलेजमध्यें ते रसायनशास्त्राचे अध्यापन करतात. त्यापूर्वी ते फर्ग्युसन कॉलेजांत होते. एम्. एस्सी. च्या शिक्षणासाठीं त्यांना संशोधन-शिष्यवृत्ति मिळालेली होती. पीएच्. डी. साठीं त्यांनीं चालू केलेल्या संशोधनांतून निर्माण झालेले निबंध 'सायन्स कॉंग्रेस'तर्फे छापून प्रसिद्ध झाले आहेत. प्री-डिग्री ते बी. एस्सी. पर्यंतच्या रसायन विषयाच्या अभ्यासाला उपयुक्त अशीं सात पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत. विद्यार्थ्यांमध्यें ते प्राध्यापक ह्या नात्यानें अत्यंत प्रिय असून त्यांच्याबद्दल विद्यार्थ्यांना अतिशय आदर वाटतो. अनेक मासिकांतून शास्त्रीय विषयावर ते लेख लिहितात व व्याख्यानें देतात. रेडिओवरहि त्यांचीं शास्त्रीय विषयावर भाषणें होतात. "सृष्टिज्ञान" ह्या सुप्रसिद्ध शास्त्रीय मासिकाचे ते एक कर्ते संपादक आहेत. थोडक्यांत म्हणजे, त्यांच्या स्वतःच्या व्यवसायांतील त्यांचा दर्जा मोठा आहे आणि त्याच्याशीं ते पूर्ण निष्ठा बाळगून आहेत. कित्येक लोक आपल्या स्वतःच्या व्यवसायांत जरूर तेवढ्याच पाट्या टाकून इतर क्षेत्रांत पुढें येतात; प्रसिद्धि पावतात. परंतु, मूळ व्यवसायाशीं त्यांचा संबंध नाममात्रच असतो. प्राध्यापक भालचंद्र वामन केळकर ह्यांचें तसें नाहीं, हें आग्रहानें येथें मला सांगावयाचें आहे. प्राध्यापकाचें काम शंभर टक्के उत्कृष्ट करूनच, ते स्वतःच्या छंदाकडे लक्ष देतात. म्हणून,

त्यांच्या यशाचें विशेष कौतुक करावेंसें वाटतें. रसायनशास्त्र आणि नाट्य ह्या दोन विषयांखेरीज अन्य विषयाकडे ते वळतहि नाहींत.

भालबा हे जसे यशस्वी प्राध्यापक आणि नाट्यदिग्दर्शक आहेत, तसेच कौटुंबिक जीवनांतहि ते यशस्वी आहेत. थोरला व धाकटा भाऊ, त्यांच्या पत्नी व मुलें, स्वतःची पत्नी व मुलें आणि स्वतःची बहीण व भाचा-भाची अशा १७ जणांचें हें कुटुंब आहे आणि त्याचा बराच मोठा भार भालबांचेवर आहे. त्यामुळें उत्पन्नांत भर टाकण्यासाठीं त्यांना शिकवण्यांचा अवलंब करावा लागतो आणि हा जोड व्यवसाय ते नाट्य दिग्दर्शनाइतक्याच तन्मयतेनें आणि आपुलकीनें करतात. लहानपण हालअपेष्टांत गेलेलें असल्याकारणानें आणि परिश्रम अंगवळणी पडले असल्यामुळें चार-पांच तासांच्या झोपेवर त्यांचें भागतें; बाकी सर्व वेळ ते उद्योगांतच मग्न असतात. आपली पत्नी वसुंधरा आणि तिची मुली सुरेखा, उज्वला आणि वर्षा ह्यांच्या वांट्याला भालबा फारसे येऊं शकत नसले तरी त्यांचेसाठीं ते मुद्दाम वेळ काढतात आणि त्यांच्या विकासाकडे बारकाईनें लक्ष देतात. वसुंधराबाईंना ते आपले प्रत्येक लिखाण मोठ्या आस्थेनें वाचून दाखवितात आणि त्याहि भालबांच्या उत्कर्षाला सम-जूतदारपणें हातभार लावतात. घरांतील सर्व कामें संभाळून त्यांची एम्. ए.ची तयारी चालूं आहे. दैनंदिन घरखर्चाची आणि आगामी जबाबदाऱ्यांची योग्य ती तरतूद केल्याखेरीज पुरुषाला इतर कार्यासाठीं वाहून घेण्याचा अधि-कारच नाहीं असें भालबांना वाटतें; सहाजिकच त्यांच्या जीवनक्रमांत द्रव्यार्जनाला गौण स्थान नाहीं. मात्र, कोणी किती पैसे द्यावे, ह्याबद्दल त्यांची कधींच बोली नसते; कुणी कमी पैसे देतो म्हणून शिकवण्यांत ते कुचकारपणा करीत नाहींत.

शिकवण्या करून, नोकरी करून, कुटुंबीयांच्या संसारास हातभार लावून, स्वतः चांगल्या रीतीनें पदवी मिळवून यशस्वी झालेल्या ह्या गृहस्थाची हौस फार मोठी, दांडगी आहे. प्राध्यापकाचें काम करून, नाटकांत भाग घेऊन, दिग्दर्शनाचीं कामें करून, त्यांची हौस शमली नाहीं. एम्. एस्सी. झाल्या-नंतर केवळ आवडीखातर भालबांनीं इंटर आर्टस्‌कडे वळून इंग्रजी, संस्कृत, मराठी, इत्यादींचा अभ्यास करून बी. ए. ‘ऑनर्स’ ही पदवी मिळविली ! रसायनशास्त्राच्या एम्. एस्सी. ला बी. ए. ‘ऑनर्स’ झाल्यावर मनाचें कांहींसें

समाधान झालें ! हौस, चिकाटी, आयुष्यांतील आनंदाची तृष्णा व ती भागविण्याची निष्ठा यापेक्षां काय वेगळीं असूं शकेल ? सुखी जीवन हें त्याच्या धडपडींत आहे ह्याची खात्री त्याची प्रतीति येईल त्यालाच होईल. भालबांचें आजचें वय फक्त ४२ वर्षांचें आहे; त्यांच्या हातून नाट्यकलेची व समाजाची सेवा आतांच कितीतरी झाली आहे; पण ती कितीतरी अधिक होण्यास वाव आहे. पैशानें दरिद्री परंतु सुसंस्कृत आणि सुविद्य अशा मध्यमवर्गीयांच्या जीवनांत फार मोठा अनुकूल फरक त्यांच्या कार्यामुळें घडून येत आहे. त्यांच्या दिग्दर्शनाचा प्रत्यक्ष फायदा मिळणारे शंभरांनी मोजतां आले, तर त्यांच्यामुळें होणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचा फायदा मिळणारे लाखांनींहि पुढें मोजतां येणार नाहींत व त्याची संख्या पटी-पटींनीं वाढत जाईल. स्त्री-पुरुषांच्या जीवनाची सांस्कृतिक पातळी उच्च राखूनच कलेची सेवा केली पाहिजे, असा भालबांचा कटाक्ष आहे; व तसेंच व त्यांचें स्वतःचें चारित्र्य आहे.

भालबांना स्वतःच्या कार्याबद्दल काय वाटतें, तें त्यांच्याच शब्दांत येथें सांगतों:—

" ( १ ) प्रथम प्रथम बाहेरील लोकांनीं केलेल्या हेटाळणीला न जुमानतां मीं हें कार्य अभ्यासाइतक्याच निष्ठेनें केलें. मी नाट्यकला ही जीवनकला समजतों. ती सर्व कलांचा हृदयंगम संगम आहे. तिच्या अभ्यासानें जीवनांत आनंद निर्माण होतो. दैनंदिन जीवनांत सफाई निर्माण होते. म्हणून रसायनाच्या अभ्यासाइतक्याच आत्मीयतेनें नाट्यकलेचा अभ्यास मीं केला.

( २ ) ही कला, समाजास आतांपर्यंत आलेल्या अनुभवानें, सभ्य समाजांत निषिद्ध ठरली होती. या कलेंत रंगणारा मनुष्य हा वायां गेला अशी समजूत होती. हौशी नटांच्या संस्थांनीं ही समजूत हळूहळू कमी केली आहे. आमच्या संस्थेंत नाट्यगुणाइतकेंच सच्छीलत्व, सभ्यपणा व मर्यादित मोकळेपणा ह्यांना महत्त्व दिलें जातें.

( ३ ) संमिश्र नाट्य प्रसंगांतील स्त्रीवर्गाच्या उपस्थितीमुळें वातावरणास सभ्यतेचें बंधन बसतें; व तें कलावर्धनास पोषक ठरतें; संयमित व उच्च दर्जाच्या अभिनयाची वाढ होते व कलाकृतीला एक प्रकारचा सभ्य व उच्च दर्जा प्राप्त होतो. मर्यादित मोकळेपणामुळें एकमेकांबद्दल वाटणारा अकारण बुजरेपणा व

गैरसमज दूर होतात आणि तालमीचें व प्रयोगाचें वातावरण जास्त आल्हाद-पूर्ण, सहकार्ययुक्त व शुद्ध रहातें. कलाकृति उच्च दर्जाची होते यांत संशय नाहीं.

( ४ ) हौशी नाट्य-संस्थांनीं नवनवीन प्रयोगांनीं रंगभूमीच्या पडत्या काळांत तिला सावरून आतां तर तिला प्रगतीच्या मार्गावर आणलें आहे. हौशी नट-नटी आणि दिग्दर्शक निष्ठेनें व हौशीनें कार्य करीत असल्यानें त्या कार्यास जिव्हाळा, निःस्वार्थबुद्धि, नावीन्याची आवड, बुद्धिवादी दृष्टिकोन व भरपूर श्रम यांची जोड मिळून आतां कार्य भरीव होत चाललें आहे व नाट्यकला प्रगतीच्या मार्गावर आहे. नवनाट्याची जोपासना हौशी नट, नटी व दिग्दर्शक मनापासून करीत आहेत. नवनाट्य हें मानसिक सखोल अभ्यासाचें व भावदर्शनाचें नाट्य आहे व तें निश्चित वरच्या दर्जाचें आहे.

( ५ ) नाट्यकला ही पूर्वी असभ्य समजली गेल्यानें या सांस्कृतिक कले-पासून मध्यमवर्ग दूर होता. पण हौशी नाट्यसंस्थांच्या कार्यामुळें तो या कलेच्या जवळ आला. त्याच्या रुक्ष जीवनांत एक प्रकारचा विरंगुळा मिळाला. आपला पोटाचा व्यवसाय सांभाळून आपणहि कलेचा आनंद उपभोगूं शकतों, सांस्कृ-तिक कार्य करूं शकतों, असा विश्वास त्यांच्यांत निर्माण झाला. त्यामुळें सध्यांच्या धकाधकीच्या जीवनांतहि एक प्रकारचा ओलावा व चैतन्य निर्माण झालेलें आहे.

( ६ ) नाट्यकला ही जीवनकला समजून तिचा शास्त्रोक्त अभ्यास करणें जरूर आहे. केवळ अभिजातपणावर अवलंबून न राहतां त्या कलेंत शास्त्रोक्त अभ्यासानें प्रावीण्य कमावतां येते. त्यामुळें कलाविष्कारांत रेखीवपणा व संपूर्ण समजूत येतें. दैनंदिन जीवनांतहि समाजांत वावरतांना या अभ्यासाची उपयुक्तता पटते.

( ७ ) नाट्यशिक्षणामुळें व्यक्तिमत्व प्राप्त होतें व सुधारतें, त्याचा जीवनांत फारच उपयोग होतो. शिक्षकाला तर त्यामुळें विद्यार्थ्यांवर फारच उत्कृष्ट छाप पाडून आपला विषय पटवून देतां येतो. कौटुंबिक जीवनांतहि व्यक्ति-मत्वाचा किती अनुकूल परिणाम घडून येतो, हें पाहण्याजोगें असतें. व्यक्ति-मत्वाची एखाद्याला नैसर्गिक देणगी असूं शकेल; पण तें कमवितांहि येतें— नाट्यशिक्षणानें.

( ८ ) नाट्यकला ही आतां सभ्य समाजांत हौशी नाट्यसंस्थांच्या रूपानें स्थिर व सर्वमान्य होऊं लागली आहे. सर्व कलांचा संगम असलेली ही कला आतां समाजानें व सुशिक्षितांनीं जोपासून, वाढवून, समाजजीवनांत आनंद निर्माण करून तें सुसह्य करण्यास हातभार लावावा असेंच मला वाटतें. अजून या प्रांतांत प्रगतीची मोठी वाटचाल मला करावयाची आहे. आतांपर्यंत झालें हें फारच थोडें आहे, ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. ”

स्थळप्रत.
अनुक्रम ... ३६९३८ वि: चरित्र
१ग्रंथांक ... ९२९५ नों. दि. २५।५।६५

# रोहिणी भाटे

श्रीमती रोहिणी भाटे ह्यांचें नृत्यकलेंतील नैपुण्य आणि त्या कलेचा त्यांनीं केलेला प्रसार, ह्यामुळें त्यांची कीर्ति सर्वत्र पसरलेली आहे. भारतांतील बहुतेक प्रमुख शहरीं आणि महाराष्ट्रांतील लहान – मोठ्या गांवांतून त्यांच्या नृत्यभारतीचे कार्यक्रम झालेले आहेत. चीनमध्येंहि त्यांनीं यशस्वी दौरा केला आहे. त्यांनीं आपलें आयुष्य नृत्यकलेलाच वाहून घेतलेलें आहे. आपल्या सांस्कृतिक जीवनांत त्यांच्या कार्याचा दर्जा अतिशय उच्च आहे. नृत्यकलेनें मोहित झालेल्या भाटे घराण्यांतल्या ह्या "बेबी"नें प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत झगडत नृत्यकलेचा एक नवा संप्रदाय रूढ केला आहे; हजारों मुलींच्या आयुष्याला शानदार वळण लावलें आहे; स्वतःचें एका आदर्श नृत्यसंस्थेंत रूपांतर केलें आहे.

बेबीताईंचे वडील शिक्षण क्षेत्रांतील आय. सी. एस्. च्या तोडीच्या, इंडियन एज्युकेशन सर्व्हिसमध्यें पाटणा येथें इतिहास व अर्थशास्त्र ह्या विषयांचे प्राध्यापक होते. अडीच वर्षांच्या बेबीताईसकट आपल्या मुला-मुलींना लहानपणापासूनच युरोपांत शिक्षणासाठीं ठेवण्याची त्यांची ईर्ष्या होती, व त्याकरितां सर्वांचे पासपोर्टहि काढून झाले होते. परंतु, त्यांच्या आकस्मिक व व अकाली मृत्यूमुळें एकदम दिवस फिरले; कुटुंबीयांवर काळसंकट कोसळलें

आणि त्या सर्वांना बऱ्याच आपत्तींत दिवस काढावे लागले. कारण, मृत्यूच्या धोक्याची आर्थिक तयारी करण्याचें अजिबात राहून गेलें होतें. युरोपांत शिकावयास निघालेल्या बेबीताईंना पुढें घरच्या परिस्थितीमुळें, प्रत्यक्ष पुण्यांतच फीची माफी टिकविण्यासाठीं स्वतः प्रयत्न करावे लागले. त्यांचा पासपोर्ट फोटो त्यांच्या अल्बममध्यें ह्या दैवगतीचें स्मरण करून देत आहे.

आपल्या पांच मुली व दोन मुलगे, अशा सात जणांसह श्री. लीलाताईंनीं पुण्यास बिऱ्हाड केलें. त्यांपैकीं बेबीताई ह्या सर्वांत लहान. डेक्कन जिमखान्यावरील भावे स्कूलमध्यें त्यांचें शालेय शिक्षण झालें. जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीसाठीं त्यांनीं बरीच तयारी केली; त्यांना मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृतमध्यें ८४ टक्के गुण मिळाले. फर्ग्युसन कॉलेजांतून त्या मराठी व संस्कृत हे विषय घेऊन बी. ए. ( ऑनर्स ) झाल्या. बी. ए. च्या वर्षी त्यांना शिष्यवृत्ति मिळाली होती. नाट्य, अभिनय ह्यांकडे त्यांचा प्रथमपासूनच कल होता, आणि शाळाकॉलेजांत त्यांनीं त्या शाखांत खूपच नांव कमावलें होतें.

मॅट्रिकची परीक्षा आणि कॉलेजची सुरुवात, ह्यांच्या दरम्यानच्या काळांत बेबीताईंची व श्री. रंग विठ्ठल ह्या होतकरू आणि रुबाबदार नृत्यकलोपासकाची गांठ पडली. बेबीताईंच्या मोठ्या भगिनीनेंच पुढाकार घेऊन त्यांचें नांव ह्या मास्तरांच्या क्लासांत नोंदविलें. बेबीताईंचा भाऊ शरद ह्याची व मास्तरांची मैत्री होती; सहाजिकच त्यांचें घरीं येणें-जाणें सुरू झालें. बेबीताईंची नृत्यकलेंत पुरेशी प्रगति होण्यापूर्वीच मास्तरांच्या नृत्य-कार्यक्रमांत त्या ओढल्या गेल्या आणि तीं दोघें पुढें पति-पत्नीहि बनलीं. पण हा संयोग बेबीताईंना दुर्दैवानें हितकारक ठरला नाहीं आणि त्याची बरीच झळ त्यांना सोसावी लागली. एका कार्यक्रमाचें वर्णन बेबीताईंनींच आपल्या " माझी नृत्यसाधना " ह्या पुस्तकांत केलें आहे, तें मोठें अर्थपूर्ण आहे. " आम्हीं दोघांनीं एकमेकांची बाजू इतकी व्यवस्थित संभाळली होती कीं, आमचें नृत्य बेताल आहे, असें जाणत्या कानांना जाणवत असूनहि आम्हां दोघांपैकीं कोण बेताल आहे हें कुणालाहि ठरवतां आलें नाहीं ! "

त्यांचा पुत्र, सनत्कुमार ह्याच्या संगोपनाची जबाबदारी बेबीताईंचेवर पडली व त्यामुळें त्यांना स्वतःचें शिक्षण बंद ठेवावें लागलें. १९४१–४३ मधील ही गोष्ट. तथापि, सनत्कुमार थोडा मोठा होतांच, त्यांनीं आपलें महाविद्यालयीन

शिक्षण पुरें केलें. मुलामध्यें त्याच्या आईच्या बुद्धीची चमक पहिल्यापासून असून, त्याचें सध्यांचें 'डफरिन' वरचें वास्तव्य, याच हुशारीची साक्ष देतें.

"पुण्यासारखें नृत्याच्या रुमझुमीला अजून न सरावलेलें शहर, मध्यम स्थितीचें वेतास बात असें माझें जीवन, अन् होतकरू परंतु नवशिक्या अशा आमच्या मास्तरांचें मार्गदर्शन, या सर्व परिस्थितींत प्रगतीच्या सोपानाच्या जितक्या पायऱ्या चढून जाणें मला शक्य होतें, तेवढ्या मी केव्हांच ओलांडल्या होत्या. बी. ए. ची परीक्षा संपली मात्र; माझ्या नृत्यभावना दुप्पट जोरानें पुनः उफाळून वर आल्या. केवळ माझ्या मेहनतीच्यावर नाइलाजानें अवलंबून रहाणाऱ्या मला, बंगलोरला माझ्या भगिनीकडे जाऊन श्री. सोहनलाल ह्यांच्याकडे दोन-एक महिने कथ्थक नृत्य शिक्षण घेण्याची संधि मिळाली. माझ्या वाटेंत सहजासहजीं आलेल्या या नृत्याच्या पाणपोईमध्यें बऱ्याच वाटचालीला पुरेल, असें पाणी पिऊन आतांपर्यंतचा तहानलेला जीव शांत केला." असें वर्णन बेबीताईंनीं स्वतःच केलें आहे.

विद्यादान आणि विद्याग्रहण ह्या गोष्टी परस्पर-पोषक आहेत, हें बेबीताईच्या मनावर ठसून त्यांनीं ११ जुलै, १९४७ रोजीं आपला क्लास सुरू केला आणि विद्यासंपादनाबरोबर विद्यादानाच्या कार्यास प्रारंभ केला. नृत्याच्या ह्या वर्गाला दुसरें वर्ष लागण्याच्या आधींच दुसरी शाखा स्थापना करण्याचा योग एप्रिल १९४८ मध्यें आला. त्यांनीं मुंबईतील श्री. मन्नालाल हे गुरुजी मिळविले. पुण्याहून दर पंधरवड्यास मुंबईला जाऊन तीन-चार दिवस त्यांच्याकडून शिक्षण घ्यावयाचें, त्यासाठीं कामाठीपुऱ्यांतील त्यांच्या खोलींत जावयाचें, असें कांहीं काळ चालू होतें. १९५२ मध्यें त्या चीनच्या दौऱ्यावर गेल्या. तेथें अडीच महिने राहून तेथें चिनी नृत्याचे धडे त्यांनीं घेतले व हिंदी नृत्याचा प्रसार केला. लखनौ येथील भातखंडे कॉलेजच्या नृत्यशाखेचे प्रमुख श्री. मोहनराव कल्याणपूरकर ह्यांच्या एक वर्षाच्या पुण्यांतील मुक्कामांत त्यांच्या नजरेखालीं लखनौ कथ्थक नृत्य परंपरेच्या शिक्षणास प्रारंभ केला. १९५४ मध्यें त्यांनीं श्री. पार्वतीकुमारांचेकडे भरतनाट्याच्या अभ्यासास सुरुवात केली. १९५६ मध्यें, श्री. पार्वतीकुमारांच्या देखरेखीखालीं दररोज त्या सात-आठ तास नृत्याचा अभ्यास करीत होत्या.

नृत्याच्या शिक्षणासाठीं बेबीताईंनीं किती काळ खर्च केला, परिश्रम घेतले, दगदग सोसली, हें ह्यावरून दिसून येईल. पण त्याला पैसाहि किती लागला असेल, ह्याची कल्पना सहजीं येणार नाहीं. वेगवेगळ्या गुरुजींना प्रत्येक पाठासाठीं द्यावी लागणारी दक्षिणा एकसारखी वाढत गेली, त्या सर्वांची बेरीज केली आणि प्रवासखर्च त्यांत मिळविला, तर ती रक्कम सहस्रावधि रुपये भरेल, हें स्पष्ट आहे. जुन्या पद्धतीच्या गुरुजींचेकडून विद्या मिळवितांना त्यांची तब्येत सांभाळावी लागते, त्यांच्या कलानेंच गोष्टी घ्यावा लागतात. त्यांच्या ह्या परंपरागत वृत्तीबद्दल अधीर होऊन भागत नाहीं. परक्या गांवीं, परक्या वस्तींत जाऊन, बेबीताईंनीं हें सर्व केलें. आपल्या गुरुजनांबद्दल त्यांना नितांत कृतज्ञता असल्यामुळें, ह्या तपश्चर्येचा उल्लेखहि त्या कधीं करीत नाहींत.

ह्या बाबतींत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बेबीताईंनीं नृत्यकलेचें शिक्षण घेतलें, तें पूर्णपणें स्वावलंबनानेंच होय. नृत्याच्या स्वतःच्या क्लासांतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग स्वतःच्या शिक्षणावर त्यांनीं केला; कोणावरहि विसंबून राहिल्या नाहींत. स्वतःच्या घरगुती अडचणीमुळें चांगला कलाकार नृत्यविशारद नृत्य शिक्षणासाठीं ठेवून घेणें शक्य नव्हतें आणि गुरुजी मिळाले तरी गुरु-दक्षिणेसाठीं मूठ उघडावी, तर ती कोरडीच निघावी, अशी परिस्थिति होती. पुण्या-मुंबईत झालेले नृत्याचे बहुतेक सारे कार्यक्रम त्यांनीं नजरेखालीं घातले; परोक्षरीत्या शिक्षण मिळविणें हाच ज्ञानविकासाचा मार्ग त्यांना उपलब्ध होता. अशा रीतीनें नृत्यसाधना चालू असतांना, त्यांनीं आपल्या क्लासचीहि सुधारणा केली. नृत्यशिक्षणास आवश्यक अशीं साधनें वाढविलीं, नृत्यविषयक ग्रंथांचा संग्रह केला, दुर्मिळ ग्रंथ लिहवून घेतले, सहाय्यिकांचा संच तयार केला, आणि आपल्या क्लासला एखाद्या महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त करून दिला. नृत्याच्या शिक्षणदानानें होणारी प्राप्ति नृत्यकलेप्रीत्यर्थंच त्यांनीं खर्च केली. पुण्यांत कांहीं वर्षांपूर्वी त्यांच्या नृत्यभारतीच्या तीन शाखा होत्या. त्या ठिकाणीं जाण्या-येण्यास त्यांनीं वाहन ठेवलेलें नव्हतें—आजहि नाहीं. सायकलीचाच त्या उपयोग करतात. स्वतःच्या सौख्यापेक्षां त्यांना नृत्यकला व शिष्यवर्ग कितीतरी अधिक प्रिय आहे.

सकाळीं आठाच्या आंतच त्या आपल्या नृत्यशाळेंत दाखल होतात व स्वतःचा नृत्याचा अभ्यास करतात आणि नवीन बोल बांधणें, नव्या बंदिशी

करणें, नवीन नृत्यें रचणें, हीं कामें करतात. आपल्या सहाय्यक शिष्यांनाहि शिकवितात. ११–३० वाजतां घरीं आल्यावर कांहीं वेळानें जेवण संपवून वाचीत वाचीत, त्या विश्रांति घेतात. त्यानंतरच्या दोन-तीन तासांत त्या नृत्यविषयक वाङ्मयाचा अभ्यास करतात; तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांची त्यांना अतिशय आवड आहे. नृत्यशाळेंतील मुलींना गीता समजावून सांगणें हा त्यांचा आवडता छंद आहे. वेबीताईंच्या नृत्यसाधनेला आध्यात्मिक बैठक आहे. उदात्त तत्त्वांचा आविष्कार करण्याचें नृत्य हें साधन आहे आणि ह्या साधनाच्या तोडीची आपली मानसिक पातळीहि असायला हवी, अशी त्यांची श्रद्धा आहे. संध्याकाळीं ५ ते ८ पुनः क्लास, रात्रीं ९ वाजतां जेवण, नंतर न चुकतां डायरी लिहिणें, असा त्यांचा कार्यक्रम असतो. नृत्यभारतीच्या पुण्यांतल्या सर्व शाखांचें १९६१ च्या महापुरानंतर कॉफी हाउसवरील नव्या जागेंत एकत्रीकरण झाल्यानें मुंबईची नृत्यभारती आणि नव्यानें प्रस्थापित झालेली कानपुरांतील नृत्यभारती यांच्याकडे वेबीताईंना अधिक लक्ष देतां येऊं लागलें. पण, दैनंदिन कार्यक्रमांत मात्र अनेक नव्या कामांची भर पडली. आतां त्यांचे तीन दिवस मुंबईत मुंबईच्या चालीनें जातात आणि उरलेल्या चार दिवसांत पुणें त्यांना पुनः ताजेतवानें करतें ! नृत्याचा शीण वाचनानें, चिंतनानें व मननानें घालवून नृत्यांतील भाव अधिक प्रभावी करण्याची त्यांची योजना त्यांच्या स्वतःच्या आध्यात्मिक विकासाप्रमाणें नृत्यकलेच्या उद्धारासहि पोषक आहे. नटराज शिवाला त्यांनीं आपलें आराध्यदैवत मानलें आहे; तें त्यांच्या जीवनाकडे व कलोपासनेकडे पाहिलें असतां, सार्थच आहे.

वेबीताईनीं नृत्याचा क्लास सुरू केला, तेव्हां त्यांत फक्त दोनच मुली होत्या. आतां त्यांच्या नृत्यभारतींत सुमारें १०० मुली शिकत आहेत. मुलींची संख्या सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीप्रमाणें कमी–अधिक होते. ५ वर्षापासून २५ वर्षांच्या मुली नृत्यशिक्षणासाठीं फी देऊन येतात; त्यांत सर्व जमातींच्या व व धर्मांच्या मुलींचा समावेश आहे. नृत्यप्रवेश, नृत्यपरिचय, नृत्यसंवेदन, नृत्यआस्वादन आणि नृत्यप्रबोधन अशा त्यांच्या परीक्षांच्या पायऱ्या आहेत, आणि हा शिक्षणक्रम मुंबई राज्य सरकारनें मान्य केलेला आहे. दिल्ली येथें १९५६ व १९५७ मध्यें झालेल्या आंतर–विद्यापीठ युवक महोत्सवांत शास्त्रोक्त कथ्थक नृत्याच्या चढाओढींत वेबीताईंच्या शिष्या कु. मंदा गोडबोले व कु. प्रभा

मराठे ह्यांनीं पहिला अनुक्रम पटकावला. त्यामुळें, नृत्यभारतीच्या शिक्षणाचा दर्जा किती उच्च आहे हें दिसून आलें.

नृत्यभारतीचा सर्व व्याप बेबीताईच आपल्या तिघी-चौघी सहाय्यिकांच्या मदतीनें संभाळतात. दैनंदिन अभ्यास, जमाखर्च, पत्रव्यवहार, इनकम टॅक्सचे हिशेब, प्रवासाची व्यवस्था, इत्यादि कामें त्याच स्वतः पहातात. नृत्यभारतींत नृत्यामध्येंही कुणी पुरुष नसतो आणि व्यवस्थाशाखेंतहि पण कुणी पुरुष नाहीं. तबलजी, साथीदार, एवढेच काय ते पुरुष नृत्यशाळेंत दिसतील. बेबीताई "श्रीमती रोहिणी भाटे" बनून आपल्या मुलींचे समवेत नृत्यांच्या कार्यक्रमा-साठीं जातात, तेव्हा प्रत्येक वेळीं सर्वांना रोख किंवा वस्तूंच्या स्वरूपांत भेटी देतात. आपल्या सहाय्यिकांना त्यांनीं बँकेंत खातीं उघडून दिलीं होतीं. त्यांच्या बचतीमधून त्यांना सेव्हिंग्ज सर्टिफिकिटेंहि घेण्यास शिकविलें होतें. उच्च दर्जाच्या कलाकारामध्यें आस्था, नम्रता, कार्यक्षमता, संघटनाचातुर्य, इत्यादि गुणांचा बहुधा अभावच असतो; बेबीताई त्यास अपवाद आहेत. स्वतःचें हातखंडा नृत्य आपल्या हुशार शिष्यांना. शिकविण्यांत त्या आनंदच मानतात; अंगचोरपणा करीत नाहींत. ह्या बाबतींत, मानवी स्वभावास धरून एखादे वेळीं स्वार्थी विचार डोक्यांत आलाच, तर त्याची कसर शक्य तितक्या लवकर काढून टाकण्याची त्या दक्षता घेतात. ही गोष्ट त्यांनीं लपविलेली नाहीं, ह्यावरून त्यांच्या प्रांजलपणाची कल्पना येईल; शिवाची लय आणि जिवाची लय एकरूप करण्याचा त्यांचा निर्धार स्पष्ट होईल.

बेबीताईच्या सहवासांत येणाऱ्या सर्वांनाच त्यांच्या निर्मळ अंतःकरणाचा अनुभव आल्याविना रहात नाहीं. त्या मुलींना केवळ नृत्यकलाच शिकवीत नाहींत, तर त्यांच्यांत स्वतःच्या उदाहरणानें कितीतरी गुणांचा विकास घडवून आणतात. शरीराच्या तोलप्रमाणें मानसिक तोलाचें शिक्षणहि त्या शिष्यांना कळत, न कळत, देतात. अशा शेंकडों, हजारों शिष्या बेबीताईचा संदेश घरोघर माजघरांतून व स्वैपाकघरांतून पोचवीत आहेत. जीवनाची पातळी उंचावण्याचें नृत्यकला हें एक बहुमोल साधन आहे, हें बेबीताईनीं सिद्ध करून दाखविलें आहे. त्यांच्या सर्व पट्टशिष्या बी. ए. ( ऑनर्स ) झालेल्या आहेत; नृत्याचें शिक्षण त्यांच्या महाविद्यालयीन अभ्यासाच्या आड आलेलें नाहीं. आतां आमच्या मुलींना नृत्याचें शिक्षण घेतांना बिचकण्याचें कारण

नाहीं. लहरी, स्वच्छंदी अशा गुरुंकडे अपरिचित वस्तींत जाण्याची आवश्यकता नाहीं; बेबीताईंनीं तें कार्य हिंमतीनें पार पाडून नृत्यकला शुद्ध स्वरूपांत सन्माननीय पथावर आणून ठेवली आहे. बहुतेक कलावंतांना नृत्याची शास्त्रीय बाजू नीट समजावून सांगतां येत नाहीं. बेबीताईंनीं हुशारीनें त्या बाबतींत प्रावीण्य मिळविलें आहे. त्यामुळें, आपल्या शिष्यांना नृत्याचीं मूलतत्त्वें समजावून सांगूनच त्या नृत्य शिकवितात; सहाजिकच मुलींना लवकर आकलन होऊं शकतें.

नृत्यकलेला प्रतिष्ठा नसण्याच्या काळांत व शहरांत, बेबीताईंना त्यांच्या आईनें प्रेमळ प्रोत्साहन दिलें. अडचणीच्या काळीं आईनें आपल्या हरणूलीला पोटाशीं घेतलें नसतें, तिच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवला नसता, तर बेबीताई आज कुठं असत्या, कुणास ठाऊक! आनुवंशिक सांस्कृतिक ठेव्यांत बेबीताईंनीं स्वतः मोलाची भर घालून हजारों कुटुंबांना त्यांत सहभागी केलें आहे. बेबीताईंनीं लौकिक दृष्ट्या खूपच मोठें यश मिळविलें आहे. तथापि, त्याच्या अप्रत्यक्ष दूरगामी सांस्कृतिक बीजारोपणानें शक्य होणाऱ्या सामाजिक परिवर्तनाची सर त्याला येणार नाहीं. "माझें आरोग्य टिकून राहो; माझें सर्व जीवन नृत्य-कलेच्याच कारणीं लागून सार्थक होवो, कलेच्या जीवनाशीं निगडित करणाऱ्या माणुसकीच्या नगराकडे माझ्या कलेचा मनोरथ मला नेईल, असेंच मार्गदर्शन मला कर," अशी त्यांची नटराजाजवळ प्रार्थना आहे.

आतां कोणीहि अल्पशा मोबदल्यांत आपल्या मुलीला नृत्यकलेचें शिक्षण बिनधोक देऊं शकतो. पण नृत्यकलेला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या बेबी ताईंना स्वतः त्यासाठीं केवढी मोठी किंमत द्यावी लागली आहे, ह्यांची इतरांना काय कल्पना? कलेच्या शोधांत त्यांना किती कांटेरी मार्गांनीं जावें लागलें, विनाधार वाटा तुडवाव्या लागल्या, किती प्रकारें व किती काळ यातना सोसाव्या लागल्या, हें फक्त त्यांनाच माहीत. वैवाहिक जीवनाला रामराम ठोकून, त्यांनीं आपल्या आयुष्याला नवें वळण लावलें, तें किती लहानपणीं! त्याच्या निरामय दर्शनापेक्षांहि त्यांचा आत्मपरिचय अधिक उदात्त आणि भावनीय आहे. 'रोहिणी भाटे' पेक्षां 'बेबीताई' हेंच नांव अधिक दीर्घकाळ आणि आस्था-पूर्वक घेतलें जाईल.

# ११

## ‘ शॅडोलेस ’ जोशी बंधू

आई आपल्या छोट्या बाळाच्या पायांतील कुसळ सुईनें काढते तेव्हां आजूबाजूला घरांतलीं इतर मुलेंहि जमतात आणि अंधार पाडतात. “ जरा बाजूला व्हा; मला नीट दिसत नाहीं ” असें आई त्यांना सांगते. सुईमध्यें दोरा ओवायचा असला म्हणजे आपण खिडकीपाशीं, उजेडांत, जातों. या मानानें शस्त्रक्रिया करणाऱ्या सर्जनचें काम किती नाजूक आणि जोखमीचें असतें ! डोळ्यांना ताण न पडतां त्याला काळजीपूर्वक पाहतां यावें, आपल्या कामावर लक्ष केंद्रित करतां यावें अशा प्रकारचा उजेड त्याला हवा असतो. उजेड भरपूर असावा पण तो शीत असावा; तापदायक नसावा. दिव्याखालीं काम करतांना डोक्याची सावली पडूं नये; नेमका जरूर त्याच ठिकाणीं उजेड पोंचावा अशी त्याची गरज असते.


प्रत्येक लहान-मोठ्या इस्पितळांत शस्त्रक्रियेची व्यवस्थां असते. तेथें अशा प्रकारच्या दिव्यांची योजना करावी लागते. जरूरीप्रमाणें कांहीं दिवे वर टांगलेले असतात आणि ते पुढें-मागें, डावी-उजवीकडे वळवतां येतात. कांहीं दिवे स्टँडवर बसविलेले असतात. विशिष्ट कामासाठीं भिंतींवर ब्रॅकेटला लावलेले दिवे सोईचे पडतात. ह्या विजेच्या दिव्यांचें मुख्य वैशिष्ट्य म्हणजे “ दिव्या-



प्रभाकर जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38636 वि: चरित्र
क्रमांक 22245 नों दि २५।८।८५

शॅडोलेस लॅंपचा उपयोग





विमल सोहोनी

माधवराव वाकडे



खालीं अंधार ” ही म्हण त्यांना लागू पडत नाहीं. ते ‘ शॅडोलेस ’ म्हणजे छायारहित असतात. त्यांची सांवली मुळींच पडत नाहीं, असें नाहीं, तर ती सांवली शक्य तेवढी नाहींशी केलेली असते. त्यामुळें डोक्यावर दिवा लावून त्याच्याखालीं अगदीं अवघड शस्त्रक्रियाहि पार पाडतां येतात.

बनविण्यास अत्यंत कौशल्य लागणारे अशा तऱ्हेचे शॅडोलेस लॅम्प भारतांत तयार केले जातील असें भविष्य पंचवीस वर्षांपूर्वी वर्तवलें असतें तर तें धाडसाचें ठरलें असतें. एकेका दिव्याची किंमत हजारों रुपये असूं शकते; असे हजारो दिवे दरसाल भारतांत आयात होत असत. पुणें येथील तीन ध्येयनिष्ठ तरुणांनीं ह्या दिव्यांची स्वतःच्या कल्पकतेनें योजना करून ती यशस्वी करून दाखविली आहे. ए. जी. जोशी आणि कं. ह्या नांवानें त्यांनीं स्थापन केलेला उपक्रम तज्ज्ञांच्या मान्यतेस उतरला आहे. फिलिप्स इंडिया लि. ही कंपनी पूर्वी स्वतःचे दिवे परदेशांतून आयात करून विकत असे; आतां तिनें ए. जी. जोशी आणि कं. च्या दिव्यांच्या विक्रीची सोल एजन्सी मिळविली आहे आणि पूर्ण विश्वासानें हे दिवे सर्वत्र विकत आहे. ज्यांना फिलिप्स कंपनीच्या चोखंदळपणाची कल्पना आहे त्यांनाच जोशी बंधूंच्या पराक्रमाचें रहस्य पटूं शकेल.

शॅडोलेस लॅंपच्या रचनेंतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऑपरेशन टेबलावर दिव्याच्या प्रकाशाचा झोत पडलाच पाहिजे; शिवाय त्या झोताभोंवतालच्या परिसरांतहि काम करण्यास आवश्यक एवढा प्रकाश पडला पाहिजे. प्रकाशाच्या एका कक्षेतून दुसऱ्या कक्षेंत जातांना सर्जनच्या डोळ्याला त्रास होतां कामा नये अशी प्रकाशाची योजना करायला हवी. शस्त्रक्रियेच्या जागीं प्रकाशाचा झोत अशा रीतीनें पडला पाहिजे कीं पेशंटच्या शरीराच्या खोललेल्या भागांत आंतवर प्रकाशाचे किरण शिरले पाहिजेत. ह्या प्रकाशाची तीव्रता सर्जनच्या डोळ्यांना शीण आणणारी असतां कामा नये. उजेडाबरोबर निर्माण होणारी उष्णता फिल्टरच्या साह्यानें रोखून धरली पाहिजे; नाहींतर उकाड्याचा उपद्रव होईल. उजेड देणारा विजेचा दिवा साधाच असतो; पदार्थविज्ञानाच्या तत्त्वांचा उपयोग करून तो शस्त्रक्रियेसाठीं कार्यप्रवण करण्याची योजना म्हणजेच शॅडो-लेस लॅंप होय. त्याला प्रकाशविषयक उपकरण असेंहि म्हणतां येईल. ह्या उपकरणाच्या बनवटीमध्यें कित्येक युक्त्या–प्रयुक्त्यांचा वापर करावा लागतो

आणि सर्जनच्या कामाला मदत होईल अशी योजना करावी लागते. तयार यंत्रें मागवून त्यांच्या साहाय्यानें कोणीहि निर्माण करूं शकेल, अशी ही बाब नव्हे.

मधुसूदन, यशवंत आणि प्रभाकर ह्या तीन बंधूंच्या आजच्या यशाचा पूर्वेतिहास मोठा उद्बोधक आहे. लहानपणापासून तिघांनाहि हस्तव्यवसायाची आवड होती. हात-मशीननें गाई-म्हशी कराव्या, उडणारीं विमानें बनवावीं, पांढरीच्या काड्यावर तोंडें कोरावीं, असा त्यांना छंद होता. अशा तऱ्हेच्या वस्तू करून त्या विकाव्या आणि त्यांतून शास्त्रीय प्रयोगासाठीं उपकरणें घ्यावीं; सुतारकामाचीं हत्यारें आणावीं असा त्यांचा वेळ जाई. वडील, कै. आबा-साहेब जोशी, ह्यांनीं मुलांच्या या छांदिष्टपणाला उत्तेजनच दिलें. कधींहि नाउमेद केलें नाहीं. मुलांनीं एकदा वडिलांचा भारी किंमतीचा बायनॉक्युलर खोलून पाहिला आणि गडबडींत तो फुटला; तरी सुद्धां वडिलांनीं मुलांना दोष दिला नाहीं. आईनेंहि मुलांच्या ह्या विकासाला वाव दिला. ह्या अनुकूल वातावरणाचा मुलांनीं फायदा करून घेतला. पण अभ्यासाच्या बाबतींत मात्र त्यांपैकीं कोणाचीच मॅट्रिकच्यापुढें प्रगति होऊं शकली नाहीं आणि एका अर्थी हें बरेंच झालें असें आतां आपण म्हणूं शकतों. कारण, त्यांच्यावर ठराविक चाकोरींतील शिक्षण लादलें गेलें असतें, तर ते नोकरींत शिरले असते आणि परिणामतः त्यांचें कसब देशाच्या दृष्टीनें वायां गेलें असतें. त्यांची ध्येयनिष्ठा, गरजेच्या अभावी, इतकी प्रभावी झाली नसती. वडिलांचा धंदा बसत गेला तसें परिस्थितीनें दिलेलें आव्हान मुलांना स्वीकारणें भागच पडलें.

१९३९ सालीं दोघे बंधू, बाळ आणि दादा, हे मुंबई येथें "बॉंबे निऑन साइन्स" मध्यें काम शिकण्यासाठीं उमेदवार म्हणून राहिले. त्यांना कामांत तरबेज होण्याला फारसा वेळ लागला नाहीं. कराची येथें भरलेल्या अखिल भारतीय औद्योगिक परिषदेच्या वेळीं त्यांची इन्स्टॉलेशन इंजिनीअर म्हणून योजना करण्यांत आली. त्यांचे मामे-काका, मुंबईचे सुप्रसिद्ध सर्जन, डॉ. मा. वि. भाजेकर ह्यांच्याकडे ते दोघे राहिले असतांना डॉ. भाजेकरांना इस्पितळा-साठीं एक शॅडोलेस लॅंप घ्यावयाचा होता. हें बाळला कळायचा अवकाश. त्यानें "मी तुम्हांला पाहिजे असलेला दिवा बनवून दाखवतो" असें आत्म-विश्वासानें त्यांना सांगितलें. थोड्याच अवधींत, डोकें लढवून, त्यानें स्टॅंडर्ड आकाराचा दिवा कोणताहि कॅटलॉग न पाहतां तयार करून दिला ! डॉक्टर

साहेबांना तो पसंत पडला; अजूनहि, तेवीस वर्षांनीं, भाजेकर मेमोरिअल हॉस्पिटलमध्यें तो दिवा उत्कृष्ट काम देत आहे !

युद्धकाळांत ठिकठिकाणच्या लष्करी इस्पितळांतून मोठ्या प्रमाणावर शॅडोलेस लॅम्प्सची मागणी असतांनाहि त्या बाबतींत जोशी बंधूंना फारसें कांहीं करतां आलें नाहीं. युद्धानंतर तर ह्या दिव्यांच्या आयातीस मुक्त परवाने असल्यामुळें देशी दिव्यांना वाव कोठून मिळणार ? एखादें साधें यंत्र तत्सम विदेशी यंत्रापेक्षां दहा-पंधरा टक्क्यांनीं कमी कार्यक्षम असलें तरी चालूं शकतें; पण जेथें शंभर टक्के अचूकपणाची आवश्यकता असते तेथें विदेशी मालाशीं टक्कर देणें कठीण जातें; ग्राहक त्या बाबतींत इतके चोखंदळ असतात कीं देशी मालाला संधि देण्यासहि तयार नसतात. परदेशांतून शिकून आलेले सर्जन, पुण्यातील एका बोळामधील जुन्या-पुराण्या वाड्यांतील तीन-चार खोल्यांच्या ' कारखान्यांतील ' कारागिरीची पारख नीटशी करणें कठीणच ! कांहीं प्रथितयश सर्जनांनीं गुणग्राहकता दाखविली, हें मात्र येथें नमूद केलें पाहिजे. उत्कृष्ट दर्जाचे दिवे बनवूं शकणाऱ्या जोशी बंधूंना त्यामुळें निर्वाहासाठीं इतर जिनसांच्या उत्पादनाकडे वळणें क्रमप्राप्त झालें; ऑर्डर येईल त्याप्रमाणें दिवे बनवून देणें मात्र चालूच राहिलें.

१९४२ च्या सुमारास जोशी बंधूंनीं खेळाचीं विमानें तयार करण्याकडे विशेष लक्ष देण्यास आरंभ केला; कारण त्यांना मागणी चांगली होती आणि त्यांच्या उत्पादनाला फारसें भांडवल लागत नव्हतें. आपल्या छोट्या वर्कशॉपमध्यें इतरहि कामें ते करूं लागले. विजेच्या शेगड्याहि ते बनवून विकूं लागले. त्या सर्वांतून मिळणारा पैसा वर्कशॉपच्या वाढींतच खर्च करायचा; संसारावर फारसा खर्च करायचा नाहीं असें त्याचें धोरण होतें. त्यांचा सर्व वेळ वर्कशॉपमध्येंच जाई; वर्कशॉपमध्येंच त्यांचें बिऱ्हाड होतें म्हणणें अधिक योग्य होईल ! कारण, येणाऱ्या पाहुण्याला बसायला जागा देण्यापूर्वी तेथें पडलेल्या नाना तऱ्हेच्या जिनसा उचलून ठेवाव्या लागत असत !

१९५१ ते १९५८ ह्या काळांत जोशी बंधूंनीं साराभाई स्क्विब्ज ह्या कारखान्याला इंजेक्शनच्या व्हल्सना लागणारीं टोपणें पुरविलीं. ह्या मुदतींत सुमारें दोन कोटी टोपणें त्यांनीं तयार करून दिलीं असतील ! पण या उपक्रमांत फारसा फायदा उरत नव्हता आणि त्यांचें मनहि त्यांत रमेना. कारण त्यामध्यें

उच्च दर्जाच्या कल्पकतेला वाव नव्हता. घरची चूल चालू रहायला त्यांचा उपयोग झाला एवढेंच. शॅडोलेस लँपमध्यें आणखी सुधारणा करण्याकडेच त्यांचें सर्व लक्ष होतें.

अखेर १९५६ ची दिवाळी आली आणि फिलिप्स कंपनीचे प्रतिनिधि आपण होऊन जोशी बंधूंचा शोध करीत तपकीर गल्लींत आले. त्यांनीं जोशी बंधूंच्या कल्पकतेची आणि पात्रतेची कसोटी घेऊन त्यांच्याबरोबर घाऊक खरेदीचा करारहि केला. दिव्यांच्या दर्जाबद्दल प्रश्नच नव्हता; तो दर्जा जोशी बंधू टिकवतील किंवा नाहीं अशी कंपनीच्या प्रतिनिधींना शंका होती. पण त्यांनीं नमुन्याच्या दिव्यापेक्षांहि सरस दर्जाचे दिवे तयार करून आणि त्यांत अधिकाधिक सुधारणा करून फिलिप्स कंपनीचा पूर्ण विश्वास संपादन केला. त्यामुळें त्यांचे दिवे आतां भारतांतील शेंकडों मोठ्या इस्पितळांतून शस्त्रक्रियेला प्रकाश पुरवीत आहेत.

जोशी बंधूंपैकीं मधुसूदन ("दादा", वय ४६) हें त्यांच्या एकत्र कुटुंबाची सांसारिक आघाडी संभाळतात आणि मुख्यतः दिव्याच्या शेंकडो भागांची योग्य प्रकारें जुळणी करण्याचें काम करतात. यशवंतकडे ("भय्यासाहेब", वय ४४) व्यवस्था, बँकेशीं व्यवहार, हिशेब, इन्कमटॅक्स, इत्यादि कामें आहेत तर प्रभाकरकडे (बाळासाहेब, वय ४२) प्रत्यक्ष उत्पादनाचें काम आहे. कामाची अशी सर्वसाधारण वांटणी असली तरी ती लवचिक आहे; पडेल तें काम कोणीहि करावें; काम संपविणें हें महत्त्वाचें; अशा पद्धतीनें ते सलोख्यानें वागतात. त्यांची राहणी अत्यंत काटकसरीची आहे. चड्डी आणि गंजिफ्रॉक ह्याच पोषाखांत ते नेहमीं असतात; आपलें ऑफिस, कारखाना, घर, असा भेद ते मानीत नाहींत. शॅडोलेस लँप्सचे ते कल्पक कारखानदार असतील अशी त्यांना वरवर पाहून कोणाला शंका सुद्धां येणार नाहीं. हा वैयक्तिक साधेपणा व काटकसर पाहुणचाराच्या मात्र कधींहि आड येत नाहीं; सत्यनारायणाच्या वेळीं सर्वांना साजूक तुपाचा बशीभर शिरा देतील आणि आणखी घेण्याचा आग्रह करतील.

काटकसरीच्या राहणीमुळेंच त्यांना शून्यांतून आपला कारखाना उभारतां येणें शक्य झालें आहे; त्यांचे सर्व भांडवल बचतीमधून निर्माण झालेलें असून त्यांच्या वर्कशॉपमध्यें आतां सुमारें ४० हजार रुपयांची यंत्रसामग्री आहे आणि

सुमारें १६ कामगार कामावर आहेत. त्यांनीं आपल्या उद्योगाला भागीदारीच्या फर्मचें स्वरूप दिलेलें असून तिघेहि भागीदार अगदीं जरूर तेवढीच उचल करतात. सर्वांनाच यांत्रिक व्यवसायाचा छंद असल्यामुळें आणि आजवर पैशाची अनुकूलता नसल्यामुळें त्यांच्या करमणुकीचें वेगळे असे प्रकार नाहींत. नव्या नव्या कल्पना लढवून, नव्या नव्या प्रकारचा उत्कृष्ट दर्जाचा माल कसा तयार करतां येईल, ह्याकडे त्यांचें सतत लक्ष असतें. गेल्या दसऱ्याच्या वेळीं प्रथमच, तिघेहि भाऊ केवळ बदल म्हणून म्हैसूरच्या प्रवासाला जाऊन आले आणि तेंहि त्यांच्या आईनेंच त्यांना जवळजवळ हाकललें म्हणूनच !

जोशी बंधूंच्या उत्पादनाची विविधता पुढील उत्पादनावरून लक्षांत येईल. ऑपरेशन टेबल, इन्स्ट्रुमेंट ट्रॉली, ड्रेसिंग टेबल, मेयो स्टँड, बेडसाइड लॉकर, रिव्हॉल्विंग स्टूल, गॅस सिलिंडर स्टँड, वॉश बेसिन स्टँड, स्टरिलायझिंग ड्रम स्टँड, टॉवेल स्टँड, बेडसाइड स्क्रीन्स, इलेक्ट्रो-मेडिकल ऑपरेटस, इत्यादि. ऑपरेशन थिएटरच्या सामग्रीपैकीं बरीचशी सामग्री ते तयार करूं शकतात. पण त्यांचें नांव सर्व सर्जनांना माहीत झालें आहे तें त्यांच्या शॅडोलेस लॅंपमुळें. त्यांपैकीं S. L. P. A. ह्या मॉडेलच्या दिव्याचा खप सर्वांत जास्त आहे. कारण हा दिवा स्टँडवर असल्याकारणानें तो कोठेंहि हलवितां येतो. बाळंतपणाच्या दवाखान्यांत हा विशेष उपयोगी आहे. सीलिंग मॉडेल M. S. U. हें मोठ्या शस्त्रक्रियांसाठीं वापरलें जातें; वीज बंद पडली तर बॅटरीवर तावडतोब दिवे घेण्याची योजना दुसऱ्या एका मॉडेलमध्यें केलेली असते. आगगाडी चालू असतांनाहि शस्त्रक्रिया करतां यावी ह्यासाठीं किंवा फिरत्या इस्पितळांसाठीं धक्के बसले तरी अचल राहणारे दिवेहि जोशी बंधूंनीं बनविले आहेत. प्रत्येक दिव्यांत शेंकडों लहान-मोठे भाग असतात आणि प्रकाश देणारा दिवा मात्र एकच असतो. ४० इंचांवर त्यांचा 'फोकस' पडावा; पण छाया मात्र पडूं नये अशा रीतीनें रिफ्लेक्टरची योजना केलेली असते. अर्थात् मागणीप्रमाणें गरज भागविली जाते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जोशी बंधूंचे दिवे प्रमुख सर्जनांना पसंत पडून त्यांची सर्वत्र कीर्ति होईपर्यंत त्यांच्या जनकांनीं अशा दिव्यांचा कॅटलॉग-सुद्धां पाहिलेला नव्हता. ह्यावरून त्यांच्या कल्पनाचातुर्याची कल्पना येईल.

तेवीस वर्षांपूर्वी केवळ छंद म्हणून सुरू केलेल्या उपक्रमास आतां कुठें बाळसें प्राप्त झालें आहे. ह्यावरून कारखानदारींत पहिल्या वर्षांपासून नफा मिळण्याची

अपेक्षा बाळगणारांना बरेंच शिकण्यासारखें आहे. बँकेचें कर्ज प्रारंभीं त्यांना मिळणें कठीण गेलें; आतां बँकेलाच त्यांच्याशीं धंदा करण्यास सुरक्षितता वाटते व बँकेची मदत वाढत चालली आहे. प्राथमिक अवस्थेंतील अडचणी दूर होऊं लागल्या आहेत. विक्रीची उत्कृष्ट व्यवस्था झाली असली तरी खरेदीसाठीं पुरेसें भांडवल अद्यापि उपलब्ध झालेलें नाहीं. याचा फायदा असा झाला कीं पैशांचा वापर जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें करणें त्यांच्या अंगवळणीं पडलें. कमींत कमी भांडवलाचा अधिकांत अधिक व चांगला उपयोग करण्यावांचून त्यांना गत्यंतरच नव्हतें आणि नाहीं. तीनहि भावांतील एकोप्यामुळें घर आणि वर्कशॉप असा फरक राहिलेलाच नाहीं. तीनहि भावजया सुद्धां वेळ सांपडेल त्याप्रमाणें, जुळणीच्या व इतर कामाला हौसेनें हातभार लावतात; त्याहि कारखान्याच्या कामाशीं एकरूप झाल्या आहेत. जोशी बंधूंच्या मातुःश्री श्री. उमाबाई ह्यांच्या सक्रिय प्रोत्साहनामुळें आणि बहिणींच्याहि मदतीमुळें सबंध कुटुंबच एक सहकारी कारखाना बनलें आहे.

जोशी बंधूंच्या शॅडोलेस लॅम्प्सनीं लक्षावधि रुपयांची परदेशी हुंडणावळ वांचवली आहे. त्यांची कीर्ति आज ऑपरेशन थिएटर्सच्या क्षेत्रापुरती मर्यादित असली, तरी त्यांच्या चहात्यांत अव्वल दर्जाचे देशी–विदेशी कुशल सर्जन आहेत. तुम्हांला ऑपरेशन थिएटरमध्यें जाण्याचा कधीं प्रसंग आला तर तेथील दिव्याच्या नळीवर किंवा टेबलाच्या पायावर ए. जी. जोशी आणि कं. हें नांव आढळेल आणि मग त्यांच्या कामगिरीबद्दलचें कौतुक दुणावेल. त्यांच्या कर्तृत्वामुळेंच तुमच्यावरील शस्त्रक्रिया उत्कृष्ट प्रकारें पार पडण्यास मदत होते, हें लक्षांत येईल.

जोशी बंधूंच्या आजच्या यशाचें रहस्य त्यांचे कारखानदारीशीं झालेलें तादात्म्य, काटकसरीची वृत्ति, पत निर्माण करून ती राखण्यासाठीं केलेली पराकाष्ठा आणि उत्पादनाचा दर्जा सतत वाढविण्याची ईर्ष्या, ह्यांमध्यें आढळेल. म्हणूनच अगदीं नवीन स्वरूपाचा धंदा ते उभारूं शकले. फार सुलभतेनें भांडवल मिळालें तर त्याचें महत्त्व पटत नाहीं आणि आवश्यक गोष्टीऐवजीं दुसऱ्याच गोष्टींवर आधीं खर्च होऊन बसतो असा त्यांचा अनुभव आहे. कारखानदाराची पत केवळ त्याच्या इमारतीवरून आणि यंत्रसामग्रीवरून मोजली जात नाहीं, तर त्याच्या उद्योगप्रियतेवर, कामसूपणावर, उत्पादनाच्या

दर्जावर ती मुख्यतः अवलंबून असते. ह्या दृष्टीनें जोशी बंधूंनीं मिळविलेली पत असामान्य आहे. दिलेला पैसा ठरलेल्या ठिकाणींच वापरला जाईल अशी खात्री असली म्हणजे भांडवल देणारा निश्चिंत राहूं शकतो.

लघुउद्योग करणारांच्या लक्षांत येईल कीं मोठ्या उद्योगांशीं स्पर्धा करून टिकाव धरावयाचा असेल तर लहान उद्योगांचें उत्पादन अशा तऱ्हेचें हवें कीं ते मोठ्या कारखानदाराला करणें परवडूंच नये. याचा अर्थ, लहान कारखानदाराच्या तयार मालांत कांहीं तरी वैशिष्ट्य असावें; त्याचें छोटेसें भांडवल कच्च्या मालाच्या साठ्यांत अडकून पडूं नये व त्याच्या कसबाची छाप तयार मालावर पडावी. उत्पादनाच्या खर्चाचें विक्रीच्या किंमतीशीं प्रमाण कमी पडावें, कसबाला जास्तींत जास्त वाव असावा. मोठ्या गिरणीची छोटी आवृत्ति म्हणजे लघुउद्योग नव्हे. वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन करणाऱ्या लघुउद्योगांना भरपूर वाव आहे. त्याचें भवितव्य उज्ज्वल आहे. नव्या निर्मितीचें त्यांना समाधान मिळणार आहे. वैयक्तिक विकासाबरोबर राष्ट्रीय विकास त्यानें घडून येणार आहे. लघुउद्योग करूं इच्छिणारांजवळ भांडवलापेक्षां कल्पकतेची जास्त आवश्य-कता असते. जोशी बंधूंची छोटी कारखानदारी त्यामुळेंच यशस्वी होत आहे.

बाळासाहेब हे गेल्या वर्षी शेंवेकर ट्रस्टची शिष्यवृत्ति मिळून पश्चिम जर्मनी-मधील व्यवसायांचें सूक्ष्म ज्ञान मिळविण्यासाठीं गेले होते, तेव्हां त्यांनीं युरोपांतील इतर देशांतील कारखान्यांचें तंत्रहि अवलोकन केलें. आपल्या शॅडोलेस लँपचा युरोपांत खप होण्याच्या दृष्टीनेंहि त्यांनीं तेथील बाजारपेठेची पाहाणी केली. तेव्हां त्यांना आढळून आलें कीं, आपले दिवे गुणांनीं श्रेष्ठ आणि किंमतीनें स्वस्त असले तरी त्यांची चकाकी आणि आकर्षकता हीं वाढविणें आवश्यक आहे. म्हणून, त्यांनीं इलेक्ट्रोप्लेटिंग आणि ॲनोडाय-झिंग ह्यांच्या अद्ययावत् पद्धती शिकून घेतल्या. निर्यातीला पुरेसे दिवे तयार करावयाचे, म्हणजे उत्पादनशक्तीहि वाढवायला हवी. सध्याची कारखान्याची जागा आतांच अपुरी पडत आहे; तेव्हां नव्या स्वतःच्या प्रशस्त जागी सोइस्कर इमारत बांधण्याच्या कामास जोशी बंधूंनीं आतां प्रारंभहि केला आहे. त्यांच्यांपुढें अद्याप खूपच मोठें कार्यक्षेत्र आहे; त्यांत त्यांची द्रुतगतीनें प्रगति होवो !

१२

# कॅप्टन शिवा दामले

शिवा दामले ह्या नांवानें ओळखण्यांत येणाऱ्या एका ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यानें "महाराष्ट्रीय मंडळ, पुणें" ही संस्था स्थापण्यांत पुढाकार घेतला. या संस्थेद्वारा शारीरिक शिक्षणाचें कार्य १९२४ पासून आजहि, वयाच्या ६३ व्या वर्षी, पंचविशींतल्या तरुणाच्या तडफेनें ते करीत आहेत. त्यांचा शष्ठ्यब्दिपूर्ति समारंभ त्यांच्या चहात्यांनीं महाराष्ट्र राज्याचे तेव्हाचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या अध्यक्षतेखालीं घडवून आणला. त्या वेळीं श्री. दामले ह्यांनीं ह्यापुढेंहि आणखी जोमानें कार्य करण्याचा आपला निश्चय जाहीर केला. शारीरिक शिक्षण व सैनिकीकरण ह्या बाबतींत श्री. दामले ह्यांचें कार्य अत्यंत मोलाचें आहे. त्यांच्या कामगिरीचें वास्तव मूल्य अजून पुरेसें झालेलें नाहीं. कर्तबगार महाराष्ट्रीयांच्या परंपरेंत त्यांचें स्थान शोधून दिसेल इतकेंच तें मोठें आहे ह्यांत संशय नाहीं. कुस्तीच्या एका नादिष्ट तरुणाला योग्य वळण मिळाल्यानें महाराष्ट्राचा केवढा तरी फायदा झाला आहे.

महर्षि अण्णासाहेब कर्वे ह्यांनीं स्त्री–शिक्षणासाठीं केलेलें कार्य सुप्रसिद्ध आहे. लो. टिळक, आगरकर, चिपळूणकर, फुले, इत्यादींनीं शिक्षण-प्रसाराचे केलेले प्रयत्नहि सर्वमान्य आहेत. त्यांनीं द्रष्टेपणानें दिलेल्या चालनेमुळें त्या

सर्वांबद्दल आदराची भावना बाळगली जाते. बौद्धिक शिक्षणकार्याप्रीत्यर्थ आणखी कितीतरी लहान-थोर लोकांनीं स्वतःस वाहून घेतल्याचें आपणांस माहीत आहे. परंतु शारीरिक शिक्षणाचें महत्त्व नव्या पिढीला पटवून देऊन त्या शिक्षणद्वारां त्या पिढीमध्यें पद्धतशीर नवचैतन्य निर्माण करण्याकडे एव्हापर्यंत पुरेसें लक्ष दिलें गेलें नव्हतें आणि साहजिकच त्यासाठीं संघटित प्रयत्नहि करण्यांत आले नव्हते. नेमकें हेंच कार्य करण्याचें व्रत शिवानें उचललें, चालवलें व यशस्वी करून दाखविलें.

श्री. दामले ह्यांचा जन्म पुणें येथें दि. १४ एप्रिल १९०० ह्या दिवशीं झाला. त्यांचे एक वडील बंधु, अप्पासाहेब, ह्यांना तालिमीचा, पोहण्याचा नाद होता; त्यांचें अनुकरण धाकटे बंधूहि करूं लागले. पण आपल्या मुलांनीं तालीम-खान्यांत जाणें आईला आवडत नसे. त्यामुळें मुलांना आईच्या हातचा नेहमीं मार खावा लागे. अप्पासाहेबांप्रमाणें दुसरे बंधु बाळासाहेब हेहि तालिमीचे शौकीन; त्यांच्याबरोबर शिवाहि तालिमीला जाऊं लागला. पण हें सर्व चोरून. श्री. गोविंदराव आवटे ह्यांनीं त्यांना कुस्तीची विद्या शिकविली. त्या सुमारास पुणें येथें डेक्कन जिमखान्यातर्फे कुस्त्यांचे जंगी सामने भरविले जात. त्यासाठीं आलेले बडोद्याच्या नारायण गुरु तालिमीचे लोक दामल्यांच्या घरीं उतरत. त्यांच्या मागोमाग शिवाहि कुस्त्यांना जाऊं लागला.

नुतन मराठी विद्यालयांतील कुस्त्यांच्या स्पर्धेत शिवाला दरवर्षी बक्षिसें मिळूं लागलीं. तीं बक्षिसें पाहून त्याच्या आईला आनंद व्हायचा. डेक्कन जिमखान्याच्या कुस्त्यांत शिवा भाग घेऊं लागला आणि त्यानें अनेक वर्षे ओळीनें आपल्या वजनाच्या गटांत आणि आंतर–महाविद्यालयीन गटांत ( कॉलेजचा विद्यार्थी असतांना ) बक्षिसें मिळवून नांव कमावलें. एका बक्षीस-समारंभास तर त्याचे वडील उपस्थित होते; त्यांनाहि मग शिवाचें कौतुक वाटलें आणि तेव्हांपासून उघडपणें कुस्ती शिकण्याला आणि मैदानांत भाग घेण्याला शिवाला ताम्रपट मिळाला !

त्या काळीं मध्यमवर्गीयांनीं तालिमींत जाऊन कुस्त्या करणें प्रशस्त मानलें जात नव्हतें; पण त्यांतून मार्ग काढून प्राविण्य मिळविल्यानंतर व कीर्ति पसरल्या-नंतर सर्वांचाच दृष्टिकोण बदलला. कॉलेजांत असतांना शिवा तालीम-विभागाचा चिटणीस होता. क्रिकेटच्या सामन्यांतील खेळाडूंचे बूट, बॅटी व पॅड्स वाहण्यासाठीं

पट्टेवाला असे; शिवानें कुस्ती खेळणाऱ्यांचे लंगोट-चड्डया वाहण्यासाठीं पट्टेवाला मागून घेऊन कुस्तीचें महत्त्व वाढविण्याचा केलेला प्रयत्न मनोरंजक आहे !

शिवा ज्या निंबाळकर तालिमींत जात असे त्या तालिमींत गणेशोत्सवांत सार्वजनिक गणपति बसविण्यांत त्यानें पुढाकार घेतला. त्या आळींतील अग्रेसर वकील श्री. ल. ब. भोपटकर ह्यांच्याकडे शिवा वर्गणी मागण्यासाठीं गेला असतांना त्याची त्यांच्याशीं ओळख झाली आणि ती व्यायाम–विषयक शिक्षणाच्या प्रसाराच्या दृष्टीनें एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. पुढें शिवाजी मंदिरांत शिवाजी उत्सवामध्यें दांडपट्ट्याच्या सामन्यास श्री. भोपटकर हे पंच नेमण्यांत आले होते; ते आपणास कबूल नाहीं असें शिवानें स्पष्ट सांगितलें. नामांकित कायदेपंडित दांडपट्ट्याचा ज्ञाता असूं शकतो हें त्यावेळीं शिवाच्या लक्षांतच आलें नाहीं. पुढें शिवाला स्वतःच्या अज्ञानाची जाणीव होतांच, त्यानें आपली चूक कबूल केली. श्री. भोपटकरांचें व शिवाचे संबंध दृढ होण्यास या घटनेमुळें मदतच झाली. शिवानें मुळशी सत्याग्रहाच्या वेळीं स्वयंसेवकाचें काम केलें; पण तो सत्याग्रह लवकरच बंद पडला. इकडे निंबाळकर तालिमींत मतभेद होऊन शिवा आपल्या सोबत्यांसह; बाहेर पडला. आतां तालीम कोठें करावयाची व कुस्त्या कोठें खेळावयाच्या असा प्रश्न उपस्थित झाला. कॉलेज तर सोडलेलेंच होतें. शिवा दामलेच्या व्यायामविषयक सार्वजनिक कार्याला येथूनच प्रारंभ झाला.

"चांगली तालीम असली तर आम्ही तालिमीला येऊं" असे लोक म्हणावयाला लागले. तेव्हां आपण आपली एक नवीनच तालीम काढावी असें शिवा प्रभृतींनीं मनांत घेतलें आणि त्यासाठीं जागेचा शोध सुरू केला. तालमीसाठीं आखाडा, जोर–बैठकीसाठीं छप्पर आणि लाठी–बोथाटीसाठीं उघडें मैदान, अशी सोईस्कर जागा कोठें मिळेना. अखेर श्री. तात्यासाहेब केळकरांनीं केसरी-मराठा ट्रस्टची टिळक रोडवरील जागा वापरण्यास दिली. शिवा प्रभृति मंडळींनीं त्या जागीं "महाराष्ट्रीय मंडळ" ह्या नांवानें आपल्या व्यायामशाळेस प्रारंभ केला. ज. वि. करंदीकर व शि. वि. दामले हे दोघे चिटणीस बनले आणि त्यांनीं पावती–पुस्तकें छापून घेतलीं. संस्थापक–सभासदांनीं प्रत्येकीं २५ रु. दिले; शिवाजवळ स्वतःची एवढी रक्कम नव्हती; ती त्यानें कुस्त्या जिंकून मिळवून दिली. जमलेल्या ३०० रुपयांच्या आधारावर

व्यायामशाळा उभारण्यांत आली. महाराष्ट्रीय मंडळाच्या जागेंत एक बांधलेली विहीर होती; तींत पोहणें शिकवायला शिवानें प्रारंभ केला. विहिरीशेजारच्या टिळक रोडवरून जाणाऱ्या–येणाऱ्या चलाख मुलांना शिवा आपण होऊन पोहणें शिकण्याचा आग्रह करी आणि त्यांना फुकट शिकवी. हळूहळू मंडळाचें नांव घरोघरीं पसरूं लागलें. त्या वेळीं मंडळाच्या व्यायामशाळेची मासिक वर्गणी फक्त एक आणा होती.

मंडळाचें उद्दिष्ट साध्य व्हावें ह्या दृष्टीनें भारतांतील इतर ठिकाणच्या व्यायामविषयक संस्थांचें कार्य पाहून येण्यासाठीं मंडळानें श्री. सदूभाऊ गोडबोले व श्री. ज. वि. करंदीकर ह्यांची नियुक्ति केली. त्यांच्या अवलोकनाचा व अनुभवाचा फायदा मंडळास मिळाला. १९२८ मध्यें श्री. दामले आजारी पडले तेव्हां मंडळाच्या भवितव्याविषयीं त्यांच्या मनांत चिंता निर्माण झाली. आज इतकीं वर्षें मंडळाचे दरवाजे उघडणाऱ्या आणि बंद करणाऱ्या ह्या चिटणिसाला वाटूं लागलें कीं आपली संस्था कोणत्याहि व्यक्तीवर अवलंबून न राहतां चालली पाहिजे; चिरस्थायी झाली पाहिजे. ह्यासाठीं श्री. भोपटकरांनीं मंडळाची घटना तयार करून मंडळ रजिस्टर करण्यांत आलें. श्री. भोपटकर ह्यांचें चेअरमन ह्या नात्यानें मंडळाला आणि श्री. दामले ह्यांना सतत मार्गदर्शन लाभूं शकलें हा देखील त्याचा एक फायदा झाला. मंडळ रजिस्टर होतांच त्याच्या कारभाराची तीन सूत्रें त्यांनीं सांगितलीं––

( १ ) मंडळाच्या चिटणिसानें स्वतःजवळ कधींहि मंडळाचे पैसे बाळगूं नयेत. देण्याघेण्याचा सर्व व्यवहार स्वतंत्रपणें निवडून आलेल्या खजिनदारानें नियम–ठराव पाहून करावा.

( २ ) मंडळाची सर्व शिल्लक सरकारी रोख्यांतच गुंतवावी; जास्त व्याजाच्या आशेनें किंवा वैयक्तिक दडपणानें इतरत्र गुंतविण्याच्या मोहास कधींहि बळी पडूं नये. सार्वजनिक संस्थेचा पैसा शंभर टक्के सुरक्षित राखला पाहिजे.

( ३ ) मंडळाचे हिशेब सभासदांनीं निवडलेल्या चार्टर्ड अकौंटंटकडून दरसाल तपासून घेतले पाहिजेत.

मंडळानें हीं हितकारक बंधनें कटाक्षानें पाळलीं. त्यामुळें लक्षावधि रुपयांची उलाढाल होऊनहि त्या बाबतींत कोणाला कधीं शंकेला सुद्धां जागा उरली नाहीं. संस्थेला व्यक्तीपेक्षां वेगळें अस्तित्व असावयाला हवें; आत्मीयतेची भावना

केवळ सेवेपुरती हवी; हें तत्त्व त्याच्या मुळाशीं आहे.

१९२६ मध्यें श्री. दामले ह्यांनीं महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद् बडोद्याचे व्यायाम-तज्ज्ञ सरदार मुजुमदार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरविली आणि शारीरिक शिक्षणाचे वर्ग सुरू केले. त्यामुळें मंडळाच्या कार्याला खूपच प्रसिद्धि मिळाली. महात्मा गांधींनीं वर्धा आश्रमांतील कांहीं मुलींना मंडळांत शिक्षणासाठीं पाठविण्यास प्रारंभ केला. कित्येक वर्षें तेथील मुली येत असत. पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं आपली कन्या इंदिरा हिला मंडळांत शारीरिक शिक्षणासाठीं एक वर्षभर पाठविलें. ह्या दोन्हीं गोष्टींबद्दल श्री. दामले ह्यांना स्वाभाविकच अभिमान वाटतो.

सार्वजनिक संस्थेच्या कार्यकर्त्याला किती अडचणींतून जावें लागतें ह्याची कल्पना श्री. दामले ह्यांच्यावर आलेल्या प्रसंगांवरून येऊं शकेल. पुणें येथील मुलींच्या एका शाळेंत त्यांनीं एक वर्षभर लाठीचा वर्ग विनामूल्य चालविला. त्याच्या अखेर मुख्याध्यापिकेच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार करण्यांत येऊन लाठीच्या वर्गातील ५०-६० मुलींचा ग्रुप फोटो त्यांना नजर करण्यांत आला. हा फोटो त्यांनीं मंडळाच्या कचेरींत इतर अनेक फोटोंप्रमाणें लावला. त्यावर कांहीं जणांनीं काहूर माजविलें आणि प्रकरणाचा निकाल कोर्टानें देईपर्यंत मंडळाच्या विरोधकांनीं अपप्रचाराची संधि साधली.

दुसऱ्या एका मुलींच्या शाळेच्या बोर्डिंगांतील एक मुलगी मॅट्रिकच्या परीक्षेंत नापास झाल्यामुळें आजोबांच्याकडे परगांवीं, घरीं न कळवितां, निघून गेली. शाळेच्या आवारांतच श्री. दामले ह्यांनीं सुरू केलेल्या शारीरिक शिक्षणाच्या वर्गांत इतर मुलींप्रमाणें तीहि शिकत होती. शिक्षकाचें काम करणाऱ्यावर मुलगी पळविल्याचा आरोप करण्यांत आला. तेव्हां श्री. दामले ह्यांनींच पोलीस खात्या-मार्फत शोध करवून मुलीचा शोध लावून दिला. पोहण्याच्या वर्गातील एक मुलगा मुंबईला निघून गेला, तो कांहीं दिवसांनीं तेथें सांपडला; पण दामल्यांच्या-मुळें तो विहरींतच बुडाला असा बभ्रा झाला. कोणा एकाचा भाल्यानें खून झाला: त्या भाल्याशीं श्री. दामले ह्यांचा संबंध जोडला जाऊन त्यांच्यावर पोलिस-कोर्टांत जाण्याची पाळी आली. मुलींना शारीरिक शिक्षण देण्याच्या विरुद्ध असलेली सनातनी मंडळी आणि शारीरिक शिक्षणाचें वावडें असणारी ब्रिटिश सत्ता ह्यांच्या कात्रींत श्री. दामले आणि त्यांचें मंडळ कित्येक वेळां सांपडलें होतें.

श्री. दामले ह्यांचा बीमोड करण्यासाठीं त्यांना इंग्रज सरकारनें सन्मानपूर्वक निमंत्रण पाठवून ऑनररी पोलीस इन्स्पेक्टरची जागा देऊं केली. ती जागा स्वीकारली तर आपण सरकारचे हस्तक होऊं आणि आपल्याच देशबांधवांवर लाठीहल्ला करण्यास बांधले जाऊं; जागा पत्करली नाहीं तर सहा महिने कैद आणि दंड, असा तो पेंचप्रसंग होता. श्री. दामले ह्यांनीं सरकारला स्पष्ट नकार दिला. "तुमच्या नकाराचा काय परिणाम होईल ह्याची तुम्हांला जाणीव आहे का? तुमच्या हितचिंतकांना तुम्ही विचारलें आहे का?" असा डी. एस. पी. नें प्रश्न करतांच "परकीय सरकारचा हस्तक बनून शारीरिक शिक्षणाचें काम सोडून देण्यापेक्षां सहा महिन्यांचा कारावास मी पत्करीन" असें श्री. दामले ह्यांनीं बाणेदारपणें उत्तर दिलें. श्री. दामले ह्यांच्या आयुष्यांतील हा सर्वांत बिकट प्रसंग होता. पुढें ह्याच डी. एस. पी.नें श्री. दामले ह्यांना मुंबई प्रांतिक पोलिस सप्ताहांतील कुस्त्यांच्या सामन्यांसाठीं पंच म्हणून बोलाविलें आणि गव्हर्नराशीं ओळख करून दिली! श्री. दामले ह्यांचें व्यक्तित्व, स्वाभिमान, बेडरपणा ह्यांची इंग्रज अधिकाऱ्यांवर कशी छाप पडत असे ह्याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. हॉटसन गृहमंत्री असतांना लेडी हॉटसननें त्यांचें मन वळवून, गव्हर्नराकडे महाराष्ट्र मंडळाची रदबदली करण्यास लावलें होतें. इंग्रज सरकारला शारीरिक शिक्षणाचा प्रसार नको असला तरी इंग्रज लष्करी व मुलकी अधिकारी खासगी रीतीनें व्यक्तिशः श्री. दामले ह्यांची प्रशंसा करीत आणि शक्य ती मदतहि करीत.

श्री. दामले हे १९१८ मध्यें साधा सैनिक म्हणून लष्करांत दाखल होणार होते; परंतु 'नॉन-मार्शल' जातीचे म्हणून त्यांना प्रवेश मिळूं शकला नाहीं. दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर महाराष्ट्रीय तरुणांनीं सैन्यांत प्रवेश मिळवावा असा प्रचार श्री. दामले ह्यांनीं सुरू केला आणि त्यासाठीं १९४० मध्यें "मिलिटरायझेशन बोर्ड" (महाराष्ट्र सैनिकीकरण मंडळ) स्थापन केलें. अर्थात् महाराष्ट्रीय मंडळाचेंच तें एक अंग होतें आणि श्री. दामले हेच त्याचे सूत्रधार होते. तथापि प्रा. रा. ब. फडके ह्यांच्याकडे त्याचें चालकत्व सोंपविण्यांत आलें होतें.

सैनिकीकरण मंडळातर्फे पाठविण्यांत येणारे लायक तरुणहि इंग्रजी भाषा नीट येत नाहीं म्हणून तोंडी परीक्षेंत नापास होऊं लागले तेव्हां मंडळानें

आपल्या उमेदवारांना इंग्रजी बोलण्याचें शिक्षण देण्यासाठीं इंग्रज शिक्षकांची योजना केली ! ही योजना यशस्वीहि झाली. कॅप्टन भगत ह्यांना ' व्हिक्टोरिया क्रॉस ' हा अपूर्व सन्मान मिळाला त्याबद्दल सैनिकीकरण मंडळानें त्यांचा प्रचंड सत्कार केला. मंडळाच्या सैनिकीकरणाच्या मोहिमेस त्यामुळें अधिकाधिक यश येऊं लागलें. मंडळाचें नांव व कार्य लष्करी खात्यांतील सर्वांना माहीत झालें आणि मंडळातर्फे जाणाऱ्या उमेदवारांचा प्रवेश सुकर झाला. त्यांपैकीं कांहींना लढाईत मृत्यु आल्याच्या अफवा पसरल्या आणि सैनिकीकरणाला विरोध करणारांनीं ह्या निमित्ताचा फायदा घेण्यास प्रारंभ केला. त्याला उत्तर म्हणून श्री. दामले हे स्वतःच १९४२ मध्यें, वयाच्या ४२ व्या वर्षी, लष्करांत दाखल झाले. सैनिक ह्या नात्यानें त्यांना ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर ह्या रणक्षेत्रांवर जावें लागलें. १९५२ मध्यें ते निवृत्त झाले.

इंग्रजी भाषेच्या अडसरामुळें महाराष्ट्रियांची लष्करांत कशी कुचंबणा होते ह्याच्या प्रत्यक्ष अनुभवामुळें, कॅप्टन दामले ह्यांनीं शाळेंतून इंग्रजी हा विषय काढण्यांत आला असतांना त्याविरुद्ध जोराची मोहीम सुरू केली. युद्धकाळांत केवळ तोंडी परीक्षा घेऊन भरती होत असे तेव्हां इंग्रजी बोलतां समजतां आलें तरी काम भागावयाचें; पण भरती होण्यासाठीं इंग्रजीमधून लेखी परीक्षा घेण्यांत येऊं लागल्यानंतर इंग्रजी भाषेच्या ज्ञानाचें महत्व अधिकच वाढलें. ज्यांना शाळेंत इंग्रजी भाषा शिकविण्यांतच आली नाहीं, त्यांनीं इंग्रजींत उत्तरें लिहावयाचीं तरी कशीं ? " ज्या भाषेंत परीक्षा घेतां त्या भाषेंत आम्हांला शिकवा; नाहीं तर जी भाषा आम्हांला शिकविली त्या भाषेंत परीक्षा घ्या " ही श्री. दामले ह्यांची साधी मागणी होती. सैनिकीकरणाच्या मोहिमेचा एक भाग म्हणून त्यांनीं आपली मागणी राष्ट्रपति, पंतप्रधान, सर सेनापति, ह्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या कानांवर घातली. नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी पुण्या-जवळ सिंहगडच्या पायथ्याशीं, खडकवासल्यास आली आहे; पण तेवढ्यानें केवळ तेथें प्रवेश सुलभ झालेला नाहीं. ॲकॅडेमींत प्रवेश मिळविणाराचें वय १५ ते १७॥ च्या दरम्यान असावें लागतें. ही अट महाराष्ट्रीयांना जाचक होते. कारण एस्. एस्. सी. परीक्षा होण्यापूर्वी ११ इयत्तांसाठीं विद्यार्थ्यांचीं ११ वर्षे जातात आणि एस्. एस्. सी. होणारा विद्यार्थी १७ वर्षांचा असतो. शाळेंतून इंग्रजीची हकालपट्टी आणि ११ इयत्ता ( इतर राज्यांतील शाळांतून १० इयत्ता आहेत)

ह्या दोन्ही अडचणींचें निराकरण करण्यासाठीं मंडळानें सतत प्रयत्न चालविले आहेत. मुंबई राज्यांत आतां शाळेंतून इंग्रजीला पुनः स्थान मिळण्यास प्रारंभ झाला आहे. सैनिकीकरणाच्या दृष्टीनें ही अत्यंत स्वागतार्ह दुरुस्ती आहे.

महाराष्ट्रीयांत क्षात्रवृत्ति निर्माण होऊन त्यांना सैन्यांतील वेगवेगळ्या खात्यांत प्रवेश मिळावा ह्या उद्देशानें सैनिकीकरण मंडळाची स्थापना १९४० सालीं करण्यांत आली हें वर सांगितलेंच आहे. मंडळाच्या चालकांनीं लष्करी खात्याच्या सहकार्यानें भारतांतील ठिकठिकाणच्या लष्करी शिक्षण-केंद्रांना भेटी देऊन लष्करी शिक्षणाची व लष्करी जीवनाची प्रत्यक्षपणें सूक्ष्म पाहणी केली. मंडळ-उमेदवारांच्या शिक्षणासाठीं व्याख्यानें करविलीं आणि वर्ग भरविले; ह्या वर्गांत दाखल होण्यासाठीं हिमालयापासून केप कामोरिन पर्यंतचे आणि कच्छ-पासून कलकत्त्यापर्यंतचे विद्यार्थी येतात. ह्यावरून मंडळाच्या कार्याची व्यापकता सहज लक्षांत येईल. अर्थात् मंडळांत महाराष्ट्रीयांचा भरणा मोठा असतो हें उघड आहे; पण प्रवेश सर्वांना खुला आहे. जॉइंट सर्व्हिसेस विंग, मिलिटरी विंग आणि ॲकेडमी ह्यांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं मंडळ जे वर्ग चालविते त्यांतील विद्यार्थ्यांचे वेगवेगळे विषय पक्के करून घेण्यासाठीं सुप्रसिद्ध आणि अनुभवी असे प्राध्यापक, डॉक्टर्स, क्रीडातज्ज्ञ ह्यांचें सहकार्य मंडळाला लाभलेलें आहे. डॉ. सर रघुनाथ परांजपे, न्यायमूर्ति भिडे ह्यांच्या-सारखे पट्टीचे विद्वान् नागरिक विद्यार्थ्यांचें मार्गदर्शन करीत असतात. विद्यार्थ्यांना पुणें, लोणावळा, खडकवासला, लोहगांव, इत्यादि ठिकाणच्या लष्करी संस्था दाखविण्यांत येतात. अशा रीतीनें, उमेदवारांच्या परीक्षेची पूर्व-तयारी कसोशीनें करून घेण्यांत येते आणि त्यांच्यांतील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. सैनिकीकरण मंडळाच्या द्वारां आतांपर्यंत शेंकडों तरुणांना लष्करांत अधिकाराच्या जागा आणि हजारों तरुणांना इतर शाखांत कामें मिळवून देण्यांत आलीं आहेत. त्यामुळें सैनिकीकरणाचा संदेश महाराष्ट्रभर पसरला आहे आणि सैनिकीकरणाला आपोआपच प्रचारक लाभले आहेत.

श्री. दामले ह्यांची शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्रांतील कामगिरी इतकी बहुविध आणि प्रचंड आहे, महाराष्ट्रीय मंडळाच्या कार्याचा व्याप इतका मोठा आहे कीं त्याचा येथें तपशील देणें अशक्य आहे. दशसहस्रावधि मुलांमुलींना, तरुण-तरुणींना, श्री. दामले ह्यांच्या संस्थेनें नाना प्रकारचें शारीरिक शिक्षण

संघटितरीत्या दिलेलें आहे आणि शारीरिक शिक्षणाची आवड प्रसृत केली आहे. महाराष्ट्रीय मंडळाच्या व्यायामशाळेंत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या शेंकडों उत्साही मुला–मुलींना नकार देण्याची आतां पाळी येत आहे. श्री. दामले ह्यांचा आत्मविश्वास दांडगा आहे. त्यांनीं शारीरिक शिक्षणाच्या प्रसाराच्या आणखी कितीतरी योजना आंखल्या आहेत. आपल्या देशाभिमानाला त्यांनीं दिलेलें कृतीचें स्वरूप असामान्य आहे. त्यांना समाजानें पैसा कमी पडूं दिलेला नाहीं आणि आतां सरकारहि मदतीला तत्पर आहे. "सैनिकीकरणाचें कार्य पैशाच्या अभावीं मंदावण्याची पाळी मी येऊं देणार नाहीं" असें श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं श्री. दामले ह्यांच्या सत्कार समारंभाच्या प्रसंगीं आश्वासन दिलें; ५,००० रु. ची देणगी त्यांनीं ह्यापूर्वीच पाठविली होती, याचा येथें मुद्दाम उल्लेख करणें आवश्यक आहे. श्री. दामले ह्यांनीं आपल्या कार्यास सर्व पक्षांतील लोकांचा पाठिंबा मिळविला आहे; श्री. भोपटकर ह्यांच्या शिकवणीला त्याचें श्रेय असल्याचें श्री. दामले हे कृतज्ञतापूर्वक सांगतात. ह्या मर्द गड्यानें मोठ्या नेकीनें मंडळाची जोपासना करून त्याकरवीं कामाचें प्रचंड डोंगर उठवले आहेत.

मोठ्या व्यक्तींचीं मनें जिंकण्याची श्री. दामले ह्यांची हातोटी विलक्षण आहे. महात्माजींनीं मंडळाला भेट दिली तेव्हां एक तासाचा अवधि भेटीसाठीं राखलेला होता. ५८ मिनिटें होतांच श्री. दामले ह्यांनीं महात्माजींना वेळ संपत आल्याची सूचना केली; महात्माजी वक्तशीरपणाचे मोठे भोक्ते होते. त्यांनीं श्री. दामले ह्यांची पाठ थोपटून त्यांचें कौतुक केलें.

इंग्रज ब्रिगडिअरपासून क्रांतिकारकांपर्यंत श्री. दामले हे सर्वांना प्रिय झाले आणि ते आपल्या भोंवतीं स्तुतिपाठकांचें नव्हे तर सहाय्यकांचें मंडळ जमवूं व राखूं शकले ह्याचें रहस्य त्यांच्याजवळ गेल्याखेरीज कळणार नाहीं! कर्तव्य-कठोरता आणि अंतःकरणाची मृदुता त्यांच्यांत एकत्रित झालेली आढळते. "व्यायाम ही बौद्धिक शिक्षणाइतकीच प्रत्येक माणसाची गरज आहे" हा संदेश घरोघर पोंचवून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचें त्यांचें कार्य अधिकाधिक प्रभावी होवो! त्यांच्या फिजिकल कल्चर कॉलेजच्या योजनेकडे आतां सर्वांचें लक्ष वेधून राहिलें आहे.

...ठा ... ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम ....३६५३८. वि: ....
...२२७५...

# विमल सोहोनी

“ विमलाबाई विमानांतून युरोपचा प्रवास करून आल्या ” असें तुम्हांला कोणी सांगितलें तर तुम्ही म्हणाल “ त्यांत काय मोठं आहे ? विलायतेला जाणाऱ्या स्त्रिया ही कांहीं आतां कौतुकाची बाब राहिलेली नाहीं. ”

“ विमलाबाई स्वतःच्या नोकरींतून सांठविलेल्या पैशानं गेल्या ” असें पुढें सांगितलें तर कित्येकांचें उत्तर येईल, “ त्यांना मोठी नोकरी असेल. आम्ही सुद्धां जाऊं तशी नोकरी असल्यावर. ”

विमलाबाईंची नोकरी इतर कित्येक स्त्रियांच्या नोकरीपेक्षां फार वेगळ्या स्वरूपाची आहे. एका मोठ्या डोमेस्टिक रीसर्च ब्यूरोंत त्या काम करतात. वर्षांतून एकूण सहा महिने त्यांना फिरती असते. रोज नव्या गांवांतील नव्या माणसांशीं बोलण्याचा, त्यांच्याकडून उत्तरें काढून घेण्याचा, रोज नव्या ठिकाणीं उतरण्याचा त्यांना प्रसंग येतो. ह्या कामासाठीं ज्या स्त्रियांची निवड केली जाते त्या चतुर, संभाषणांत कुशल, व्यक्तिमत्वाची छाप पाडणाऱ्या, बहुश्रुत असाव्या लागतात. हजरजबाबीपणा, प्रसंगावधान, इत्यादि गुणांची तर त्यांना प्रत्यक्ष व्यवहारांत नेहमींच परीक्षा द्यावी लागते. अशा प्रकारचें काम करणाऱ्या स्त्रियांत महाराष्ट्रीय स्त्रियांचें प्रमाण अत्यल्प आहे.

विमलाबाईंचें लहानपण अगदीं एका डोंगराळ खेड्यांत गेलेलें. आई-वडिलांची एकटीच मुलगी. त्यामुळें लाडांत वाढलेली. शिक्षणाच्या सोईचे अभावी ११ व्या वर्षापर्यंत घरींच बसलेली. तिला मुंबईला मोठ्या चुलत्यांचेकडे शिक्षणासाठीं पाठविण्यांत आलें, तेव्हां ती खेडवळच होती. वर्गातील इतर मुलींच्या मानानें वयानें आणि बांध्यानें मोठी असल्यामुळें तिला बुजल्यासारखें होई. पण तिनें लवकरच वर्गात पहिला नंबर पटकावला आणि पहिल्या वर्षांत तीन यत्ता पुऱ्या केल्या. मराठी चौथ्या यत्तेसाठीं तीं सावरसई ह्या आपल्या खेड्याजवळच्या पेण गांवांतील शाळेंत दाखल झाली. इंग्रजी शिक्षणासाठीं तेथील मुलांच्या शाळेंत तिला जावें लागलें, तेव्हां खेळांची, वक्तृत्त्वाची अभिनयाची आवड असूनहि ती तिला आवरावी लागली; त्या सर्वांला त्या वातावरणांत मनाईच होती ! १९४२ सालीं, सुप्रसिद्ध क्रिकेटपटु रंगा सोहोनी ह्यांच्याशीं तिचा विवाह झाला, त्यानंतर मात्र तिच्या गुणांना वाव मिळाला. तरी सुद्धां, त्यासाठींहि पतींची मुंबईला बदली होईपर्यंत वाट पहावी लागली. त्यावेळीं ती मॅट्रिकहि झालेली नव्हती.

मुंबईला बिऱ्हाड असतांना तिनें पहिलीं कांहीं वर्षें आरामांत काढलीं; पण आजूबाजूच्या कित्येक स्त्रियांनीं कॉलेज-शिक्षण पुरें करून व चांगल्या नोकऱ्या करून आपापल्या कुटुंबांचें जीवन समृद्ध केल्याचें पाहून विमलाबाईनाहि स्फूर्ति आली. पण कॉलेजचें शिक्षण आपल्या हातून पार पडेल किंवा नाहीं, ह्याची त्यांना शंका वाटत होती. हिंदीच्या चार परीक्षा पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण होऊन त्यांनीं स्वतःच त्या शंकेचें निराकरण केलें आणि मॅट्रिक ते बी. ए. च्या परीक्षा दिल्या. १९५५ सालीं बी. ए. च्या वर्गात त्या होत्या, तेव्हां एक दिवस डोमेस्टिक रिसर्च ब्यूरोच्या इन्व्हेस्टिगेटर्स घरीं कांहीं माहिती गोळा करण्याकरितां आल्या. त्यांचें वागणें, बोलणें, चालणें आकर्षक वाटलें आणि आपणहि तें काम करू शकूं, असें त्यांच्या मनानें घेतलें.

पदवीधर झाल्यामुळें त्यांना वर सांगितलेली नोकरी मिळणें सोपें गेलें व आज सुमारें सात वर्षें त्या मोठ्या उत्साहानें तें काम करीत आहेत. श्रीरंग सोहोनी इंग्लंडमध्यें लॅंकेशायर लीगमध्यें क्रिकेट खेळण्यासाठीं जाऊन राहिले

होते, तेव्हां त्यांची पत्नी आपल्या पैशानें तेथें जाऊन कांहीं आठवडे राहून व त्यांच्या समवेत युरोपचा प्रवास पुरा करून परत आली.

आपल्या स्वतःच्या मिळकतीमुळें एक प्रकारचा आत्मविश्वास आणि सुरक्षितपणा वाटतो असें विमलाबाईंचें म्हणणें आहे. बाहेरील जगाच्या अनुभवामुळें, आपल्या पतीला कशा अडचणी सोसाव्या लागत असतील तें पत्नीला समजलें तर तिचा पतीविषयीचा जिव्हाळा व आदर वाढेल असें त्या सांगतात. "आपल्या मुलाला (प्रदीपला) पुढें कोणत्या जगांत वावरावयाचें आहे हें मला स्वतःला कळलें, तर आई म्हणून मी माझें कर्तव्य अधिक चांगलें पार पाडूं शकेन," असें त्यांचें मत आहे. "तूं ही नोकरी करूं लागल्यापासून अधिक चांगली पत्नी व गृहिणी बनली आहेस" असें 'हे' म्हणत असल्याचें विमलाबाई मोठ्या अभिमानानें सांगत असतात !

फिरतीवर असतांना विमलाबाई, न चुकतां, एक दिवसा आड घरीं पत्र पाठवितात. मधूनमधून फोनवरून पतीशीं, मुलाशीं व आईशीं बोलतात. त्यामुळें प्रत्यक्ष गांठ पडली नाहीं तरी कोणालाच एकलेपणा वाटत नाहीं. नातवाकडे लक्ष देण्यास आजी तत्पर असल्यामुळें घरची काळजी करण्याचें कारण पडत नाहीं. खुद्द पतीला विमलाबाईंचें कौतुक असल्यानें विरहांतहि दोघांना एक प्रकारचा आनंदच वाटत असतो.

विमलाबाई पूर्णपणें शाकाहारी आहेत. इंग्रजी कादंबऱ्या वाचायला त्यांना अतिशय आवडतात. वायलच्ीं पांढरीं पातळें, नाहींतर एकदम गडद रंगांचीं पातळें त्यांना विशेष पसंत पडतात. प्रवासांत त्यांना विणकामाला भरपूर वेळ मिळतो. त्यांच्याबरोबर काम करण्यास आणखी दोघी जणी असल्यामुळें व त्या परभाषिक व परजातीय असल्यामुळें आपोआपच दृष्टिकोन विशाल होतो. किरकोळ गोष्टींचें नसतें महत्त्व उरत नाहीं. आपलें स्वतःचें एक टुमदार घर असावें व त्याच्या उभारणीस आपला कांहीं तरी हातभार लागावा अशी त्यांची मनांतली, अगदीं खोलांतली, इच्छा आहे. पतीला चांगली, मानाची नोकरी असतांनाहि विमलाबाईंनीं शिक्षण पुरें करून नव्या प्रकारच्या कामांत यश मिळविलें आहे आणि संसारास समृद्धि आणली आहे. त्यांचा परदेशाचा प्रवास हा केवळ अलंकार नसून तो त्यांच्या पुढील यशाला व सर्वांगीण उत्कर्षाला साहाय्यकारक ठरणार आहे.

सुशिक्षित, सवंध जगभर प्रवास केलेला, उमदा, देखणा, क्रिकेटपटु, सरकारी अधिकारी अशा श्रीरंगाची गृहिणी म्हणून यशस्वी होणें हें कांहीं सोपें काम नाहीं. विमलाबाईंनीं त्याच्याहि पुढें जाऊन "ही माझी पत्नी" असें पतीनें म्हणून तिला बरोबर घेऊन अभिमानानें मिरवावें असें स्थान स्वतःच्या कर्तृत्वानें प्राप्त करून घेतलें आहे. त्यांच्या शालीनतेमुळें हें कर्तृत्व विशेषच्च मोहक झालें आहे.

साबण, टूथपेस्ट, सौंदर्यप्रसाधनें, इत्यादींच्या प्रथितयश कारखानदारांनीं आपल्या गिऱ्हाइकांच्या आवडी-निवडी जाणून घेण्यासाठीं, 'डोमेस्टिक रिसर्च ब्यूरो' हा एक दुवा निर्माण केला आहे. ह्या ब्यूरोंत विमलाबाई काम करतात. कंपन्यांचे वेगवेगळे जिनसा घेणारे व वापरणारे कोट्यवधि ग्राहक आहेत आणि ते शहरोशहरीं, खेडोपाडीं पसरलेले आहेत. कंपन्यांचा माल जास्तींत जास्त लोकांच्या पसंतीला उतरला तरच त्याचा खप वाढणार आणि कंपन्यांचा उत्कर्ष होणार हें उघड आहे. गरीब–श्रीमंत, शिक्षित–अशिक्षित, शहरवासी–खेडुत, पंजाबी–तामीळ, अशा सर्वांनाच माल पसंत पडायला हवा, म्हणून त्यांच्या आवडी–निवडी समजून घेणें जरूरीचें असतें. डोमेस्टिक रिसर्च ब्यूरोचें हेंच्च काम आहे. प्रश्न तयार करणें, ते विचारणें व त्यांचीं खरीं उत्तरें मिळविणें ह्या सर्व संभाषण–कौशल्याच्या बाबी आहेत. कारण, उत्तर देणारे पुष्कळ वेळां, प्रश्न विचारणाराला आवडेल असेंच्च उत्तर देतो किंवा स्वतःच्या प्रतिष्ठेला पोषक असें कांहीं तरी सांगतो. उदाहरणार्थ, कित्येक लोक वनस्पति–तूप वापरूनहि तें कबूल करण्यास तयार होत नाहींत किंवा त्याच्या विरुद्ध तक्रार करण्यांतला खरा हेतु महागाई विरुद्ध खूप बोलायला मिळावें असा असूं शकतो.

लोकांना सरळ प्रश्न विचारून उत्तरें मिळतातच असें नाहीं. म्हणून आडमार्गांनींहि उत्तरें मिळवावीं लागतात. स्त्रियांना चहासाठीं बोलावून संभाषणाच्या ओघांत त्यांना मन मोकळें करायला लावणें हा त्यांपैकीं एक मार्ग होय. गृहिणींना खूप बोलूं दिल्यानें त्यांच्या मनोवृत्तींचा थांग लागतो. श्रीमंत स्त्रीचें धुणें तिचा नोकर धुतो; त्याला कोणताहि साबण दिला तरी तो नासणारच; मग स्वस्तांत स्वस्त असाच साबण कां न घ्या ? अशी श्रीमंत स्त्रियांची विचारसरणी

पुष्कळ वेळां आढळून येते; पण ती शिताफीनें काढून घ्यावी लागते. कंपनीच्या मालाचा प्रचार दुकानांतील रंगीबेरंगी पाट्या, सिनेमा, वृत्तपत्रांतील जाहिराती, भिंतीवरील जाहिराती, इत्यादि मार्गांनीं केला जातो. यांपैकीं कशाचा, कोणावर व किती परिणाम होतो हेंहि शोधून काढावें लागतें.

ठिकठिकाणीं हिंडून व लोकांच्या भेटी घेऊन वरील स्वरूपाची माहिती गोळा करणें हे विमलाबाईंचें मुख्य काम. त्यांनीं गोळा केलेल्या उत्तरांची छाननी करून त्यांतून मार्गदर्शक निष्कर्ष काढण्याचें काम मुख्य कचेरींत केलें जातें. उत्तरें वस्तुस्थितीला धरून असणें आवश्यक असल्यानें अशीं उत्तरें मिळविण्याची हातोटी विमलाबाईंच्या व्यवसायाला आवश्यक असते. गिऱ्हाइकांशीं समरस होऊन त्यांना बोलकें करणें वाटतें तितकें सोपें नाहीं. त्यासाठीं शहर, शहराचा भाग, लोकवस्ती, लोकांची राहणी, ह्या सर्वांचा विचार करूनच विमलाबाईंना बाहेर पडावें लागतें. मुंबईमधील फोर्ट–कुलाब्यासारख्या श्रीमंत वस्तींत वावरतांना त्या रेशमी पातळें नेसतील, केशरचना आधुनिक पद्धतीची करतील, कानांत टॉप्स घालतील व ओंठाला साजेशी लिपस्टिक लावतील. श्रीमंतांच्या घरीं व मोठमोठ्या कचेऱ्यांत त्यांना त्याखेरीज सुलभतेनें प्रवेश कसा मिळणार व त्यांच्याशीं बोलणार तरी कोण ? गिरगांवांतील चाळींतून हिंडतांना विमलाबाईंचें रूपांतर मध्यमवर्गीय स्त्रीमध्यें होईल. त्या कानांत कुड्या घालतील, हातांतील बांगड्यांची संख्या वाढवितील आणि दरवाजाबाहेर चपला काढून ठेवून खोलींत प्रवेश करतील. नायगांव–परळच्या गिरणी–कामगारांच्या वस्तींत त्या बिन-इस्त्रीचें, मळखाऊ पातळ नेसलेल्या आढळतील; कुंकूहि ठळक लावतील.

कामाचे निमित्तानें विमलबाईंना मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, अशा भाषांचा सर्रास उपयोग करावा लागतो. भाषेमुळें माणसें फार जवळ येतात; परकेपणा नाहींसा होतो. गुजराती किंवा पारशी लोक शेजारच्या महाराष्ट्रीयांशीं मराठींत बोलतात. पण महाराष्ट्रीय लोक मात्र इतर भाषांतून बोलण्याचा प्रयत्नहि करीत नाहींत,असें त्यांना आढळलें. विमलाबाईंची वेगवेगळ्या जमातींतील स्त्रियांशीं मैत्री भाषेमुळें झाली आहे.

समाज–जीवन जवळून पहाण्यास मिळावें, असेंच विमलाबाईंच्या कामाचें

स्वरूप आहे. कितीतरी स्त्रिया अगदीं पहिल्या भेटींतच आपली लहान-मोठी दुःखें सांगून मन मोकळें करतात. आलेली व्यक्ति आधींच्या ओळखीची नाहीं, आपल्या गांवांतलीहि नाहीं, त्यामुळें त्यांना निर्धास्तपणा वाटतो. एखादी तरुणी नवऱ्याच्याविरुद्ध तक्रारी सांगून मार्ग दाखवा म्हणून सांगते, तर एखादी श्रीमंत प्रौढा " मी सौंदर्य प्रसाधनें न वापरण्याचं कारण अगदीं खासगी आहे " असें प्रथम सांगते, पण चार-पांच दिवसांनीं ऑफिसवर फोन करून विमलाबाईंना चहालाच घरीं बोलावते आणि स्वतः परित्यक्ता असल्याचें सांगून सर्व कहाणी कथन करते.

एक वयोवृद्ध जोडपें, विमलाबाईंना मधें बसवून, आपल्या आयुष्याचें सिंहावलोकन करतांना एकमेकाचें अमाप कौतुक करतें. " माझ्या पत्नीनें माझ्यासाठीं खूप कष्ट केले; धंद्यांत बूड आली तरी मला धीर दिला; दोन वेळेचें खाण्यापुरतें असलें म्हणजे बाकीच्याचं कांहींहि करा असं ती भरभराटीच्या काळांतहि म्हणत असे. प्रत्यक्ष आपत्तींतहि तिनें मला संभाळून घेतलें. " असें पती म्हणायचा, तर पत्नी म्हणायची, " ह्यांनीं माझ्यासाठीं फार धडपड केली, मला फुलासारखें ठेवण्याचा प्रयत्न केला, मला उन्हाळा सहन होत नाहीं म्हणून बाहेरच्या टेबलाजवळचा पंखा चुलीजवळ लावून दिला. " असें बोलणें ऐकायला मिळालें, म्हणजे कौटुंबिक समाधानाचें रहस्य कळतें; त्याचा न कळत स्वतःच्या जीवनावरहि परिणाम होतो.

कित्येक स्त्रिया आपलें काम बाजूस ठेवून विमलाबाईंना बसवून घेतात; घरचे पुरुषहि मग त्यांचे बोलण्यांत सामील होतात. मुलाखत संपतांना ती मंडळी सहज नांव विचारतात. " मिसेस सोहोनी " असें सांगितल्यावर विमलाबाईंना निरखून पहातात आणि " क्रिकेटर सोहोनीपैकीं तुम्हीं का ? " असें विचारतात. " मी त्यांची पत्नी " असें विमलाबाईंनीं म्हणतांच त्या सर्वांचें चेहेऱ्यावर आनंदाची व आश्चर्याची रेषा उमटते आणि आणखी रमण्याचा आग्रह केला जातो. क्रिकेटच्या जुन्या आठवणी सांगितल्या जातात. पतीचे पराक्रम अशा रीतीनें पुनः पुनः ऐकण्यांत विमलाबाईंना खूपच अभिमान वाटतो.

विमलाबाईंचा व्यवसाय अशा प्रकारें बहुरंगी आहे; पाश्चात्य पद्धतीच्या एखाद्या उद्योगपतीशीं हस्तांदोलन करणाऱ्या विमलाबाई तितक्याच सहजतेनें

साध्या कामकरी स्त्रीशींहि समरस होऊं शकतात. त्यांना नाना तऱ्हेच्या लोकांशीं वागण्याचा प्रसंग येतो; सर्व प्रकारचें जीवन जवळून बघायला मिळतें; रोज नवे नवे अनुभव येतात. त्यामुळें जीवनांत रस व ताजेपणा राहतो. एखाद्या कचेरींत ठराविक काम करणाऱ्या नोकरांपेक्षां विमलाबाईच्या कामांत जिवंतपणा आहे. त्यामुळें त्यांचें व त्यांच्या कुटुंबियांचें जीवनहि समृद्ध होतें.

# १४

## माधवराव वाकडे

पुणें येथील टेनिसच्या खेळाच्या क्षेत्रांत वाकडे हें नांव सुप्रसिद्ध आहे. वयाच्या खूप उशीरा त्यांनीं टेनिस खेळण्यास प्रारंभ केला; पण अल्पावधींतच त्यांनीं त्यांत नांव मिळविलें. टेनिसच्या सामन्यांत ते भाग घेतात तेव्हां त्यांची एक अट असते; ती म्हणजे शक्यतों संध्याकाळीं सामने न खेळण्याची. सकाळीं खेळणेंच ते पसंत करतात. ह्याचें कारण, संध्याकाळीं आपलें दुकान सोडून खेळांत वेळ घालविण्यास ते तयार नसतात. टेनिसच्या खेळाचें त्यांना विलक्षण वेड आहे; पण आपल्या कापड-दुकानाच्या कामाच्या आड तो खेळ येत नाहीं तोंवरच ! दुकान ही त्यांची पहिल्या अनुक्रमाची पत्नी असून त्यानंतरच बाकीच्या "सवतींचा" नंबर लागतो !

त्यांचें दुकान पुणें येथें पेरुगेट ते स. प. कॉलेज रस्त्यावर आहे. निवडक मित्रमंडळींशीं ते कधीं-कधीं दुकानांत बोलत बसत असले तरी त्यांचें लक्ष आंत येणाऱ्या गिऱ्हाइकाकडेच असतें. गिऱ्हाईक आंत शिरतांना दिसतांच बोलणें अर्धवट सोडून ते तडक उठतात आणि त्याच्या स्वागतासाठीं पुढें होतात. ह्या हंसतमुख मालकाला गिऱ्हाइकांशीं सौजन्यानें परंतु महत्त्वाच्या बाबतींत स्पष्ट बोलतांना पाहाणाराला त्यांच्या यशाचें रहस्य सहज कळून येतें.

त्यांचें कापड–दुकान आज पुण्यांतील नामवंत दुकानांत का गणलें जातें ह्याचें मग आश्चर्य वाटत नाहीं.

श्री. वाकडे ह्यांच्या यशाचीं बीजें त्यांच्यांत बालवयांतच रुजलेलीं होतीं. अगदीं लहानपणींसुद्धां ते हातांत तराजू घेऊन खेळत असत. ते स्वतःला आदर्श दुकानदार म्हणवून घेत. सर्व कामें स्वतः करणें, वर्गांतील उत्तम विद्यार्थ्यांशीं मैत्री करणें, वडिलांचा पैसा कमींत कमी खर्च करणें, इत्यादि गुण लहानपणीं त्यांनींच आपल्या अंगीं बाणवले. पुढारीपणाची महत्त्वाकांक्षा त्यांना बालपणापासून आहे. सर्व खेळांत ते अट्टल होते. चौदा वर्षांचें असतांना ते अतिशय अशक्त होते, पण त्यांचे मित्र श्री. खांबेटे ह्यांनीं त्यांना व्यायामाची आवड लावली आणि तेव्हांपासून रीतसर व्यायाम घेऊन त्यांनीं आपलें शरीर नमुनेदार करून दाखविलें व राखलें.' सुप्रसिद्ध मल्लांचे फोटो समोर ठेवून ते शरीराची जोपासना करीत असत.

वाकडे ह्यांचें मूळ गांव कोकणात, कुलाबा जिल्ह्यांत रोहे तालुक्यांत आहे. ते इंग्रजी सहावींत असतांनाच त्यांचे वडील विष्णुपंत निवर्तले. त्यांचें एक लहानसें घर व थोडी शेती होती. वार्षिक उत्पन्न जेमतेम २०० ते २५० रुपये व्हायचें. काळ तर अतिशय मंदीचा. वडिलांनीं गांवांत किराणा मालाचा धंदा कांहीं वर्षें केला होता आणि प्रपंच सांभाळून २०० रु. मागें ठेवले होते. आई, धाकटी बहीण, ह्यांची सर्व जबाबदारी वाकडे ह्यांच्यावर पडली. त्यावेळीं आईचें वय ३२, वाकडे ह्यांचें १७ व बहिणीचें १३ असें होतें. नोकरी करूं नये असा वाकडे ह्यांचा पहिल्यापासून कल आणि नोकरी तरी कोण आणि कसली देणार? धंदा तरी काय करणार? जवळ भांडवल नाहीं, अनुभव नाहीं, कांहींहि नाहीं. अशा स्थितींत कांहीं महिने गेले. परंतु घरीं बसून भागण्यासारखें नव्हतें. मायलेकांत वाटाघाट होऊन मुलानें शिंपीकाम करावें असें अखेर ठरलें. आपलें गांव सोडून पुण्यास जावयाचें व तेथील झारापकर टेलरिंग कॉलेजांत शिक्षण घेऊन शिवणकामाचें दुकान काढायचें अशी योजना ठरली. एका सुप्रभातीं माय-लेकरें आपल्या आयुष्यांतील पुढचा मार्ग आक्रमण्यासाठीं पुण्यास मार्गस्थ झालीं.

पुण्याला आल्यावर त्यांनीं दरमहा तीन रुपये भाड्याची एक खोली घेतली आणि वाकडे ह्यांनीं झारापकर टेलरिंग कॉलेजांत नांव दाखल केलें. बरोबर

आणलेल्या २०० रुपयांपैकीं १०५ रुपये फीला गेले आणि ९५ रुपये उरले. त्यावर सर्व गोष्टी सुरू केल्या. कटिंग व शिवणकाम ह्यांचें शिक्षण चालू असतांना श्री. वाकडे ह्यांनीं उरलेल्या वेळांत शिकवण्या करून पैसे मिळविण्यास प्रारंभ केला. बरोबरीचे विद्यार्थी सिनेमा, हॉटेल, इत्यादींकडे आकृष्ट झालें असतांना श्री. वाकडे आपल्या आयुष्याच्या भरभराटीची पायाभरणी करण्यांत मनापासून रमले होते. त्यांची भगिनी सुशीला हिच्या बरोबर ते कधीं कधीं फिरायला जात त्या वेळची जी एक आठवण सौ. सुशीलाबाईंनीं मला सांगितली ती मोठी उद्बोधक आहे. त्या म्हणाल्या, "आमचा दादा वाटेंतील त्या वेळचीं सुप्रसिद्ध दुकानें मला दाखवीत असे आणि नेहमीं म्हणायचा कीं, मला माझें दुकानें असें मोठें करायचें आहे !" सर्वांच्यापेक्षां आपलें दुकान उत्कृष्ट करण्याची श्री. वाकडे ह्यांची प्रथमपासूनच तळमळ होती. तेव्हांपासूनच ते प्रत्येक क्षण त्याप्रीत्यर्थ कारणीं लावीत. आपण स्वतः नग शिवायचा आणि तज्ञांना तो दाखवून व त्यांतील बारीकसारीक दोषहि मुद्दाम समजून घेऊन तो नग निर्दोष करण्याचाच श्री. वाकडे ह्यांचा सतत प्रयत्न असे.

तीन–चार महिने शिक्षण घेतल्यानंतर श्री. वाकडे ह्यांनीं शिवण्याचें एक मशीन हप्तेबंदीनें घेतलें व त्यावर महिना आठ–दहा रुपये ते मिळवूं लागले. त्यामुळें त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण झाला. शिवणकामाचा कोर्स पुरा होण्याच्या अगोदरच त्यांनीं शिवणावर पैसे मिळवून कॉलेजची फी आणि मशीनची किंमत ह्यांची कमाई केली होती ! आतां त्यांनीं आणखी एक मशीन घेतलें आणि 'ब्यूटी टेलर्स' ह्या नांवानें स्वतंत्र दुकान डिसेंबर, १९३७ मध्यें सुरू केलें. आजहि त्याच जागेवर तें दुकान भरभराटींत चालू आहे. १९३९ मध्यें त्यांचे मेव्हणे श्री. गुमास्ते हे त्यांस येऊन मिळाले. सध्यां तेच ह्या दुकानाची सर्व व्यवस्था पाहतात. दुकानाचा खर्च भागवून जे पैसे बाजूला टाकतां आले त्यांतून कापड आणून शिंपी–कामाच्या दुकानाला कापडधंद्याची जोड देण्यांत आली. हळूहळू शिवणकामाबरोबर कापडाचाहि धंदा वाढत गेला आणि १९५० मध्यें १०० रुपये भाड्याची एक मोठी स्वतंत्र जागा कापडाच्या दुकानासाठीं घेण्यांत येऊन तेथें कापडाचें दुकान थाटलें–म्हणजे शिंपीकामाचें व कापडाचें, अशीं दोन दुकानें झालीं.

टेलरिंगच्या दुकानाची सर्व जबाबदारी श्री. गुमास्ते ह्यांनीं पत्करली आणि

कापड–दुकानाची बाजू श्री. वाकडे स्वतः पाहूं लागले. गुमास्ते ह्यांच्यासारखा विश्वासू व मेहनती जोडीदार वाकडे ह्यांना लाभला म्हणूनच धंदा वाढविण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा सफल होऊं शकली. वाकडे ह्यांचेवरील गुमास्ते ह्यांचा विश्वास अबाधित आहे. त्या विश्वासाचें वाकडे ह्यांनीं योग्य प्रकारें चीज करून दाखविलें आहे. असा आदर्श जोडीदार त्यांना मिळवून देण्याचें सर्व श्रेय त्यांच्या भगिनीलाच दिलें पाहिजे. कारण सुशीलाबाईंचा व काकासाहेब गुमास्ते ह्यांचा प्रेमविवाह झालेला आहे; म्हणजे गुमास्ते ह्यांना सुशीलाबाईनींच तयार केलेलें आहे! हा सारस्वत–ब्राह्मण विवाह सर्वच दृष्टींनीं यशस्वी झाला. स्वतः सुशीलाबाई एका हायस्कुलांत शिक्षिका आहेत. त्या व त्यांचे पति ह्यांनीं आपली शिल्लक वाकडे ह्यांना कापडाच्या खरेदींत व साठ्यांत गुंतवण्यास दिली. त्यामुळेंच वाकडे ह्यांना घरचें भांडवल वापरायला मिळालें आणि पत वाढवितां आली. धंद्याच्या सुरुवातीच्या काळांत, धोका पत्करूनहि, गुमास्ते पति–पत्नींनीं केलेल्या ह्या मदतीचा उल्लेख मुद्दाम केला पाहिजे. बाजारांत पत वाढल्यावर कोणीहि ठेवी आणून ठेवील; पण ती पत निर्माण होण्याच्या आधीं आपली सर्व शिल्लक वाकडे ह्यांच्या स्वाधीन करण्यांत त्यांचा विश्वास आणि वाकडे ह्यांची पात्रता हीं दोन्हीं स्पष्ट दिसून आलीं; त्यांचें फळहि चांगलें मिळालें.

धंदा एक माणूस एकाकी उभारूं शकत नाहीं; त्याला घरांतील सर्वांची मदत मिळाली तर तो वाढीला लागतो, ह्याचें वाकडे ह्यांचा धंदा हें उत्कृष्ट उदाहरण आहे. घरांतील सर्व कामें सांभाळून सौ. सरलाबाई वाकडे ह्या दुकानाचे हिशेब लिहिण्याचीं कामें करतात; महिन्याच्या प्रारंभीं दुकानांत विशेष गर्दी असते तेव्हां मदतीला येतात. कित्येक पति–पत्नी पत्ते खेळण्यासाठीं क्लबांत जातात त्यांना वाकडे दंपतीच्या सहजीवनाची मौज कधींच अनुभवण्यास मिळणार नाहीं! घरच्या धंद्यांत पति-पत्नींनीं रमून एकत्र वेळेचा सदुपयोग करण्यांतील रहस्य निदान पहायला तरी हवेंच!

श्री. वाकडे ह्यांच्या भगिनी, सौ. सुशीलाबाई गुमास्ते ह्या शाळेंत जातांना व येतांना दुकानाच्या पायरीपाशीं सायकल टेकवून आपल्या भावाशीं दोन शब्द बोलूनच पुढें जातील; सुटीच्या दिवशीं दुकानांत हिशेब लिहिण्यास मदत करतील. वाकडे ह्यांच्या आईनें हा सर्व सोहळा डोळे भरून पाहिला आहे.

कांहीं वर्षांपूर्वी त्या निवर्तल्या; त्याहि दुकानांत येऊन बसत असत आणि कौतुकानें त्यांचें हृदय भरून येत असें. "आपल्यामधील सर्व गुणांचें उगमस्थान आई हेंच आहे; तिचीच शिकवण आणि तिनें भावंडांत व इतर कुटुंबियांत निर्माण केलेलें एकदिल आज आम्हांला योग्य मार्गानें नेत आहे" असें वाकडे व त्यांच्या भगिनी आपल्या आईविषयीं नेहमीं आदरानें व कृतज्ञतापूर्वक बोलत असतात. वाकडे ह्यांचें दुकान पुण्यांतील नांवाजलेल्या दुकानांपैकीं एक आहे ह्याचा भावंडांना जेव्हां अभिमान वाटतो त्या वेळीं आईच्या आठवणीनें त्यांच्या डोळ्यांत पाणी येऊं लागतें !

श्री. वाकडे ह्यांच्या दुकानाची भरभराट होत गेली तरी त्यांनीं आपली राहणी बदललेली नाहीं. काटकसरीची त्यांची प्रवृत्ति अबाधित राहिली आहे. स्वतःवरील त्यांच्या खर्चात वाढ झालेली नाहीं; आलेलें सर्व उत्पन्न त्यांनीं दुकानांतच गुंतवून ती गुंतवणूक वाढवत नेली आहे. शहरांतील प्रलोभनांना ते तरुणपणींहि बळी पडले नाहींत. चहासुद्धां ते पीत नाहींत. त्यांना प्रारंभीं आदर्श वाटलेले दुकानदार आज नामशेष झाले आहेत; संपत्तीबरोबर येणारे मित्रमंडळ आणि व्यसनें ह्यांपासून दूर राहण्यांत वाकडे यांनीं अभिनंदनीय यश मिळविलें आहे. धंद्यांतील प्रगतीस संयमानें कशी मदत होते, ह्याचें वाकडे हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

श्री. वाकडे ह्यांच्यामध्यें हिशेबीपणा इतका भिनला आहे कीं तो त्यांचा स्वभावधर्म बनला आहे ! पैसे खर्च करण्याची ते कधींच घाई करणार नाहींत; पूर्ण विचार केल्यावरच खिशांत हात घालतील. प्रत्येक व्यवहारामध्यें आपल्याला खराखुरा फायदा झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. हा फायदा पैशाच्या स्वरूपांतच हवा असें नाहीं; पण तो केवळ दिखाऊ किंवा तात्कालिक असतां कामा नये. प्रत्येक गोष्टीचा कस पाहूनच ते निर्णय घेणार; दूध, केळीं, भाजी, इत्यादींच्या बाबतींत मात्र ते काटकसर करीत नाहींत. घेतील तो जिन्नस उत्कृष्ट पाहूनच. इतरांच्या आग्रहाला ते कधींच बळी पडणार नाहींत. असा कुशल व करारी अर्थमंत्री वाकडे कुटुंबाचें मार्गदर्शन करीत आहे. त्यांच्या नेतृत्वावर त्यांच्या मेव्हण्यासकट सर्वांचा पूर्ण विश्वास आहे.

दुकान यशस्वी करण्यासाठीं वाकडे कुटुंबांतील सर्वांनाच अत्यंत परिश्रम घ्यावे लागले हें उघडच आहे. प्रारंभींच्या काळीं, शारीरिक श्रमाबरोबर

मानसिक त्रासहि होई. शिंप्याकडे बघण्याचा तेव्हांचा समाजाचा दृष्टिकोन आजच्यापेक्षां पुष्कळच अधिक विकृत होता, त्यामुळें मानहानीचे प्रसंग वारंवार येत असत. कोणाकडे माप घ्यायला गेलें कीं शिंप्याला जमिनीवर बसवून गिऱ्हाइकानें कोचावर बसावें हा तर नित्याचा प्रकार होता. सर्व कामें व्यवस्थित करून घराबाहेर सपत्नीक निघावें तर वाटेंत कोणीतरी हांक मारून विचारावें, "काय, पुढच्या रविवारीं देणार ना कपडे?" शिंप्याला कमी लेखून बडेजावीचा आनंद उपभोगणारे, खरोखरच श्रीमंत असते तर गोष्ट वेगळी! त्यांतील कित्येक जण शिलाईचें बिल चार–आठ आण्यांच्या मासिक हप्त्यांनी भागविणारे व तेहि हप्ते चुकविणारे असावयाचे. पण शिंप्याला आपली 'पायरी' कशी सोडतां येणार?

वाकडे ह्यांच्या ह्या जुन्या आठवणी आणि आतां त्यांच्या पाठीमागें लागणाऱ्या लोकांनीं गाइलेले त्यांचें गुणगान यांतील तफावत मोठीच मनोरंजक वाटते. जीवनांतील खरा आनंद कांटेरी वाटेंतून जाऊन यशस्वी होण्यांतच आहे. अडचणींचा ज्याला अनुभव नाहीं त्याला खरें सुख कधींच चाखायला मिळत नाहीं. जो समाज पूर्वी अवहेलना करतो तोच समाज पुढें डोक्यावर घ्यावयास तयार होतो. आपत्तींनीं गांगरून जातां कामा नये आणि यशानें मूढमतिही होतां कामा नये, हेंच खरें.

श्री. वाकडे ह्यांचें नेहमीं म्हणणें व आचरण असें असतें कीं त्यापासून परिचितांनीं बोध घ्यावा. 'आपण माणसें जोडीत जावीं, तोडीत जाऊं नये:' 'राखावीं बहुतांचीं अंतरें, भाग्य येतें तदनंतरें:' 'सर्वांशीं गोड बोलावें, विशेष गुणी माणसांशी मैत्री करावी;' 'जगामध्यें जगमित्र, जिव्हेपाशीं आहे सूत्र' हीं वचनें प्रमाण मानल्यास, काटकसरीनें व साधें राहून पूर्ण हिशेबानें व्यवहार केल्यास, दहा–पंधरा वर्षे चिकाटी दाखविल्यास, कोणत्याहि योग्य धंद्यांत यश येईल याविषयीं शंकाच नको. धंद्यांतील यश जेवढें भांडवलावर अवलंबून असतें त्यापेक्षां जास्त त्या धंद्याला लागणाऱ्या गुणांवर अवलंबून असतें. पैसा व यश गुणी माणसाला शोधीत येतात.

"धंदा यशस्वीपणें करूं इच्छिणाऱ्या आपल्या देशांतील तरुण वर्गाला अनुभवाचे चार शब्द सांगा" असें मी सुचविलें तेव्हां श्री. वाकडे म्हणाले––

"धंदा करणाऱ्यानें आपल्या अंगीं प्रयत्नपूर्वक कांहीं गुण बाणवले

पाहिजेत. आळसाला केव्हांहि थारा न देणें हें त्यानें सर्वप्रथम सांभाळलें पाहिजे. नोकरीला जाणारा मनुष्य आपलीं घरचीं सर्व कामें आटोपून नोकरीवर वेळींच हजर होतो व तेथें आपल्या वांट्यास आलेलें काम सहा-सात तास करून ऑफिसची वेळ संपल्यावरच बाहेर पडतो. त्याला तसें करावेंच लागतें; त्याच्यावर तें बंधन असतें. धंद्यांत स्वतःच स्वतःवर बंधन घालून घ्यावयाचें असतें. वेळेवर दुकान उघडणें व वेळेवरच तें बंद करणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. सकाळीं नोकर येईल तेव्हां दुकान उघडील व साफ करील असें न म्हणतां स्वतः तें उघडणें, साफ करणें व येणाऱ्या ग्राहकांच्या स्वागतार्थ सज्ज राहणें यांतील महत्त्व पुष्कळांना कळत नाहीं. मी सकाळीं टेनिस खेळावयास जातो त्या वेळीं हातांत रॅकेट असतांना मला जो आनंद वाटतो तोच आनंद हातांत केरसुणी घेऊन दुकान व दुकानाच्या पुढील जागा साफ करतांना वाटतो. या क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींमध्यें धंद्याला आवश्यक असणारे बरेच गुण दडलेले आहेत. सकाळपासून सायंकाळपर्यंत आपल्या दुकानांत कष्ट करून त्या दिवसाच्या आपल्या कमाईची भाकरी खाण्यांत केवढें समाधान असतें हें त्याप्रमाणें प्रत्यक्ष करणाराच जाणूं शकतो. आळसानें या समाधानाला आपण मुकतों. जो कोणता छोटामोठा धंदा आपण हातीं घेतला असेल त्यांत निरलसपणें कष्ट करून त्या धंद्यास नांवारूपास आणणें व त्यांतच आनंद मानणें हाच खरा कर्मयोग होय. ललाटरेषा ही आपल्या प्रयत्नानें पुसून टाकतां येते असें थोर लोक सांगतात तें याच भरवशावर. निरलसपणें कार्य करीत असतांना देखील धंद्याच्या वाढीबरोबर कांहीं जबाबदाऱ्या व अडचणीहि येतातच. धंद्यांत येणाऱ्या अडचणी मुख्यतः आर्थिक स्वरूपाच्याच असतात." या अडचणींकडे पाहण्याचा श्री. वाकडे यांचा दृष्टिकोन थोडा निराळा आहे.

"चांगल्या संवयी, सरळ वर्तन व सर्व लोकांशीं मैत्रीचें गोड भाषण या उत्तम गुणांनीं लोकांमध्यें आपण आपला विश्वास (पत) निर्माण करीत असतों. बऱ्याच लोकांना धंदा करतांना या गोष्टीचें महत्त्व कळत नाहीं. 'हा माणूस व्यवहाराला सरळ आहे' अशी आपल्याविषयीं लोकांची दृढ भावना झाली म्हणजे पैशाच्या अडचणी निम्म्या-अधिक जिंकल्या असें समजावें. कोणासहि तोडून न बोलतां सर्व सुष्टदुष्ट लोकांचा आपल्या धंद्याच्या वाढीकरितां उपयोग करून घ्यावा. सर्वांचीं अंतःकरणें आपल्या गोड बोलण्यानें आपलीशीं केलीं

कीं बराचसा कार्यभाग आपोआप साधला जातो. मला धंद्यांत वेळोवेळीं पैशाच्या ज्या अडचणी आल्या त्या निभवण्यास मी आपल्या गोड व मनमिळाऊ स्वभावामुळें जोडलेले मित्र आणि नातेवाईक उपयोगी पडले. अडचणीच्या वेळीं हजारों रुपयांची मदत त्यांनीं मला केली आहे."

धंद्यांतील एक पथ्य पाळण्याविषयीं माधवरावांचा आग्रह असतो. ठरलेल्या मुदतींत परत करतां येणार नाहीं एवढी रक्कम आपण मित्रांकडून नव्हे तर कोणाकडूनहि घेऊं नये. त्यांनीं स्वतः ती कधींहि घेतली नाहीं. ज्या रकमा घेतल्या त्या वेळच्या वेळीं आभारपूर्वक परत केल्या. ज्यांनीं त्या दिल्या ते आज दहा वर्षांनंतर देखील त्यांचे मित्र असून त्यांना मदत करायला केव्हांहि तयार आहेत. जेवणाच्या वेळीं भुकेपेक्षां दोन घास कमी खाणें जसें आरोग्याला हितकारक ठरतें, तसेंच पैशाच्या व्यवहारांत. आपणांस खात्रीनें फेडतां येईल त्यापेक्षां कमीच रक्कम उसनवारीनें घेणें हितावह ठरतें. हें पथ्य पाळलें म्हणजे धंद्याचें आरोग्य बिघडत नाहीं.

वाकडे ह्यांच्या मनाची बैठक खंबीर तत्त्वावर आधारलेली आहे. समर्थ रामदासांना ते गुरु मानतात. भगवत्‌गीता, ज्ञानेश्वरी व दासबोध हे त्यांचे आवडते ग्रंथ होत. दररोज रात्रीं ते आपल्या पत्नीला आणि मातृस्थानीं असलेल्या आपल्या प्रेमळ सासूबाईंना ज्ञानेश्वरी वाचून समजावून सांगतात. ह्या सुग्रण श्रोत्यांना भोजनोत्तर ही मेजवानी मिळत असते. निरूपणांत ते इतके तल्लीन होतात, कीं त्यांना वेळेचें भानहि रहात नाहीं. वाकडे ह्यांचें पाठांतर कौतुकास्पद आहे. श्लोकामागून श्लोक ते म्हणून दाखवितील व त्यांचें रहस्य उलगडून सांगतील. ह्या यशस्वी दुकानदाराकडून चहा-चिवडा काढतां येणें कठीण, पण ज्याला अमृत हवें असेल त्याला मात्र तें आकंठ मिळेल.

आपल्या मुलाला व्यापार आणि दुकानदारी ह्यांची गोडी लावण्यांत वाकडे यशस्वी होत आहेत. वडिलांनीं वाढविलेला धंदा मुलानें न चालविल्यामुळें महाराष्ट्रांत व्यापारी परंपरा निर्माण होत नाहीं. त्यास वाकडे-कुटुंबासारखें अपवाद जेवढे जास्त होतील तेवढे हवे आहेत. वाकडे ह्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक यशाची ही सामाजिक बाजू अत्यंत महत्त्वाची आहे.

गेल्या २०-२२ वर्षांत धंदा करीत असतां श्री. वाकडे ह्यांना अनेक अनुभव आले. अनेक प्रकारच्या लोकांशीं परिचय झाला. त्यांतील धंदा करणाऱ्या

लोकांसंबंधीं त्यांचीं कांहीं ठाम मतें झालीं आहेत. त्यांपैकीं एक दोन विचार खालीं दिले आहेत.

सर्वसाधारणतः धंदेवाला म्हटला कीं, त्याची दृष्टि अधिकाधिक पैसे मिळविण्याची असते. धंदा करणाऱ्या लोकांना हें स्वाभाविकच आहे. परंतु पैसे मिळविण्याचे व त्याचा विनियोग करण्याचे मार्ग मात्र नेहमीं चांगले असतात असें नाहीं. सरकारला, लोकांना, एवढेंच काय पण मित्रांना व नातेवाइकांनाहि लुबाडून संपत्ति मिळविणें व तिचा धंद्या-व्यतिरिक्त मोटारी, इमारती व चैनीच्या बाबी आणि व्यसनें यांच्यावर खर्च करणें व समाजामध्यें धनिक म्हणून मिरविणें एवढीच बहुतेक धंदेवाल्यांची दृष्टि सामान्यतः असते. सहाजिकच, लौकरांत लौकर सुष्ट-दुष्ट मार्गानें संपत्ति हस्तगत करणें या-व्यतिरिक्त धंद्यांत कांहीं इतर ध्येयें असतात याची जाणीव फारच थोड्या व्यापारांना असते.

अशा प्रकारची संपत्तीची लालसा व चैनीची चटक ही व्यक्तिशः धंदे-वाइकाला व तो ज्या समाजाचा घटक आहे त्या समाजाला परिणामी घातक ठरते. समाजाकडून नाना तऱ्हेनें वाम मार्गानें द्रव्य मिळवून तें अनुत्पादक रीतीनें खर्च करणें, अंतीं आत्मघातीपणाचें आहे. सध्यांचे अनेक आर्थिक प्रश्न या वृत्तींतून निर्माण झाले आहेत. धंदेवाल्यानें आपल्या वर्तनानें समाजांत आदर्श निर्माण केला पाहिजे. समाजांत गुणालाहि किंमत असते हें संपत्तिमान लोकांनीं आपल्या वर्तनानें दाखवून दिले पाहिजे. असें झालें तर ते लोकांच्या अंतरंगांत खरे पूज्य होतील व लोकांना त्यांच्या कर्तबगारीचें कौतुक वाटेल. कांहीं धंदेवाल्यांना स्वतःच्या धंद्याविषयीं खरी आस्थाच नसते. धंद्याच्या ठिकाणीं ते शरीरानें असले, तरी त्यांचें लक्ष शेअर मार्केटकडे असतें. अशा लोकांनीं धंदा करणें हा सामाजिक गुन्हा आहे. ज्याला धंद्यांतील कष्ट करतांना मोठा आनंद वाटतो, त्यानेंच धंद्यांत पाऊल टाकावें. केवळ पैसे मिळविण्यांत नव्हे, तर आपला धंदा व्यवस्थित करण्यांत खरा आनंद असतो. हा विचार सर्व व्यवसायांना लागू आहे. धंदा हा मोठा आनंदाचा ठेवा आहे; ती देशसेवा आहे ह्या दृष्टीनेंच श्री. वाकडे आपल्या धंद्याकडे पाहतात. ह्या भावनेमुळें ते नेहमींच आनंदांत असतात; त्यांना सर्वांचें प्रेम लाभतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.